नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक



वर्ष २५ अंक ४

ऑगस्ट १९७०

ता. १ ऑगस्ट १९७० रोजी यांच्या निधनाला ५० वर्षे झाली. विदर्भ साहित्य संघाचे त्यांच्या पुण्यस्मृतीला विनम्र अभिवादन.

अनुक्रमणिका

श्रीमंत लक्ष्मण श्रीधर ऊर्फ बाबुराव देशमुख



नागपूरचे उदारधी नागरिक दानशूर रसिकाग्रणी श्रीमंत बाबुरावजी देशमुख यांना शुक्रवार ता. १० जुलै १९७० रोजी नागपूर येथे देवाज्ञा झाली. विदर्भ साहित्य संघाचे ते पहिले उपकर्ते. या रसिक-श्रेष्ठाला विदर्भ साहित्य संघाची कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजलि.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २५] ऑगस्ट १९७० [अंक ४

संपादक
शं. बा. शास्त्री

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर-१

या अंकाची किमत : एक रुपया

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

‘ श्रीशाय जनतात्मने ’—

ग. त्र्यं. माडखोलकर

लोकमान्य टिळक यांचा ‘गीतारहस्य’ हा एकमेव मराठी ग्रंथ १९१५ च्या जूनमध्ये प्रसिद्ध झाला. तेव्हापासून, १९२० च्या ऑगस्टमध्ये त्यांचे देहावसान होईपर्यंत, या ग्रंथावर सतत चर्चा चालू होती. इंग्रजी अंमल या देशात सुरू झाल्यापासून गेल्या दीडशे वर्षांत जे हजारो ग्रंथ मराठी भाषेत निर्माण झाले, त्यांपैकी एकाही ग्रंथावर ‘गीतारहस्या’इतकी चर्चा झालेली नसेल. याचे एक कारण जसे ग्रंथकाराचे अलौकिक विभूतिमत्व, तसेच दुसरे कारण ग्रंथाचे अलौकिकत्व हेही सांगता येईल. महाराष्ट्रात गीतेवर भाष्ये लिहिण्याची परंपरा, मराठी भाषेला ग्रांथिक स्वरूप प्राप्त झाल्यापासून, गेली सातशे वर्षे चालत आलेली आहे. ‘भावार्थदीपिका’ आणि ‘यथार्थदीपिका’ यासारखी श्रीज्ञानेश्वरमहाराज आणि वामनपंडित यांच्यासारख्या श्रेष्ठ कवींनी गीतेवर लिहिलेली भाष्ये जरी सोडून दिली, तरी अकराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकापर्यंत महाराष्ट्रात बहुधा असा एकही सत्पुरुष आणि कवी होऊन गेलेला नाही की, ज्याने आपल्या बुद्धिनुसार गीतेवर किंवा गीताद्वारे काही ना काही रचना केलेली नसेल. ही परंपरा या घटकेपर्यंत चालत आलेली आहे. कारण, गीता हा हिंदु समाजातील सर्व जुन्या नव्या पंथोपपंथांना स्थूल मानाने मान्य असलेला एकच ग्रंथ असून, त्यात प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानातील भिन्न भिन्न प्रणालींचे सार आणि समन्वय ही दोन्ही ग्रथित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे, धर्मजिज्ञासा आणि तत्त्वजिज्ञासा यात आनंद मानणारे चिंतनशील लोक, आपल्या प्रकृतिनुसार, गीतेवर भाष्य करावयाला साहजिकच प्रवृत्त होतात.

गेल्या सातशे वर्षांत गीतेवर हे जे विपुल वाङ्मय मराठीत निर्माण झाले, त्यात तेराव्या शतकातली ‘ज्ञानेश्वरी’ आणि विसाव्या शतकातले ‘गीतारहस्य’ या दोन ग्रंथांवर जितकी चर्चा झाली, तितकी दुसऱ्या कोणत्याही गीताभाष्यावर झालेली नाही. वस्तुतः या दोन ग्रंथांत कोणत्याच प्रकारचे साम्य नाही. गीतारहस्य हे विलक्षण बुद्धिप्रधान आणि तर्ककर्कश आहे. त्यांत कोणत्याही प्रकारचा जिव्हाळा आणि गोडवा नाही. त्याच्या तेराव्या प्रकरणात भक्तिमार्गाचे विवेचन करतानासुद्धा टिळक, ज्ञानेश्वरांप्रमाणे, कुठेही उचंबळलेले किंवा पाझरलेले दिसत नाहीत. तेही विवेचन विद्वत्ता आणि तार्किकता यांनी परिपूर्ण आणि रुक्ष आहे. ज्ञानेश्वरीतील रसात्मकता त्यात कुठेही नाही. उलट ज्ञानेश्वरी हा म्हटले तर काव्य आणि म्हटले तर तत्त्वज्ञान अशा संमिश्र स्वरूपाचा ग्रंथ आहे. ज्ञानेश्वरमहाराज हे अद्वैतवादी असले, तरी त्यांच्या या गीतेवरील भाष्याच्या ‘भावार्थदीपिका’ या नावाला शोभेल असा गुरुभक्ती आणि सगुणोपासना यांचा जिव्हाळा त्यात ओतप्रोत भरलेला असून, ज्ञानयोग आणि कर्मयोग यापेक्षा त्यात भक्तियोगाला अधिक प्राधान्य दिलेले आहे. त्या दृष्टीने, वारकरी संप्रदायात या ग्रंथाला ‘माउली’ असे जे नाव भक्तिभावाने देण्यात आलेले आहे, ते अगदी समर्पक वाटते. ज्ञानेश्वरी लिहिली गेली, त्या वेळी उत्तर भारतात मुस्लिम राजसत्ता दृढमूल झालेली होती; व दक्षिण भारतावर तिचे आक्रमण सुरू झालेले होते. त्याचप्रमाणे, सूफी पंथाच्या रूपाने इस्लामचे तत्त्वज्ञान आणि त्यातील भक्तिसंप्रदाय हाही दक्षिण भारतात पसरत चाललेला होता. ख्रिस्ती धर्माने तर पहिल्या शतकातच मुळी भारतात मूळ धरलेले होते. तथापि, ‘भावार्थदीपिके’त जिथे निरनिराळ्या आचार्यांच्या भाष्यांचा सुद्धा विचार फारसा केलेला नाही, तिथे यहुदी, पार्शी, ख्रिस्ती, मुस्लिम इत्यादी जे बाह्य धर्म भारतात त्या वेळी स्थायिक होऊन बसलेले होते, त्यांच्या तत्वज्ञानाचा तुलनात्मक विचार

करण्याची कल्पना कशी सुचावी ? गीतेत प्रतिपादन केलेल्या अद्वैत तत्वज्ञानाच्या कक्षेपलिकडे ज्ञानेश्वर-महाराज मुळी गेलेच नाहीत. पण 'भावार्थदीपिका'च कशाला ? एकोणिसाव्या शतकापर्यंत गीतेवर जी अनेक भाष्ये तिच्यानंतर झाली, त्यातही या अन्य धर्मातील तत्त्वज्ञानांचा परामर्ष घेतलेला सहसा आढळणार नाही. काही मराठी मुस्लिम संतांच्या आध्यात्मिक ग्रंथांतून हिंदु आणि मुसलमान या दोन्ही धर्मातील प्रमेयांची सरमिसळ झालेली दृष्टीस पडते, तेवढाच काय तो अपवाद !

'गीतारहस्य' लिहिण्यात टिळकांची भूमिका आणि उद्देश ही दोन्ही ज्ञानेश्वरमहाराजांहून सर्वथैव भिन्न होती. जे काय साम्य होते, ते फक्त लोकांना उपदेश करण्यापुरते. म्हणूनच दोघांनीही मराठीसारख्या लोकभाषेतून आपआपल्या ग्रंथांची रचना केली. या व्यतिरिक्त दुसरे कोणतेही साम्य या दोन ग्रंथांत नाही. टिळकांनी आपला ग्रंथ, "श्रीशाय जनतात्मने" म्हणजे "जनतात्मा जो श्रीश" त्याला समर्पण करताना, अर्पण-पत्रिकेत असे म्हटलेले आहे की,—

तथापि चापलादस्मि वक्तुं तं पुनरुद्यतः ।

शास्त्रार्थान् संमुखीकृत्य प्रत्नान् नव्यैः सहोचितैः ।।

"अनेक पुरातन कवींनी आणि आचार्यांनी श्रीगीतेच्या अर्थाचे व्याख्यान केलेले आहे. तरी देखील मी साहस करून जुन्या शास्त्रार्थांसमोर उचित असे नवीन शास्त्रार्थ मांडण्यासाठी गीतार्थ पुन्हा सांगावयाला उद्युक्त झालो आहे." हा उद्देश त्यांनी प्रस्तावनेत विस्ताराने विशद केलेला दृष्टीत पडतो. "१८७२ साली वडिल शेवटच्या दुखण्याने आजारी असता, भगवद्-गीतेवरील भाषाविवृति नावाची प्राकृत टीका त्यांस वाचून दाखवण्याचे काम टिळकांकडे आलेले होते." तेव्हापासून, गीतेचा व्यासंग करीत असताना, "स्वकीयां-बरोबर युद्ध करणे, हे मोठे कुकर्म म्हणून खिन्न झालेल्या अर्जुनास त्याच युद्धास प्रवृत्त करण्यासाठी सांगितलेल्या गीतेत ब्रह्मज्ञानाने किंवा भक्तीने मोक्ष कसा मिळवावा याचे, म्हणजे नुसत्या मोक्षमार्गाचे, विवेचन कशाला," ही शंका त्यांच्या मनात उद्भूत झाली. म्हणून, "गीतेवरील सर्व टीका आणि भाष्ये बाजूला ठेवून, नुसत्या गीतेचीच त्यांनी जेव्हा स्वतंत्र विचारपूर्वक पारायणे केली, तेव्हा टीकाकारांच्या छापेतून सुटका होऊन, मूळ गीता निवृत्तिपर नसून कर्मयोगपर आहे, असा बोध त्यांच्या मनाला झाला." "हे मत कायम झाल्यावर, गीतेवरील सर्व टीकाकारां-च्या मतांचा संग्रह करून,...त्यातील अपुरेपणा सकारण दाखवण्याचे आणि गीताधर्माची इतर धर्मांशी किंवा तत्त्वज्ञानांशी तुलना करण्याचे काम त्यांनी हाती घेतले." तदनुसार त्यांनी, "कर्माकर्माच्या किंवा धर्माधर्माच्या या विवेचनासच आधुनिक केवळ आधिभौतिक पंडित नीतिशास्त्र असे म्हणतात," ही गोष्ट ध्यानात घेऊन, "प्रस्तुत कालच्या चोकस पद्धतीप्रमाणे गीतेच्या प्रमुख सिद्धांताची इतर धर्मातील आणि तत्वज्ञानातील सिद्धांतांशी 'गीतारहस्यां'त संक्षेपाने तुलना करून दाखवली." आपल्या ग्रंथाच्या या वैशिष्ट्याची जाणीव त्यांना असल्यामुळे प्रस्तावनेत त्यांनी असे विधान केलेले आहे की, "गीतारहस्य हा निबंध अशा रीतीने कर्मयोगावर एक लहानसा पण स्वतंत्र ग्रंथच आहे, असे म्हणता येईल." सारांश, गेल्या अडीच तीन हजार वर्षांतील भारतीय, पौरस्त्य आणि पाश्चात्य धर्म, तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्रे यांचे अवलोकन करून, टिळकांनी, "वैदिक धर्मातील राजगुह्याचा हा परीस 'उत्तिष्ठत ! जाग्रत ! प्राप्य वरान्निबोधत !'—'उठा ! जागे व्हा ! आणि (भग-वंतांनी दिलेले) हे वर समजून घ्या !'—या कठोप-निषदातील मंत्राने प्रेमोदकपूर्वक नवीन पिढीच्या हवाली केला." गेल्या सातशे वर्षांत इतक्या विशाल, दूरगामी दृष्टीने गीतेवर लिहिलेला भाष्यग्रंथ हा पहिलाच होय. या ग्रंथात टिळकांनी केवळ आपल्या विद्वत्तेचा आणि चिंतनाचा परिपाकच नव्हे, तर गीतेत उपदेशिलेल्या कर्मयोगाचे जे असिधाराव्रत स्वतः आमरण आचरले, त्या व्रताचे रहस्य म्हणजे आपले जीवनतत्त्वज्ञानही साठवलेले आहे.

असा हा अपूर्व आणि अलौकिक ग्रंथ लिहिताना, टिळकांच्या डोळ्यांपुढे केवळ चातुर्वर्ण्याधिष्ठित वैदिक समाज किंवा जातिघटित हिंदु समाजच नव्हता; तर भारतातील आणि जगातीलही सर्व धर्मांचे आणि जाति—जमातींचे लोक त्यांच्या डोळ्यांपुढे होते. त्या सर्व लोकांसाठी, — मग ते वैदिक असोत, हिंदु असोत, अनार्य असोत की म्लेच्छ असोत, — त्यांनी 'गीता-रहस्य' लिहिले. त्याच्या पूर्वार्धातील 'उपसंहार' या शेवटल्या पंधराव्या प्रकरणात, 'गीताधर्म' हा जगा-

तील सर्व धर्मांच्या, वंशांच्या आणि जाति–जमातींच्या लोकांसाठी कसा आहे, हे विशद करताना त्यांनी असे उद्‌गार काढलेले आहेत. की, "गीतेचे असे सांगणे आहे की, संसार सुखमय असो वा दुःखमय असो, सांसारिक कर्मे सोडू म्हटल्यासही जर सुटत नाहीत, तर त्यांच्या सुखदुःखांचा विचार करण्यात काही फायदा नाही. सुख असो वा दुःख असो, मनुष्यजन्म प्राप्त झाला, हेच महद्भाग्य समजून कर्मसृष्टीच्या या अपरिहार्य व्यवहारात जे जे प्राप्त होईल ते ते अंतःकरणाचा हिरमोड न होऊ देता, 'दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः' या न्यायाने, म्हणजे साम्यबुद्धीने, सहन करणे आणि जगाच्या धारणपोषणार्थ आपल्या अधिकाराप्रमाणे कर्माचा जो भाग शास्त्रतः आपल्या वाट्यास आला आहे, तो अमक्या तमक्यासाठी नव्हे, तर निष्काम बुद्धीने आमरणान्त करीत रहाणे हेच मनुष्याचे कर्तव्य होय. गीताकाली चातुर्वर्ण्यव्यवस्था अमलात होती. या कारणामुळे ही सामाजिक कर्मे चातुर्वर्ण्यविभागाप्रमाणे प्रत्येकास प्राप्त होतात, असे म्हटले असून अठराव्या अध्यायात 'गुणकर्मविभागशः' हे भेद कसे निष्पन्न होतात ते सांगितले आहे.

पण, तेवढ्यावरून गीतेतील नीतितत्त्वे चातुर्वर्ण्यरूपी समाजव्यवस्थेवरच अवलंबून आहेत असे कोणी समजू नये. अहिंसादी नीतिधर्मांची व्याप्ती चातुर्वर्ण्यापुरतीच नसून, हे धर्म मनुष्यमात्रास सामान्यतःच प्राप्त आहेत, ही गोष्ट महाभारतकारांच्या पूर्ण लक्षात आलेली होती. म्हणून चातुर्वर्ण्याबाहेरच्या ज्या अनार्य लोकांत हे धर्म चालू असतात, त्या लोकांचे राजाने जे रक्षण करावयाचे, ते या सामान्य धर्माप्रमाणेच केले पाहिजे असे भारतात स्पष्ट म्हटले असून, गीतेतील नीतीची उपपत्ती चातुर्वर्ण्यादी कोणत्याच एखाद्या विशिष्ट समाजव्यवस्थेवर अवलंबून न ठेविता, सर्वसामान्य आध्यात्मिक ज्ञानाच्या आधारे प्रतिपादिली आहे. शास्त्रतः प्राप्त झालेले कर्तव्य निष्काम व आत्मौपम्य बुद्धीने केले पाहिजे, हे गीतेतील नीतिधर्माचे मुख्य सार होय; व हे सर्व देशातील लोकास एकसारखेच लागू पडते. पण आत्मौपम्य दृष्टीचे व निष्काम कर्माचरणाचे हे सामान्य नीतितत्त्व जरी सिद्ध झाले, तरी ते ज्या कर्मास लागू करावयाचे, ती कर्मे या जगात प्रत्येकास कशी प्राप्त होतात, याचाही काही खुलासा करणे जरूर होते. म्हणूनच ते सांगण्यास, तत्काली लागू पडणारे साहजिक उदाहरण या नात्याने, चातुर्वर्ण्याचा गीतेत उल्लेख केलेला आहे; व त्याबरोबर गुणकर्मविभागाने त्या समाजव्यवस्थेची थोडक्यात उपपत्तिही दिली आहे.

पण, हा काही गीतेचा मुख्य भाग नसून, चातुर्वर्ण्यव्यवस्था जर कोठे चालू नसेल किंवा लंगडी पडली असेल, तर तेथे सुद्धा तत्काली अंमलात असलेल्या समाजव्यवस्थेप्रमाणे समाजधारणपोषणाची जी जी कर्मे आपणास प्राप्त होतील, ती ती लोकसंग्रहार्थ धैर्योत्साहाने व निष्काम बुद्धीने कर्तव्य म्हणून करण्यासाठी मनुष्य जन्मास आला आहे – केवळ सुखोपभोगार्थ नव्हे — असा सर्व गीताशास्त्राचा व्यापक सिद्धान्त आहे. गीतेतील नीतिधर्म केवळ चातुर्वर्ण्यमूलक आहे असे जे कित्येकांचे म्हणणे आहे ते खरे नव्हे, हे लक्षात ठेविले पाहिजे. समाज हिंदूंचा असो वा म्लेंच्छांचा असो, प्राचीन असो वा अर्वाचीन असो, पौरस्त्य असो वा पाश्चिमात्य असो, त्यात चातुर्वर्ण्यव्यवस्था अंमलात असल्यास त्याप्रमाणे किंवा दुसरी समाजव्यवस्था अंमलात असेल तर त्याप्रमाणे, जे काम आपणास प्राप्त झाले, अथवा शक्य असल्यास आपल्या अभिरुचीप्रमाणे आपण कर्तव्य म्हणून एकदा पत्करिले, तेच आपला स्वधर्म बनते; आणि तो धर्म सोडून देऊन कोणत्याही सबबीवर आयत्या वेळी कोणी दुसऱ्याचे काम करू लागणे, हे धर्मदृष्ट्या व सर्वभूतहितदृष्ट्या गर्ह्य होय, असे गीता सांगत आहे.'

या उताऱ्यावरून हे स्पष्ट दिसून येईल की, गीतेतील कर्मयोगशास्त्र हे भगवंताने केवळ वैदिक किंवा हिंदु समाजाला सांगितलेले नसून, अखिल मानव जातीला सांगितलेले आहे, अशी टिळकांची श्रद्धा होती. अशा विशाल जाणिवेने गीतेचे रहस्य विशद करणारे लोकमान्य हे तिचे पहिले भारतीय भाष्यकार होत.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीही, 'भावार्थदीपिके'च्या शेवटल्या अध्यायात, असे 'पसायदान' मागितलेले आहे की,——

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हे ।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।
दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।

त्यावरून असा भास होतो की, गीता सर्व मानवजातीसाठी सांगितलेली आहे, अशीच महाराजांचीही भावना असावी. पण तो अखेर भासच ठरतो. ज्ञानेश्वरमहाराज हे सर्वथैव सांप्रदायिक होते. गुरुभक्ती, पंथनिष्ठा, पूर्वाचार्यांचे मार्गदर्शन आणि वैदिक धर्मावरील परंपरागत श्रद्धा अशा चार मर्यादा त्यांच्या गीतेवरील भाष्याला पडलेल्या होत्या. त्यांची गुरुभक्ती इतकी काही उत्कट होती की, ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायांतील मंगलाचरणात त्यांनी——

आतां देईजो अवधान । तुम्हीं बोलविल्या मी बोलेन ।
जैसें चेष्टे सूत्राधीन । दारुयंत्र ।।

अशा रीतीने स्वतःला कळसूत्री बाहुलीची उपमा दिलेली आहे. त्याचप्रमाणे, अठराव्या अध्यायातील समारोपात, त्यांनी——

तैसा व्यासाचा मागोवा घेतु । भाष्यकाराते वाट पुसतु ।
अयोग्यही मी न पवतु । कें जाईन ।।

अशीही कबुली प्रांजळपणाने दिलेली आढळते. अर्थात् काही तात्त्विक बाबतीत शंकरादि आचार्यांशी जो त्यांचा मतभेद झाला, तो त्यांनी मर्यादेने नमूद केलेला आहे, ही गोष्ट खरी. तथापि, तो मतभेद, मुख्यतः महाराज हे नाथपंथीय असल्यामुळे, उद्‌भवलेला आहे, हे विसरून चालणार नाही. गीता ही अद्वैतवादी आणि निवृत्तिपर आहे, ही जी शंकराचार्यांची भूमिका, ती त्यांना पूर्णतया मान्य असून, फक्त ज्ञानप्रधान भक्तियोगावर त्यांचा भर आहे, एवढाच फरक दाखवता येईल. वैदिक धर्मावरील श्रद्धेबद्दल तर बोलावयालाच नको. श्रुति या स्त्री–शूद्रांना पाठमोऱ्या झाल्याबद्दल जरी त्यांनी——

वेद संपन्न होय ठायीं । परी कृपण ऐसा आन नाहीं ।
जे कानीं लागला तिहीं । वर्णांच्याचि ।।

अशा रीतीने त्यांना दोष दिलेला असला, तरी, "नाहीं श्रुतिपरौती । माउली जगा" अशीच त्यांची वेदांविषयी भावना होती. त्यामुळे, चातुर्वर्ण्याधिष्ठित वैदिक धर्म आणि जातिघटित हिंदु समाज यांच्या आचारधर्मांचे परिपालन करण्याच्या बाबतीतील त्यांचा कटाक्ष जागोजाग प्रकट झालेला दिसतो. अर्थात्, परमेश्वराला 'विश्वात्मक' म्हटल्याने आणि 'विश्व स्वधर्मसूर्यें पाहो' असे पसायदान त्याच्याजवळ मागितल्यानेही, महाराजांच्या संकुचित भूमिकेच्या या सांप्रदायिक आणि धार्मिक मर्यादांची तीव्रता काही कमी होत नाही. ज्ञानेश्वर जितके गुरुभक्त आणि सांप्रदायिक, तितकेच टिळक स्वतंत्रप्रज्ञ आणि धर्मपंथातीत होते. त्यांचे सर्व आयुष्य जगातल्या निरनिराळ्या धर्मांचे तत्त्वज्ञान आणि इतिहास यांचा व्यासंग आणि चिंतन करण्यात गेलेले होते; व त्या धर्मांच्या तत्त्वज्ञानांचा जगाच्या इतिहासावर झालेला परिणाम, आपल्या स्वतःच्या देशाच्या पारतंत्र्याच्या रूपाने, ते प्रत्यक्ष अनुभवीत होते. त्यामुळे, गीतेसारख्या आपल्या धर्मातील सर्वश्रेष्ठ ग्रंथाचे रहस्य विशद करताना, धर्मनिरपेक्ष आणि राष्ट्रनिरपेक्ष अशी त्यांची अत्यंत विशाल भूमिका असावी, यात आश्चर्य नाही. म्हणून, गीता हा अखिल मानव जातीला सर्व परिस्थितीत आपल्या कर्माकर्मांचे मार्गदर्शन करणारा सार्वकालिक, सार्वदेशीय आणि सार्वधर्मीय ग्रंथ आहे, अशा भावनेने त्यांनी हे अभिनव भाष्य तिच्यावर लिहिले.

'गीतारहस्या'च्या या अद्वितीय वैशिष्ट्याचा विचार करताना, त्याच्या अर्पणपत्रिकेतील आणखीही एक महत्त्वाचा निर्देश ध्यानात घ्यावयाला हवा. ज्ञानेश्वरमहाराजांनी 'पसायदान' मागतांना, आता 'विश्वात्मके देवे' अशा शब्दांनी, परमेश्वराची आळवणी केलेली आहे. ती यथार्थच म्हणावी लागेल. कारण, ईश्वर हा सर्वांतरात्मा, सर्वभूतात्मा आणि विश्वात्मा असल्याचे इतर कोणत्याही धर्मात नसलेले प्रमेय वैदिक कालापासून आपल्या धर्माने प्रतिपादन केलेले असून, आज विज्ञानानेही पर्यायाने त्या प्रमेयाला मान्यता दिलेली आहे. तथापि, टिळकांनी 'गीतारहस्या'च्या अर्पणपत्रिकेत परमेश्वराचे वर्णन 'श्रीशाय जनतात्मने' या शब्दांनी जे केलेले आहे, ते त्यांच्या स्वतःच्या जीवनकार्याचे द्योतक आहे, हे कोणाच्याही सहज ध्यानात येईल. 'श्रीश' आणि 'जनतात्मा' हे जे दोन शब्द

त्यांनी योजलेले आहेत, त्यात त्यांच्या सर्व राजकीय आणि राष्ट्रीय कार्याचे मर्म ग्रथित झालेले आहे. लोकशाहीचे जे राजनैतिक तत्त्व आज जगात सर्वमान्य झालेले आहे, त्या तत्त्वात जनता ही सर्व संपत्ती आणि सत्ता यांचे उगमस्थान, केंद्रस्थान आणि स्वामी मानलेली आहे. टिळकांनी परमेश्वराला 'श्रीश' म्हटलेले आहे आणि 'जनतात्मा' ही म्हटलेले आहे. तो 'श्रीश' आहे याचा अर्थ, गीतेनुसार, सर्व संपत्ती आणि सत्ता यांचा तो उगम, केंद्र आणि स्वामी आहे, असा होतो. तसाच, तो 'जनतात्मा' ही असल्यामुळे, त्याचे हे ऐश्वर्य आणि अधिकार जनतेकडे आपोआपच जातात. अशा रीतीने, आधुनिक लोकशाहीच्या तत्त्वज्ञानातील पायाभूत सिद्धांत, 'गीतारहस्या'च्या अर्पणपत्रिकेतल्या या दोन विशेषणात, अत्यंत मार्मिक रीतीने, अंतर्भूत करण्यात आलेला आहे. टिळकांचे देहावसान झाल्यानंतर, ता. ४ ऑगस्ट १९२० रोजी, आपल्या 'यंग इंडिया' साप्ताहिकामध्ये, त्यांच्यावर लिहिलेल्या मृत्युलेखात म. गांधी यांनी असे विधान केलेले होते की, "टिळक हे जन्मजात लोकशाहीवादी होते. बहुमताच्या राज्यावर त्यांचा असा काही विलक्षण विश्वास होता की, तो पाहून मी घाबरून जात असे." (He was a born democrat. He believed in the rule of majority with an intensity that fairly frightened me). साहजिकच आहे. स्वतः महात्माजी हे लोकशाहीचे पुरस्कर्ते असले, तरी टिळकांप्रमाणे त्यांचा काही तिच्यावर अढळ विश्वास नव्हता; व स्वतःचे मत प्रसंगी बाजूला ठेवून, लोकमतानुसार वागण्याची किंवा लोकमताला बरोबर घेऊन जाण्याचीही त्यांची प्रवृत्ती नव्हती. "सत्यासत्यासी मन केले ग्वाही। मानियेले नाही बहुमता", या श्रीतुकाराममहाराजांच्या उक्तिनुसार, ते स्वतःप्रमाण होते; – आपल्या 'आंतर वाणी'च्या (Inner voice) आदेशानुसार, जरूर तर लोकमत ठोकरून देऊनही, बेगुमानपणाने वागणारे मनस्वी नेते होते. १९२० च्या बारडोलीच्या संकल्पित सत्याग्रहापासून तो 'भारत छोडो'च्या शेवटल्या लढ्यापर्यंत त्यांनी, अनेक वेळा ऐन प्रसंगी माघार घेऊन किंवा चळवळीला भलते स्वरूप दिल्याबद्दल लोकांचा धिक्कार करून, त्यांचा जो अवसानघात आणि तेजोभंग केला, तो त्यांच्या या आत्मकेंद्रित अहंनिष्ठ वृत्तीमुळे! उलट, टिळक हे अनेक महत्त्वाच्या प्रसंगी, स्वतःचे वैयक्तिक मत इरेला न घालता, बहुमताला योग्य मान देऊन, तडजोडीचा मार्ग काढीत असत, हे सर्वश्रुतच आहे. जनतेचा अवसानघात किंवा तेजोभंग तर त्यांनी कधीच केला नाही. त्यांच्या पूर्वायुष्यात लोकच्छंदानुवर्तित्वाचा, म्हणजे स्वस्त लोकप्रियतेच्या मागे लागल्याचा, जो आरोप आगरकरांसारख्या सुधारकाग्रणींनी किंवा सर फेरोजशहा मेहतांसारख्या नेमस्ताग्रणींनी, सामाजिक आणि राजकीय बाबतीत, वारंवार त्यांच्यावर केला, तो याच कारणामुळे! पण, महात्माजींनी म्हटल्याप्रमाणे, त्यांचा लोकशाहीवर इतका दृढ विश्वास होता की, लोकमताला बरोबर घेऊन चालण्याचे आणि त्यासाठी त्याच्याशी जुळते घेण्याचे आपले धोरण त्यांनी कधीही सोडले नाही. "लोकसंग्रहमेवाऽपि संपश्यन् कर्तुमर्हसि" या भगवदुक्तीचे मर्म आणि व्याप्ती ही दोन्ही ध्यानात घेऊन टिळकांनी लोकशाहीचे वळण आपल्या देशातील जनतेला लावण्याचा प्रयत्न आमरण चिकाटीने केला. अशा या श्रेष्ठ लोकाग्रणीने, कर्मयोगशास्त्राची शिकवण लोकांना देण्यासाठी, आयुष्याच्या अखेरच्या दिवसात लिहिलेला 'गीतारहस्य' हा ग्रंथ 'जनतात्मा' जो 'श्रीश' त्याला अर्पण करावा, हे स्वाभाविक होय.

'गीतारहस्या'च्या उपसंहारात प्रकट झालेले टिळकांचे हे विचार किंवा त्याच्या अर्पणपत्रिकेत व्यक्त झालेला त्यांचा लोकशाहीवरील विश्वास हे तो ग्रंथ वाचलेल्या किती आधुनिक सुशिक्षितांच्या लक्षात आले असतील, हे सांगणे कठीण! तथापी, गीता ही निवृत्तिपर असल्याच्या गेली दीड हजार वर्षे चालत आलेल्या परंपरागत प्रमेयाचे आणि त्याबरोबरच श्रीशंकराचार्यांच्या संन्यासवादाचे जे अत्यंत सडेतोड खंडन त्यांनी या ग्रंथात केलेले होते, ते पाहून सावध झालेल्या आणि चिडलेल्या धर्ममार्तंड काशिनाथशास्त्री लेले आणि आचार्यभक्त विष्णुशास्त्री बापट यांच्यासारख्या सनातनी पंडितांपासून तो प्रो. चि. गं. भानू आणि रा. ब. य. ग. कोल्हटकर यांच्यासारख्या आधुनिक विद्वानांपर्यंत 'गीतारहस्या'च्या पुराणमतवादी टीकाकारांचे डोळे मात्र खाडकन उघडले; व 'ओरायन' आणि 'आर्क्टिक होम इन दी वेदाज' हे दोन संशोधनात्मक इंग्रजी प्रबंध पूर्ववयात लिहून टिळकांनी जसे वेदांचे

अपौरुषेयत्व, आपले गुरुतुल्य स्नेही प्रो. श्री. ग. जिनसीवाले यांच्याप्रमाणे, पर्यायाने आपल्यालाही मान्य नसल्याचे सूचित केले, तसेच गीतेवरील सगळी जुनी भाष्ये आणि त्यात प्रतिपादन केलेले अनेक परंपरागत सिद्धांत हेही आपल्याला मान्य नसल्याचे त्यांनी उत्तरवयांत 'गीतारहस्य' लिहून लोकांच्या प्रत्ययास आणून दिले, असा त्यांचा ग्रह झाला. त्यामुळे, टिळकांसारख्या "'अश्वमूत्र' म्हणजे सोडावॉटर पिणाऱ्या आणि संध्यावैश्वदेवादी नित्य ब्रह्मकर्म न करणाऱ्या लुप्तसंस्कार ब्राह्मणाला गीतेवर लिहिण्याचा अधिकार नाही," "टिळक हे अवैदिक, अज्ञेयवादी आणि नास्तिक आहेत",–– किंबहुना "ते ब्राह्मण नसून ब्रम्हराक्षस आहेत", अशी निरर्गल विधाने जाहीर रीतीने करण्यापर्यंत या जुन्या शास्त्रीमंडळीची मजल गेली. १९१८च्या मार्चमध्ये टिळक विलायतेस जावयाला निघाले, तेव्हा मुंबईतील ब्रह्मवृंदाने त्यांना वेदमंत्रपूर्वक विधियुक्त निरोप देऊन त्यांचे यशश्चिंतन करावे, असा प्रयत्न मुंबईतील दक्षिणी ब्राह्मण सभेच्या डॉ. नानासाहेब देशमुख, श्रीमंत अण्णासाहेब नेने यांच्यासारख्या तत्कालीन प्रमुखांनी केला. पण, वैद्यतीर्थ आप्पाशास्त्री साठे यांच्यासारख्या सनातनी मंडळींनी, परदेशगमन आणि समुद्रोल्लंघन निषिद्ध असल्याची सबब सांगून, त्याला विरोध केल्यामुळे, शेवटी घसबाडीतील हरिबुवांच्या राममंदिरात अगदी मोजक्या वैदिकांकडून हा समारंभ खाजगी रीतीने उरकून घेण्यात आला. मी त्या समारंभाला उपस्थित होतो. त्यामुळे या वादाची पार्श्वभूमी मला प्रत्यक्ष माहित आहे. 'गीतारहस्या-' मुळे जुन्या सनातनी समाजात टिळकांविषयी किती तीव्र अप्रीती आणि असंतोष उत्पन्न झालेला होता, हे या घटनेवरून स्पष्ट दिसून येते.

१८९१ च्या जानेवारीत संमति वयाच्या बिलासंबंधी जे तुमुल वादरण महाराष्ट्रात सुरू झाले, त्या वादरणात, "हे तुमचे पुढारी नव्हत" या आपल्या 'सुधारक' साप्ताहिकातील अग्रलेखात, टिळकांचे सार्वजनिक जीवनातील पहिले सहकारी आणि 'केसरी'चे पहिले संपादक कै. गोपाळराव आगरकर यांनी असे उद्गार काढलेले होते की, "जुन्या लोकांस आम्ही विनयपूर्वक आणि खात्रीपूर्वक असे कळवितो की, त्यांनी प्रो. जिन्सीवाले व प्रो. टिळक अशा लोकांस आपले पुढारी समजू नये ज्याप्रमाणे आमच्या मतात व त्यांच्या मतात थोडासा फरक असल्यामुळे त्यांची सुधारकात गणना करता येत नाही असे नाही, त्याप्रमाणे जुन्या लोकांच्या आणि त्यांच्या मनात जी अल्प साम्यता आहे, तीमुळे ते जुन्या लोकांचे अग्रणी होऊ शकत नाहीत. हा इशारा त्यांनी विशेषत: प्रो. टिळक यांच्या संबंधाने ध्यानात ठेवण्यासारखा आहे. कारण रा. रा. बाळ गंगाधर टिळक हे प्रसंग पडल्यास प्रो. जिन्सीवाले यांच्यापुढे जातील. इतकेच नाही, तर जातिबाहुल्यामुळे अगोदर जेरीस आलेल्या या हतभाग्य देशात अधिक जाति होऊ नयेत, म्हणून कायद्याने किंवा लोकमताने जेवढ्या सुधारणा साऱ्या लोकांस ग्राह्य होतील, तेवढ्या करण्याचे हे दिवस आहेत. असे म्हणणाऱ्या आमच्यासारख्यापुढेही दोन पावले जाण्यास हे डरणारे नाहीत, हे थोड्या दिवसापूर्वी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या स्वदस्तुरच्या विनंतीपत्रावरून कोणाच्याही लक्षात येण्यासारखे आहे. रा. टिळकांच्या आणि त्यांच्या प्रतिपक्ष्यांच्या विचारात व स्वभावात केवढाही भेद असला, तरी त्यांना एवढे कबूल करणे भाग आहे की, जी गोष्ट एकदा टिळकांच्या मनास रास्त अशी वाटली, तिचा ते कितीही नुकसान झाले आणि केवढाही लोकापवाद आला, तरी प्रत्यादेश करणार नाहीत. हा त्यांचे अंगी प्रशंसा करण्यासारखा गुण आहे. तेव्हा जुन्या पद्धतीच्या लोकांस आम्ही असे विचारतो की, टिळकांचे सुधारणाविषयक विचार आणि ते अंमलात आणण्यासाठी त्यांनी चालवलेले प्रयत्न यांपैकी किती लोकांस अभिमत आहेत?"

पाऊणशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील पुराणमतवादी सनातनी पक्षाला आगरकरांनी टिळकांच्या बाबतीत दिलेला हा इशारा, 'गीतारहस्य' प्रसिद्ध झाल्यानंतर, अगदी यथार्थ असल्याचे त्या पक्षाच्या श्री. काशिनाथशास्त्री लेले, श्री. विष्णुशास्त्री बापट, श्री. आप्पाशास्त्री साठे, प्रो. चिं. गं. भानु, रा. ब. य. ग. कोल्हटकर यांच्यासारख्या पुढाऱ्यांच्या प्रत्ययाला आले. महाराष्ट्रातील सुधारक पक्ष हा इंग्रजी राज्याचा म्हणजेच

पर्यायाने पारतंत्र्याचा पुरस्कर्ता आहे, असा अनुभव आल्यामुळे टिळकांनी त्या पक्षावर जे हत्यार धरले, त्याचा परिणाम असा झाला की, टिळक हे सनातनी, पुराणमतवादी आणि समाजसुधारणाविरोधी आहेत, अशी त्यांच्याविषयी समजूत होऊन गेली; व लोकांना बरोबर घेऊन जाण्यासाठी प्रसंगी तडजोड करण्याच्या त्यांच्या लोकमतानुवर्ती धोरणामुळे, त्यांच्याविषयीचा हा ग्रह दृढ होऊन गेला. पण, 'गीतारहस्य' प्रसिद्ध झाल्यावर, टिळक हे तार्किक बाबतीत अगदी टोकाला जाणारे मूलगामी (Radical) तत्त्वनिष्ठ विचाराग्रणी आहेत, ही गोष्ट जुन्या सनातनी पक्षाच्या पुरेपूर निदर्शनास येऊन गेली. कारण, या देशात गेली दोन अडीच हजार वर्षे जी निवृत्तिपर नैष्कर्म्यवादी विचार-प्रणाली रूढ होऊन गेलेली होती, तिचा 'गीतारहस्या'ने समूळ उच्छेद केला.

टिळकांच्या विभूतिमत्वावर रुचिर प्रकाश पाडणारा त्यांच्या चरित्रातील आणखी एक योगायोग लक्षात घेण्यासारखा आहे. १८८७ च्या ऑक्टोबरमध्ये, सामाजिक सुधारणा कोणत्या परिस्थितीत आणि कशा पद्धतीने करावी, यासंबंधीचे आगरकरांचे आणि त्यांचे मतभेद विकोपाला जाऊन, आगरकरांनी 'केसरी'-च्या संपादकत्वाचा राजिनामा दिला; व तेव्हापासून सामान्यतः १८९५ सालापर्यंत जे वाद या बाबतीत निरनिराळ्या निमित्तानी झाले, त्या सर्व वादात टिळक हे सामाजिक सुधारणेच्या चळवळीचे विरोधक म्हणूनच महाराष्ट्रात गाजले. पण, चमत्कार असा की, याच धामधुमीच्या कालावधीत, वेदांचा काल निश्चित करण्यासाठी त्यांचे वाचन, चिंतन आणि संशोधन चालू होते. याचा अर्थ असा की, ज्या वेळी ते त्या काळातील सामाजिक आणि राजकीय संघर्षात ईर्ष्येने भाग घेत होते, त्याच वेळी अनादि आणि अपौरुषेय मानल्या गेलेल्या वेदांचा काल म्हणा किंवा त्या अति प्राचीन काळातील आर्यांचे मूळचे निवासस्थान म्हणा ही दोन्ही निश्चित करण्याच्या संशोधनात तितकेच व्यग्र झालेले होते. कर्मयोग्याचे मुख्य लक्षण म्हणून मनाची जी साम्यावस्था पुढे त्यांनी 'गीतारहस्या'त वर्णन केली, ती याच वेळी ऐन तारुण्यात त्यांना साध्य झालेली होती, याचे हे उत्कृष्ट प्रत्यंतर होय. प्रो. डॉ. मॅक्समुल्लर प्रभृति पाश्चात्य वैदिक पंडितांनी, १८९६ साली राज-द्रोहाच्या पहिल्या खटल्यात, त्यांना झालेली शिक्षा माफ करून, त्यांची तुरुंगातून मुक्तता करण्याविषयी जो अर्ज ब्रिटिश सरकारकडे पाठविलेला होता, त्यांत असे म्हटले होते की, "टिळकांचे मन हे वर्तमान काळापेक्षा गत-काळातच जास्त गुंतलेले आहे." प्रो. डॉ. मॅक्समुल्लर यांचे हे त्यांच्याविषयीचे प्रथमदर्शनी चमत्कारिक वाटण्यासारखे विधान किती वास्तविक होते, याचाही मनोज्ञ प्रत्यय त्यांच्या या तत्कालीन दुहेरी व्यापावरून आपल्याला येतो. कार्य वर्तमानकाळात आणि मन भूतकाळांत, अशी ही टिळकांची मन:स्थिती वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच झालेली असावी, असे दिसते. त्याहीपेक्षा महत्वाची गोष्ट ही की, अशा रीतीने परस्परविरुद्ध अशा सर्वथैव भिन्न व्यवसायात त्यांचे मन एकाच वेळी गढलेले असताना देखील, त्यांच्या या दोन्ही बाबतीतील एकाग्रतेत किंवा कार्यक्षमतेत यत्किंचितही अंतर कधी पडले नाही.

गणिति संशोधक टिळकांनी हाती घेतलेले वेदकालनिर्णय आणि पंचांगसुधारणा हे दोन्ही प्रश्न वेद अनादि आणि पंचांग अपरिवर्तनीय मानणाऱ्या आपल्या पुराणमतवादी समाजाला मुळीच मान्य होण्याजोगे नव्हते. पण, आश्चर्याची गोष्ट अशी की, १८९१ च्या जानेवारीत सम्मति वयाच्या बिलाचा वाद चालू असता आणि त्या वादांत टिळक हे सनातनी पक्षाचे मुखंड म्हणून आघाडीवर असता, त्यांनी मे महिन्यात प्रथम डेक्कन कॉलेजात आणि नंतर हिराबागेत वेदकालनिर्णय या विषयावर व्याख्याने देऊन, आपल्या 'ओरायन' या आगामी इंग्रजी प्रबंधातील अभिनव प्रमेये लोकांपुढे मांडली. आपले हे संशोधन वेदांच्या अनादित्वावरील सनातनी समा-जाच्या अढळ श्रद्धेला जबरदस्त धक्का देणारे आहे, अशी शंका सुद्धा त्यांच्या मनाला, ही व्याख्याने देताना, शिवलेली दिसत नाही. त्याहिपेक्षा आचंबा करण्या-सारखी गोष्ट ही की, टिळक हे अशा रीतीने वेदांचे अनादित्व आणि अपौरुषेयत्व यांच्यावर ठाराघात करीत आहेत, हा प्रकार काही सनातनी पक्षाच्या त्या वेळी तरी लक्षात आलेला नसावा. पण, म्हणून काही टिळकांच्या या दोन भूमिकांतील विसंगति लपत नाही. पण विसंगति तरी कशी म्हणावी? आगरकरांनी सनातनी पक्षाला इशारा दिल्याप्रमाणे, टिळक हे प्रत्येक बाबतीत तार्किक पद्धतीने टोकाला म्हणजे प्रत्येक गोष्टीच्या मळापर्यंत जाणारे 'रॅडिकल'

असल्यामुळे, त्यांनी वेदातील जोतिर्विषयक उल्लेखांनुसार, त्यांचा काळ ठरविण्याचा प्रयत्न करावा किंवा वृप्रत्ययानुसार पंचांगाची सुधारणा करण्याचा प्रश्न हाती घ्यावा, यात विसंगत किंवा विस्मयकारक काहीच नाही. निपुत्रिकाने दत्तक न घेता आपली सर्व मिळकत सार्वजनिक कार्याला द्यावी किंवा विधुरानेही विधवेप्रमाणे पुनर्विवाह न करता समाजसेवेत आयुष्य घालवावे, अशा प्रकारची मते प्रतिपादन करण्यात टिळकांची जी प्रत्येक बाबतीत तार्किक टोकाला जाण्याची प्रवृत्ती व्यक्त झालेली होती, तिचाच हे संशोधन हाही एक आविष्कार होय. टिळक हे बौद्धिक क्षेत्रात 'रॅडिकल' म्हणजे मूलगामी तार्किक आणि व्यावहारिक क्षेत्रात 'डेमोक्रॅट' म्हणजे तडजोडीने वागणारे लोकशाहीवादी होते. लोकशाही म्हटली, म्हणजे लोकाराधन आणि लोकरंजन हे ओघालाच येते: व ते करण्यासाठी, अनेक प्रसंगी, स्वत:ची मते बाजूला ठेवून, इतरांशी जुळते घेण्याचा, तात्त्विक आणि तार्किक दृष्टचा, गौण मार्ग पत्करावा लागतो. या गौणत्वाचे राजकारणातले ठळक उदाहरण द्यावयाचे झाले, तर ते स्वातंत्र्याच्या ध्येयाचे देता येईल. स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकर यांच्यापेक्षा टिळक कमी स्वातंत्र्यप्रेमी आणि स्वातंत्र्यवादी होते, असे म्हणावयाला कोण धजेल ? तरी देखील पूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाचा पुरस्कार किंवा प्रचार त्यांनी कधी केला नाही. या बाबतीतील आपली व्यवहार्य भूमिका सावरकर, विपिनचंद्र पाल आणि अरविंद घोष या तिघांनाही त्यांनी अगदी स्पष्ट शब्दांनी विशद करून सांगितलेली होती. एरवी इतके करारी आणि झुंजार असलेले टिळक जे सनातनी पक्षाशी काय, नेमस्त पक्षाशी काय, मुस्लिम लीगशी काय किंबहुना खुद्द ब्रिटिश सरकारशी सुद्धा काय, प्रसंगी तडजोड करताना दिसतात, ते याच कारणामुळे ! या आपल्या कार्यैकलोभी, लोकसंग्राहक, लवचिक राजनीतीला, आयुष्याच्या अगदी अखेरच्या दिवसात, त्यांनी 'प्रतिसहकार' (responsive cooperation) असे अर्थपूर्ण नाव दिलेले होते; व या नीतीनुसार, १९१६ पासून १९२० पर्यंत, कॉंग्रेसची जी अधिवेशने लखनौपासून अमृतसरपर्यंत झाली, त्यात ना. श्रीनिवास शास्त्री, बॅ. जिना, डॉ. बेझंट, म. गांधी, देशबंधु दास प्रभृती नेत्यांशी त्यांनी तडजोड केली. त्याबद्दल श्री. सत्यमूर्ति, दिवाण चमनलाल किंवा श्री. हॉर्निमन यांच्यासारख्या नवीन पिढीतल्या जहाल तरुण कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर मवाळ झाल्याचे आरोप जाहीर रीतीने केले. त्याचप्रमाणे, बॅ. जिना यांचे सहकार्य संपादन करून, 'कॉंग्रेस-लीग स्कीम' या नावाने प्रसिद्ध असलेला जो करार त्यांनी मुस्लिम लीगशी, लखनौ येथे, घडवून आणला, त्यांत मुसलमानांना वाजवीपेक्षा जास्त हक्क देण्यात आलेले आहेत, असाही आक्षेप घेण्यात आला. पण असल्या कोणत्याच आक्षेपांची किंवा आरोपांची त्यांनी पर्वा केली नाही. कारण, स्वराज्याचा लढा निकराने चालवण्यासाठी अवश्य असलेली संयुक्त आघाडी कायम टिकवणे, हे एकमेव उद्दिष्ट ही शेवटली पाच वर्षे त्यांच्या डोळ्यांपुढे होते.

तथापि, 'गीतारहस्या'त मात्र अशा प्रकारची कोणतीही तडजोड किंवा विसंगती आढळत नाही. जणू टिळकांच्या तर्ककठोर, प्रभविष्णु प्रतिभेचे कैवल्य आणि सामर्थ्य म्हणजेच 'गीतारहस्य'! त्यांनी जन्मभर केलेली ज्ञानोपासना, आचरिलेला कर्मयोग आणि साधलेला लोकसंग्रह यांचे मर्म त्यांच्या या शेवटल्या ग्रंथात साठवलेले आहे. मानवांचा एक वंश म्हणा किंवा समूह म्हणा, उत्तरध्रुवावरील हिमप्रदेशातून परिभ्रमण करीत करीत, या सप्तसिंधूंच्या समशीतोष्ण समृद्ध भूमीत येऊन स्थायिक झाला. त्याने जी संस्कृती, जे अध्यात्म आणि जो इतिहास निर्माण केला, त्यांचा व्यासंग आणि चिंतन करून, टिळकांनी 'ओरायन', 'आर्क्टिक होम इन दि वेदाज्' आणि 'गीतारहस्य' हे तीन ग्रंथ लिहिले. त्यात मंदाले येथील बंदिवासाच्या दुर्धर एकांतात लिहिलेले 'गीतारहस्य' हा त्यांचा ग्रंथ शेखरीभूत होय. भगवंताने अर्जुनाला कुरुक्षेत्रावर उपदेशिलेल्या गीताशास्त्राचे सतत चाळीस वर्षे अध्ययन आणि मनन केल्यामुळे, "कालभेदानुरूप जे नवे स्फुरण" त्यांच्या प्रतिभेला झाले, त्याच्या अनुषंगाने त्यांनी आपले स्वत:चे जीवन–तत्त्वज्ञान या ग्रंथात विशद केले. त्या दृष्टीने 'गीतारहस्य' म्हणजे जरामरणाचे भय नसलेली लोकमान्यांची ज्ञानविज्ञानमय अविनाशी वाङ्मयमूर्तीच होय. श्रीसमर्थ रामदास यांनी, आपल्या देहावसानाच्या वेळी, शोकविव्हल झालेल्या दिङ्मूढ शिष्यांना असे आश्वासन दिले होते की,—

माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अन्त:करणीं ।
परी मी आहे जगज्जीवनीं । निरंतर

आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वत:सिद्ध असता न करावा खेद । भक्तजनीं

'गीतारहस्य' हे सुद्धा टिळकांचे 'स्वत:सिद्ध स्वरूप' आहे. त्याच्या प्रस्तावनेत त्यांनी असे उद्गार काढलेले आहेत की, "सर्व काली एकसारखेच लागू पडणारे म्हणजे त्रिकालाबाधित ज्ञान सांगणाऱ्या गीतेसारख्या ग्रंथाने कालभेदानुरूप नवे नवे स्फुरण मनुष्याला प्राप्त व्हावे, यात काही नवल नाही. कारण अशा व्यापक ग्रंथाचा हा धर्मच असतो." तदनुसार स्वत: टिळकांनी, बदलत्या काळाचे आव्हान स्वीकारून, हे नवीन भाष्य गीतेवर लिहिले; व भगवंताचा वरप्रसाद म्हणून हा 'राजगुह्याचा परिस' तरुण पिढीच्या हाती दिला. अशा या अलौकिक ग्रंथाचे वाचन आणि चिंतन केल्याने या अणुयुगात–ज्या वेळी आपला संहार होण्याची संभवनीयता मानवजातीला भेडसावीत आहे, त्या वेळी,– बुद्धीला खात्रीने नवीन स्फुरण प्राप्त होईल. "प्रवृत्ते शस्त्रसंपाते" अशा ज्या भीषण परिस्थितीत कुरु-क्षेत्रावर भगवंताने अर्जुनाला कर्माकर्माचा आणि धर्माधर्माचा हा उपदेश केला, ती परिस्थिती आज जगात पुन्हा उत्पन्न झालेली आपण पहात आहोत. अशा वेळी, त्या थोर लोकाग्रणीचा कोणी तरी समान-धर्मा नवीन पिढीत उदयाला येऊन, कालभेदानुरूप गीतेचे रहस्य पुन्हा नव्या दृष्टीने विशद करील आणि त्यांची निष्काम कर्मयोगाची परंपरा पुढे चालू ठेवील, अशी आशा, आज त्यांच्या या पुण्यतिथीच्या अर्ध शताब्दीच्या मंगल समयी, आपण करू या.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर : काही संस्मरणे

निवेदक : श्री. पु. य. देशपांडे व सौ. विमलाबाई देशपांडे
संकलक : प्रा. म. ल. वराडपांडे, नवी दिल्ली

[सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत श्री. पु. य. देशपांडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. विमलाबाई देशपांडे यांनी, त्यांचा मुक्काम सौ. इंदुमती शेवडे यांचेकडे दिल्लीला असताना, कै. श्रीपाद कृष्ण कोल्हट-करांच्या काही आठवणी मला सांगितल्या. सौ. विमला-बाई देशपांडे या कोल्हटकरांचे धाकटे बंधु श्री. दिगंबर कृष्ण कोल्हटकर यांच्या कन्या. त्या स्वत: बुद्धिमान विद्यार्थिनी व कवयित्री असल्यामुळे कै. श्रीपाद कृष्णांचा यांच्यावर विशेष लोभ होता. आपल्या क्रांतिकारी विचारांच्या जामातावर देखील त्यांचे प्रेम होते. कै. कोल्हटकरांचे देहावसान पुणे येथे श्री. पु. य. देशपांडे त्यांच्या मांडीवर डोके ठेवूनच झाले. यावरून या स्मरणांचे महत्त्व व अधिकृतता लक्षात यावी. मंगळवार दिनांक १६ जून रोजी संध्याकाळी या आठवणी त्यांनी मला सांगितल्या. दुसऱ्या दिवशी त्या संपूर्ण लिहून काढून सौ. विमलाबाईंना अवलोकनार्थ सादर केल्या. त्यांनी त्या काळजीपूर्वक वाचून, दुरुस्त्या करून व काही भर टाकून मला परत केल्या. 'युगवाणी'च्या वाचकांसाठी या आठवणी येथे देत आहोत. सोबत स्पष्टीकरणार्थ काही टीपा जोडल्या आहेत. त्यातील मजकूर मात्र माझा आहे.— म. ल. वऱ्हाडपांडे]

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर लहानपणी तोंडाला झालेल्या पक्षघातामुळे काहीसे बावळट दिसत असत.[१] त्यांना मुलगी कोण देणार ? म्हणून त्यांचा विवाह एका सामान्य व सुमार रूपाच्या मुलीशी करून देण्यात आला. त्यांना सर्व 'माई'[२] म्हणत. गृहिणी म्हणून त्या सर्वार्थाने सुयोग्य होत्या. सर्वांचे यथोचित स्वागत करणे, आदरातिथ्य करणे यात त्या कुशल होत्या.[३] घरात त्यांचा फार दरारा असे. सर्व मुले त्यांना अत्यंत वचकून असत. त्या अशिक्षित असल्या, तरी फार चतुर व हजरजबाबी होत्या. वेगवेगळ्या प्रकारच्या किती तरी म्हणी त्यांच्या जिभेवर असत आणि त्या त्यांचा वापर अचकपणे योग्य वेळी करीत.[४] विनोद आणि व्यंग्य यांचा 'तिरकस' उपयोग करण्यात त्या अत्यंत कुशल होत्या. त्यामुळे कोल्हटकरांचे एक मित्र त्यांना नेहमी गमतीने म्हणत, "तात्या, तुमच्या सगळ्या विनोदाचं उगमस्थान वहिनी आहेत हं !"

एकदा संध्याकाळी तात्यासाहेब बाहेरून आले तेव्हा घरात अंधार होता. त्यावद्दल तात्यांनी विचारलं, "काय ? घरात आज अंधार दिसतोय !" त्यावर माई उत्तरल्या, "माझी कुठेय बाई एवढी योग्यता ? की या खोलीतून त्या खोलीत फलाफला गेले की झगमगले दिवे ?"

कोल्हटकर हे केवळ विचारांनी सुधारक व आधुनिक नव्हते; तर त्यांनी निर्भयपणे हे विचार प्रत्यक्ष आचरणात आणले होते. महादेव गोविंद रानडे हे त्यांचे आदर्श ! वडिलांच्या मृत्यूनंतर केशवपन होऊ नये म्हणून स्वत:च्या सावत्र आईला त्यांनी आपल्याकडे आणून ठेवले. वडिल हयात असताना त्यांच्या दोघा बहणींचे विवाह वयाच्या पाचव्या सहाव्या वर्षीच झाले होते. वडिलांच्या मृत्युनंतर मात्र उरलेल्या दोघा बहिणींचे विवाह (बयाताई गोळवलकर व पिलूताई भागवत) कोल्हटकरांनी, सर्वांची टीका व विरोध झेलून, त्या १४ वर्षांच्या झाल्यावर केले. या वाढत्या मुलींकडे पाहून माई म्हणत, "या काजळाच्या डब्या आणि पिपळपानी आरसे कुठं खपणार आहेत ?" काजळाच्या डब्या, कारण त्या दोघींचे डोळे थोडे

खोल व काळेभोर होते आणि नाके खाली थोडीशी रुंद व फुगीर म्हणजे त्या काळच्या पिंपळपानी आरशासारखी होती. पण त्यांनी दोघी नणंदांना चांगले वागवले. त्या दोघीही नेहमी म्हणत की, वहिनींनी आम्हाला फार चांगले वागवले. माहेरपणासाठी नणंदा त्यांच्याच घरी आपुलकीने येत.

स्त्री–पुरुषांचे संबंध, त्यांच्या बौद्धिक साहचर्याबद्दलच्या कल्पना याविषयी कोल्हटकरांचे जे विचार होते, त्याला माई अनुरूप नसल्यामुळे कोल्हटकरांना त्या अर्थाने गृहसौख्य कधीच फारसे लाभले नाही. 'बंधनाच्या पलिकडे' या पु. य. यांच्या कादंबरीतील प्रेमाची कल्पना कै. कोल्हटकरांना फार आवडली होती. स्त्री व पुरुष हे काच पातळीवर असून त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. या व्यक्तिमत्वाबद्दलच्या परस्पर आदरावर व अनुरक्तीवर प्रेम अवलंबून असते. श्री. कोल्हटकरांनी ताबडतोब श्री. पु. य. देशपांडे यांना पत्र पाठवून या कल्पनेची प्रशस्ती केली. स्वतः सुधारक असूनही प्रेमाची इतकी विशाल कल्पना आपण करू शकलो नाही, असे त्यांनी प्रांजळपणे पत्रात लिहिले होते. कोल्हटकरांच्या प्रेमविषयक सौंदर्यवादी व बुद्धिवादी विचारांना त्यांची जीवनसहचरी अनुरूप नव्हती. अर्थात हा दोष माईंचा नव्हता. कारण सर्वसामान्यतः तत्कालीन स्त्रीवर्ग तसाच होता. पण त्यामुळे कोल्हटकरांचे मन 'घरात' रमले नाही, हे खरे. या दृष्टीने दोघात फार अंतर होते.[५] त्यात भर म्हणून माईंचे अगदी सामान्य रूप आणि शिक्षणाविषयीची उदासीनता.

कोल्हटकर हे संत वृत्तीचे पुरुष होते. आपणापासून इतरांना यत्किंचितही त्रास व्हावा, हे त्यांना खपत नसे. त्यांना पुणे येथे अखेरचा पक्षघाताचा झटका जेव्हा आला, त्या शेवटच्या ८।१० दिवसात त्यांची संपूर्ण सेवाशुश्रूषा त्यांचे जामात श्री. पु. य. देशपांडे यांनीच निरलसपणे केली. स्वतः काहीही करण्याचे त्राण त्यांच्यात राहिले नव्हते. बिछान्यावरच सर्व काही करावे लागे. त्या विकल अवस्थेत जावयांना सेवा करताना पाहून त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात. त्यांचा अंतकाल जवळ आला हे पाहून श्री. देशपांडे यांनी, "घरच्या मंडळींना बोलावायचे का तार करून?" असे विचारले. तेव्हा ते त्याही अवस्थेत बिछान्यावर ताडकन उठून बसले व आपला उरलेला एक धड हात जोराने हालवून 'नको! नको!' म्हणून त्यांनी सांगितले.

कोल्हटकर हे आस्तिकता व नास्तिकता यांच्या पलीकडे गेले होते.[६] पण अखेरच्या २।३ वर्षात ते 'ॐ'चा जप करीत असत. शेवटच्या पक्षघाताच्या झटक्यानंतर जणू कुणाला त्रास होऊ नये म्हणून ८।१० दिवसातच त्यांनी जावयाच्या मांडीवर मस्तक ठेवून प्राण सोडला.[७]

श्री. पु. य. देशपांडे व सौ. विमलाबाई यांच्या लग्नाचे देवदेवक श्री. कोल्हटकरांनी बसवले होते. त्यांनीच विमलाबाईंचे कन्यादान केले. जावयाचे पाय धुण्यासाठी म्हणून सीमांतपूजनाच्या वेळी कोल्हटकर उठले, तेव्हा श्री. देशपांडे यांनी 'आपण असे काही करू नका' असे आदरपूर्वक त्यांना सांगून शेजारच्या नळावरून ते पाय धुवून आले. हे पाहून कोल्हटकर त्यांना म्हणाले, "या एका कृत्याने आपण माझे हृदय जिंकले आहे."[८]

सौ. विमलाताईंना बालपणी आपल्या काकांचे, खामगावचे घर म्हणजे स्वर्ग वाटत असे. उन्हाळ्याची सुटी लागली की त्यांचा मुक्काम काकांकडे! चुलत भावंडात खेळताना त्या रंगून जात. त्या हायस्कूलमध्ये असताना सुटीमध्ये खामगावाला आल्या की तात्यासाहेब कौतुकाने त्यांना झोपाळ्यावर आपल्याजवळ बोलावून घेत व त्यांच्या मैत्रिणींबद्दल विचारीत. मग विमलाबाई सांगायच्या, 'किनई आमची मैत्रिण आहे न शांता म्हणून ती खूपच धीट आणि तडफदार हं तात्या.' मग ते हळूच विचारायचे, 'का ग तू माझं जन्मरहस्य' नाटक वाचलंस? त्यातील कांताचं कॅरेक्टर कसं वाटलं तुला? तुझ्या शांतासारखीच तडफदार आणि धीट आहे की नाही ती?'

तात्यासाहेबांची मुलं त्यांना फार वचकून असत. त्यामुळे चुलता पुतणीचा हा संवाद त्यांना आश्चर्यकारक वाटे. पण विमलाबाई त्या वेळी एक बुद्धिमान विद्यार्थिनी म्हणून गणल्या जात. म्हणून वयाचे अंतर विसरून तात्यासाहेब त्यांच्याशी चर्चा करीत. जेव्हा ही पुतणी कविता लिहू लागली, तेव्हा त्यांनी तिच्या दोन कविता 'मासिक मनोरंजना'कडे प्रसिद्धीसाठी पाठविल्या.

तात्यासाहेव कधीकधी 'स्मरणशक्तीचा एक खेळ' करून दाखवीत. एका मागून एक अशी पंचवीस वस्तूंची नावे सांगण्यास ते लावीत; व नंतर कोणत्याही आकड्याची वस्तू कोणती हे सांगा असे श्रोत्यांना

विचारावयास सांगत. तात्यासाहेब अचूकपणे वस्तू सांगत. या प्रयोगामागील युक्तीही त्यांनी स्पष्ट करून दाखविली. पंचवीस आकड्यांना प्रत्येकी एक स्पष्ट प्रतिमा मनात पक्की करायची. १. म्हणजे मी २. म्हणजे द्विजिव्ह अग्नी, ३. बिल्वदळ, ४. चव्हाटा, ५. पंचांग, ६. षडानन, इत्यादी. मग सांगितलेल्या वस्तूचा संबंध अत्यंत विसंगत व हास्यापद रीतीने त्या ठराविक प्रतिमेची जोडायचा. असे केल्याने वस्तू बरोबर सांगणे कधीही चुकत नाही. पंचांगावर बसलेला विंचू, षडाननाच्या हातात रिस्टवॉच अशा काही त्या वेळच्या वस्तू अजूनही विमलबाईंच्या स्मरणात आहेत. तात्यासाहेबांबरोबर हा स्मरणशक्तीचा खेळ विमलाबाईही सहज खेळत. पण याला स्मरणशक्तीचा खेळ म्हणण्यापेक्षा विसंगत व साहचर्याने स्मरण कसे पक्के होते हे दाखविण्याचा खेळ होता. विनोदाचार्य तात्यासाहेबांना तो शोभून दिसणारा होता.

तात्यासाहेबांना खाण्याचा विलक्षण सोस. ते उत्तम खवय्ये होते. पानावरून पूर्ण जेऊन उठल्यावरही स्वयंपाकघरातून खमंग वास आला की ते हळूच डोकावून म्हणणार, 'अरे वा ! लाडू का ? छान ! छान ! आणा बरं एक इकडे.' अखेरची दोन वर्षे ते आपले धाकटे बंधु श्री. दिगंबर कृष्ण कोल्हटकर (अण्णासाहेब) यांच्याकडे असत. अण्णासाहेबांचे आपल्या बंधूवर अतिशय प्रेम असे. त्या वेळी तात्यासाहेबांना रक्तदाबाचा विकार झाल्यामुळे त्यांच्या खाण्यावर अण्णासाहेबांचे विशेष लक्ष असे. त्यामुळे ते त्यांना वाटेल ते खाऊ देत नसत. एकदा करंज्या केल्या होत्या. वाढताना त्यांचं पान नेमकं टाकून विमलाबाई समोर गेल्या. ते कोल्हटकरांच्या लक्षात आले. लगेच ते म्हणाले, 'हा पंक्तिप्रपंच बरा नाही हं ! वाट पाहू मला ती करंजी. मला चुकवीत होतीस काय ? म्हंटलं माझे डोळे काही अजून इतके अधू झालेले नाहीत.' आंब्याच्या रसावर तर ते खूप ताव मारीत. त्यांचं पथ्यपाणी लक्षात घेऊन कोणी वाढायला अळंटळं करू लागले की, ते म्हणायचे, 'अरे, आंबा म्हणजे फ्रूट आहे आणि डॉक्टरांनी मला फ्रूटस् खायला सांगितली आहेत. वाढ आणखी.'

एकदा पुण्याला असताना कोल्हटकर हे अंगाला मालिश करण्याकरता जात. त्यांचा हा मालिशवाला मोठा मजेदार होता. मालिशच्या दरम्यान हातावर तेल घेण्यासाठी तो थोडा थांबायचा आणि तेवढ्यात एखादा ग्राम्य किस्सा तो कोल्हटकरांना सांगायचा. हास्याचा पूर ओसरला की, पुन्हा गंभीर मुद्रेने 'ज्ञानेश्वर माऊली, ज्ञानेश्वर माऊली' असे मुखाने म्हणत, जोरजोराने मालिश करू लागायचा. ग्राम्य विनोद आणि लगेच ज्ञानेश्वर माऊलीचे स्मरण यातील विसंगतीने कोल्हटकरांचे खूप मनोरंजन व्हायचे.

कोल्हटकरांचे डोळे अधू झाले होते, तरी त्यांची वाचनाची गती आणि आवड मंदावली नव्हती. ते फार वेगाने वाचत. घरच्या लोकांना त्यांना पुस्तके पुरविता पुरविता नाकी नऊ यावयाचे. त्यांच्या गतीला आळा घालण्यासाठी पुस्तकात घातलेली खूण मागे करून ठेवण्याची युक्ती त्यांचा पुतण्या नेहमी करी. मागे केलेल्या खुणेपासून वाचू लागले की, कोल्हटकर म्हणायचे, 'अरे हा भाग तर वाचलेला दिसतो.' मग खरी खूण सापडेपर्यंत ते वाचत जात.

कोल्हटकर वृत्तीने जितके आधुनिक तितकेच पोषाखाने पुराणपुरुष! अंगरखा, धोतर, रुमाल, उपरणे यांनी नटलेले. त्यांना हसू आलं की ते तोंडाला उपरणं लावून हसू लागत. मग आजूबाजूची मंडळी त्यांना विचारायची, 'काय झालं तात्यासाहेब, हसायला ?' मग ते सांगत व मग सर्व मंडळी हसू लागत. विनोदाच्या साह्याने त्यांनी स्वत:चे व इतरांचे रंजन करावे हा प्रसंग तर नित्याचाच. त्यामुळं त्यांचा सहवास सर्वांनाच हवा हवासा वाटे.

टीपा

१. श्रीपाद कृष्णांना वयाच्या ९ व्या वर्षी तोंडाचा अर्धांग वात झाला. त्यामुळे शरीराला बेडौलपणा आला. 'आपले शरीर जरी बेढब असले, तरी मन संपन्न करून त्याची उणीव आपणास भरून काढता येईल' असा विचार त्यांनी केला. (को. ले. संग्रह पृ. ४).

२. खामगाव येथील वकील वामनराव जोशी यांची कन्या. वयाच्या ७ व्या वर्षी १५ वर्षांच्या कोल्हटकरांशी यांचा विवाह झाला. यावरून त्यांचे जन्मसाल १८७९ हे येते. मृत्यु १२ मे १९४८.

३. "आपण आमच्या घरी रहावयाला आल्यावर माझी पत्नी किती विलक्षण सुग्रण आहे याचा अनुभव आपणास येईल. ती शिकली सवरलेली नाही आणि तिला वाङ्मयात काही कळतही नाही. पण इतकी प्रेमळ, पतिपरायण, कुटुंब-वत्सल, आतिथ्यशील आणि उदार स्त्री सहसा आढळणार नाही." श्री. माडखोलकरांजवळ कोल्हटकरांनी केलेले विधान–युगवाणी, जून ७०, पृ. १०४.

४. श्री. पु. य. देशपांडे यांनी 'native genius' ही संज्ञा त्यांचे वर्णन करताना वापरली होती.

५. संसाररथाचे एक चाक अस्सल पेशवाई थाटाचे, लहान, जड, ओबडधोबड तर दुसरे अस्सल इंग्रजी नमुन्याचे मोठे, हलके व सुबक. यामुळे चक्रात स्नेहाचे वास्तव्य असूनही त्यांची नेहमी कुरकुर चाले–'श्यामसुंदर' कादंबरी–कोल्हटकर.

६. 'You have won my golden opinion by this single act.' १९२५ मध्ये हा विवाह झाला. श्री. देशपांडे यांच्या वडिलांचे नावातील आद्याक्षरे वाय्. जी. ही होती. या प्रीति–विवाहाविषयी श्रीपाद कृष्णांची प्रतिक्रिया मांडतांना त्यांनी म्हटले, 'मिया बिबि राजी, तो क्या करेगा वाय्. जी. ? (युगवाणी, जून ७० पृ. ८८).

७. जन्मरहस्य १९१८.

८. युगवाणी जून ७० पृ. ५४ व पृ. ९६ व पृ. ९८ पहा.

९. 'आस्तिक की नास्तिक' हा परिच्छेद पहा युगवाणी जून ७० पृ. ४९. कै. काकासाहेब जोशी यांना कोल्हटकर कसल्या तरी मंत्राचा जप शेवटच्या काही दिवसात करीत असल्याचं आढळले. असा उल्लेख या परिच्छेदात आहे. 'ओम्' हा तो मंत्र होता.

१०. १ जून १९३४ रोजी सकाळी ६ वाजता.

११ सावित्रीकाकू, बनूताई, बयाबाई व पिलूताई या कोल्हटकरांच्या सावत्र वहिणी. अनुआक्का सख्खी बहीण. दत्तात्रेय व दिगंबर हे सख्खे बंधू.

कोल्हटकर आणि हिराबाई

सौ. विमलाबाई देशपांडे यांचा अभिप्राय

[प्रो. म. ल. वऱ्हाडपांडे यांच्या मुंबई येथील साहित्य सहकार संघ, लिमिटेड, या संस्थेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या या पुस्तकावर कोल्हटकरांच्या पुतणी, सुप्रसिद्ध मराठी लेखिका सौ. विमलाबाई देशपांडे यांनी दिलेला अभिप्राय पुढे दिला आहे. —संपादक]

श्री. म. ल. वराडपांडे यांचे 'कोल्हटकर व हिराबाई' हे पुस्तक वाचले. कोल्हटकर व हिराबाई यांच्या मैत्रीबद्दल बरेचसे दूषित वातावरण उत्पन्न केल्याचे ऐकिवात होते. म्हणून हे पुस्तक काहीशा उत्सुकतेने वाचले. पण या पुस्तकात या मैत्रीबद्दल कुत्सितपणे काहीही लिहिले गेले नाही; व हिराबाई या साहित्य-दृष्टया व सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने कशा सतत उपेक्षिल्या गेल्या, याच गोष्टीकडे लक्ष वेधले आहे असे दिसले. अर्थात याही दृष्टीने बरीचशी पत्रे व इतर मजकूर अनावश्यक होता हे लक्षात आल्यावाचून राहिले नाही. मात्र या पुस्तकात हिराबाईंचे सर्व साहित्य ग्रथित केले गेले आहे, ही गोष्ट अभिनंदनीय आहे. हिराबाईंच्या गुणांचे त्या काळातील साहित्यिक रसिकांनी जे कौतुक केले त्यालाही हे साजेसे आहे."

२१-६-१९७० विमलाबाई देशपांडे

कोल्हटकरविषयक पत्रे

कोल्हटकरांचे श्री. शिर्के यांना पत्र

पाश्चात्य विनोदी वाङमयाच्या व्यासंगावर प्रकाश

[हे पत्र आमचे मुंबईचे स्नेही प्रो. वि. ह. कुळकर्णी यांच्या सौजन्याने, त्यांच्या संग्रही असलेल्या कोल्हटकर–शिर्के पत्रव्यवहाराच्या फायलीतून, 'युगवाणी'ला मिळाले. कोल्हटकरांच्या शिष्या सुप्रसिद्ध मराठी कथालेखिका सौ. आनंदीबाई शिर्के आणि त्यांचे पती श्री. शिवराम सखाराम शिर्के या उभयतांचे त्यांच्याशी घनिष्ठ संबंध होते. सौ. आनंदीबाई या गरोदर असताना, श्री. शिर्के यांचा पत्रव्यवहार कोल्हटकरांशी, त्या दांपत्याच्या वतीने, चालू होता, हे या पत्रातील सूचक विधानांवरून स्पष्ट दिसते. पाश्चात्य विनोदी लेखक, नाटककार आणि इंग्रजी नाटचशास्त्र यांच्या कोल्हटकरांनी केलेल्या व्यासंगाची थोडीशी कल्पना या पत्रावरून येते.

सांगली येथे १९२० च्या मेमध्ये भरलेल्या ज्योतिष संमेलनाचे अध्यक्ष या नात्याने कोल्हटकरांनी केलेल्या भाषणात टिळकांचा उल्लेख, 'लोकमान्य' या लोकप्रिय उपाधीने न करता, 'विद्वन्मान्य' या उपाधीने केला होता. त्यासंबंधी त्या वेळी वृत्तपत्रातून झालेल्या वादाचाही उल्लेख या पत्रात आहे. हे संपूर्ण पत्र खाली दिले आहे.]

जळगाव, ता. २३–८–२०

सा. न. वि. वि. आपले पत्र आताच हाती आले. त्यास संक्षेपानेच उत्तर दिले पाहिजे. कारण, 'भावबंधन' नाटकाचे एक प्रूफ तपासावयाचे असून, ते उद्या सकाळच्या टप्प्यानेच गेले पाहिजे. या नाटकाच्या छपाईसंबंधाने इतका बेशिस्तपणा झाला आहे की, ते छापण्यास ९।१० महिन्यांपूर्वी सुरवात झाली असताही, ते आणखी १।२ आठवड्यापर्यंत प्रसिद्ध होणार नाही. ते छापण्याचे कामी मला मात्र मनस्वी श्रम पडले. त्याचे चीज झाले असते, तर बरे वाटले असते. पण, कै. गडकऱ्यांची मूळ प्रत ज्यांच्या ताब्यात होती, त्या गृहस्थांच्या, छापखानेवाल्याच्या व प्रकाशकाच्या अव्यवस्थितपणामुळे, ते श्रम होऊन न झाल्यासारखे आहेत. असो. आपल्या पत्रात आपल्या प्रकृतीबद्दल काही मजकूर असेल अशी अपेक्षा होती. पण, निराशा झाली. पण, काही मजकूर नाही, यावरून प्रकृती सुधारत आहे, असे अनुमान काढण्यास हरकत नाही.

'सुदाम्याचे पोहे' मनोरंजन छापखान्याकडून ३।४ महिन्यातच प्रसिद्ध व्हावेत, असे दिसते.

'विद्वन्मान्य' हे विशेषण कै. टिळकांना लावण्याबद्दल रा. केळकरांनी 'केसरी'त जे लिहिले आहे, ते मलाच उद्देशून आहे; व मी त्यांस लिहिलेल्या पत्रात त्यांसही या गोष्टीची ओळख दिली आहे.

मार्क ट्वेनचे Prince and Pauper हे पुस्तक व एक Detective story हीच पुस्तके काय ती विनोदविरहित अशी आढळली. बाकी सर्व विनोदप्रचुर आहेत. Innocents Abroad, New Pilgrim's progress इत्यादी प्रवासवर्णनपर पुस्तके तर फारच बहारीची आहेत. Library of Humour या पुस्तकातील मार्क ट्वेनचे लेख विशेष वाचनीय आहेत.

सौ. आनंदीबाईचे अस्वास्थ्य शिर्के कुलास अभिवृद्धिकारक असल्यामुळे आनंदजनकच आहे. पण, त्यांच्या अलिकडील प्रकृतीच्या दृष्टीने त्यांची धडपणे सुटका होईपर्यंत, मनास काळजीच लागून राहाणार. आपल्या प्रकृतीचे मान जसे आजपर्यंत त्या कळवीत आल्या,

त्याप्रमाणे त्यांच्या प्रकृतीचे मान यापुढे आपण मला कळवावे, अशी विनंती आहे.

आपण उभयतांनी येत्या दिवाळीत खामगावास येण्याचे कबूल केले. त्या वेळी सौ. आनंदीबाईंच्या अस्वस्थतेचा आपणासही संशय नसावा. आपली भेट काही महिने तरी लांबणीवर पडणार असे दिसते. मात्र या खेपेस तिथे आला असता, त्या ऐवजी पुढील खेपेस चौथे याल, हा एका अर्थी मला लाभच आहे.

शेक्सपिअरशिवाय बाकीच्या ज्या ग्रंथकारांची नाटके मी वाचिली आहेत, त्यातील प्रमुखांची नावे ही होत :—

Sheridan :— याची Rivals, School for Scandals व Duenna ही नाटके अत्यंत बहारीची आहेत.

Congreve :— याची नाटके अश्लील आहेत, पण त्यात wit वरीच आहे. Sheridan च्या नाटकात humour चांगला आहे.

Corneille कॉर्नेल व Racine रेसीन या फ्रेंच नाटककारांची बहुतेक नाटके गंभीर Tragedies आहेत.

Goethe :— या जर्मन विख्यात ग्रंथकाराची नाटके दुर्बोध आहेत.

Schiller :— याची नाटके सरस व सुबोध आहेत.

Victor Hugo :— याच्या tragedies चांगल्या आहेत. पण हर्नानीशिवाय इतर मी वाचिल्या नाहीत. हर्नानीसुद्धा मराठीतच वाचले असावे, असे वाटते.

Moliere :— याची सर्व नाटके हास्यरस-परिप्लुत असून सर्वोत्तम आहेत.

Ibsen :— याची नाटके कलेच्या दृष्टीने सर्वोत्तम आहेत, असे म्हणतात. पण मला त्यांतील बऱ्याच नाटकांचे स्वारस्य कळले नाही.

Oscar Wilde :— याची Ideal Husband इत्यादी सर्वच नाटके उत्कृष्ट आहेत.

Maeterlinck :— याची नाटके आटोपसर व कलेच्या दृष्टीने अत्युत्तम आहेत.

Goldsmith :— याची दोनच नाटके पण उत्तम आहेत.

नाट्यशास्त्रावरील इंग्रजी ग्रंथ माझ्या फारसे वाचण्यात नाहीत. Moulton याचा शेक्सपिअरच्या नाटकांवरील ग्रंथ सर्वोत्तम आहे. शेक्सपिअरचे दुसरेही टीकाकार वाचावेत. क. लो. अ. हे वि.

आपला

श्री. कृ. कोल्हटकर

कोल्हटकरांचे जळगांव येथील वास्तव्य

मीमांसाभूषण श्री. पु. बा. साठे यांचे पत्र

[कोल्हटकरांचे भाचेजावई, सुप्रसिद्ध मराठी लेखक, मीमांसाभूषण, सेवानिवृत्त न्यायाधीश, श्री. पु. बा. साठे यांचे 'युगवाणी'च्या जूनच्या अंकासंबंधी विस्तृत पत्र आले आहे. या पत्रात तारीख दिलेली नाही; व पोस्टाचा छाप अत्यंत अस्पष्ट असल्यामुळे त्यातीलही तारीख कळत नाही.

प्रा. दि. वि. जोशी यांच्या लेखांतील उणिवा आणि अनुल्लेख दाखवणारा या पत्रातील भाग पुढे प्रसिद्ध केला आहे. श्री. काकासाहेब जोशी यांनी आपण लिहिलेल्या कोल्हटकरांच्या आठवणी, ता. १० फेब्रुवारी १९६९ रोजीं, श्री. माडखोलकर हे जळगाव–जामोद येथे गेले असतांना, जेव्हा त्यांना दिल्या, त्या वेळी ते पक्षघाताने अंथरुणाला खिळलेले होते. या आठवणी बहुतेक त्यांनी आजारी पडल्यानंतरच लिहिलेल्या असल्यामुळे, त्यांत काही उणिवा आणि अनुल्लेख असणे सहज शक्य आहे.

म्हणून, श्री. पु. बा. साठे आणि त्यांच्या पत्नी सौ. ताराबाई साठे या दोघांनाही आमची अशी विनंती आहे की, त्यांनी आपल्या, रोजनिशीतील उल्लेखांच्या आधाराने, आठवणी लिहून त्या 'युगवाणी'कडे पाठवाव्यात. कोल्हटकरांच्या बाबतीतील आपले हे आप्तकर्तव्य, उशिरा का होईना, त्यांनी जर अजूनही बजावले, तर शताब्दीला हातभार लावल्याचे श्रेय त्यांना मिळेल.]

अनुक्रमणिका

पुरुषोत्तम बाळकृष्ण साठे
(मीमांसाभूषण) चित्तरंजन दास रोड,
बी. ए., एलएल. बी. अकोला

श्री. भाऊसाहेब यांस,

स. न. वि. वि. 'युगवाणी'चा जून १९७०चा अंक वाचण्यात आला. कै. तात्यासाहेबांच्या जन्मशताब्दि निमित्ताने हा अंक प्रसिद्ध झाला. तात्यासाहेबांच्या चरित्रलेखनाकरता साहित्य आपण गोळा करीत आहात, ही गोष्ट स्तुत्य आहे. तात्यासाहेबांच्या सच्छिष्याचे त्यांचेवरील हे प्रेम पाहून आम्हाला कौतुक वाटते व एक मराठी भाषिक या नात्याने मी तुमचे अभिनंदन करतो.

प्रा. दि. वि. जोशी यांचा 'जळगाव–जामोद येथील एक तप' हा लेख वाचला. हा लेख कै. काकासाहेब जोशी–(जे कै. तात्यासाहेबांचे जळगाव येथील सहकारी व शिष्य होते)–यांनी ठेवलेल्या टिपणांवरून लिहिला आहे, असे लेखाच्या टिपणात म्हटले आहे. हा लेख कै. तात्यासाहेबांच्या जळगाव येथील वास्तव्यातील महत्त्वाच्या सर्व गोष्टी सांगेल, अशी माझी अपेक्षा होती.

ता. २३ मार्च १९३४ रोजी तात्यासाहेबांचा फोटो जळगावच्या वाररूममध्ये लावला गेला. त्या वेळी एक समारंभ झाला. ता. २४–३–३४ रोजी तात्यासाहेबांचे हस्ते ग्रंथालयाचा उद्घाटन समारंभ झाला.

ता. २५–३–३४ रोजी जळगावच्या मित्र समाजाने तात्यासाहेबांना चहा पार्टी दिली.

कै. तात्यासाहेब एप्रिलमध्ये आपले बंधु कै. अण्णासाहेब यांचेकडे पुण्याला गेले. मार्च महिन्यातील तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यात ते जळगावला आले होते. ती त्यांची जळगावची शेवटची भेट होती.

ह्या गोष्टी मला माहीत असण्याचे कारण त्या वेळी मी जळगावला (जामोद) सबजज्ज होतो. कै. तात्यासाहेब त्या मुक्कामात माझेकडेच पाहुणे होते. माझ्या दैनंदिनीत त्यांच्या या भेटीचे उल्लेख आहेत.

कै. तात्यासाहेबांच्या जळगावच्या या शेवटल्या भेटीचा उल्लेख कै. काकासाहेब जोशी यांच्या टिपणांवरून लिहिलेल्या लेखात कुठेही नाही.

मी ही गोष्ट आपल्याला एवढ्याकरताच लिहिली आहे की, कै. तात्यासाहेब यांच्या चरित्राची साधने गोळा करण्याचा प्रयत्न थोडासा एकांगी झाला असण्याचा संभव आहे.

स्नेहाकांक्षी
बाबुराव साठे

कोल्हटकरांचे 'आत्मवृत्त'

गाळासाळीवर प्रकाश

[विख्यात कवी आणि ग्रंथकार प्रा. म. श्री. पंडित यांनी, आमच्या विनंतीवरून, श्री. ह. वि. मोटे यांच्या 'प्रतिभा' पाक्षिकाच्या ता. २६ जुलै १९३५च्या अंकात, कोल्हटकरांच्या 'आत्मवृत्ता'त करण्यात आलेल्या गाळासाळीसंबंधी त्यांचे धाकटे बंधु श्री. दिगंबर कृष्ण कोल्हटकर यांचे जे पत्र प्रसिद्ध झालेले होते आणि खुद्द कोल्हटकरांचे त्यांच्या 'आत्मवृत्ता'संबंधीचे आपल्याला आलेले जे पत्र श्री. मोटे यांनी 'प्रतिभे'च्या ता. ३१ मे १९३५च्या अंकात प्रसिद्ध केलेले होते, त्यांच्या प्रती आमच्याकडे पाठवल्या आहेत. पस्तीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली ही दोन अत्यंत महत्त्वाची पत्रे, नवीन अभ्यासक आणि टीकाकार यांच्या माहितीसाठी, मुद्दाम पुन्हा प्रसिद्ध करीत आहोत.]

रा. संपादक 'प्रतिभा' यांस,

स. न. वि. वि. कै. श्री. कृ. कोल्हटकर यांचे 'आत्मवृत्त' कोणी प्रसिद्ध केले व प्रसिद्ध करताना मूळ हस्तलिखितातला काही भाग, काही व्यक्तींच्या प्रेरणेने, गाळला गेला व काही भाग छापला गेला, ह्याबद्दल बराच गैरसमज पसरविण्यात आलेला दिसतो. कै. कोल्हटकरांच्या मृत्युपत्रान्वये 'आत्मवृत्त' हे त्यांच्या चिरंजीवांपैकी एकास दिलेले आहे. मात्र ते प्रसिद्ध करताना त्यातले काही भाग गाळावेत की काय, गाळावे असे वाटल्यास कोणते गाळावेत, हे ठरविण्याची सर्व जबाबदारी मी माझ्यावरच घेतली होती. त्याच्याशी कै. कोल्हटकरांच्या कोणत्याही शिष्याचा अगर दुसऱ्या कोणाचाही संबंध नाही.

पुणे ४ आपला
१६–७–१९३५ दि. कृ. कोल्हटकर

कोल्हटकरांचे 'आत्मवृत्ता 'विषयी पत्र

जळगाव (वऱ्हाड) ता. १७।१।२५

रा. ह. वि. मोटे, उमरावती, यांस,

सा. न. वि. वि. आपण सुचविलेली कल्पना मी या पूर्वीच अंमलात आणलेली आहे. सन १९१८ साली मला प्रो. कर्व्यांच्या महिला विद्यापीठातील अध्यापक प्रो. मायदेव यांचे एक पत्र आले. त्या पीठाच्या अभ्यासक्रमात 'अभिनव काव्यमाले 'चा १ ला भाग नेमला असून, त्यात माझ्या चार कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. कवींच्या कवितांचे स्वारस्य कळण्याकरिता, त्यांच्या चरित्राशी परिचय असणे जरूर आहे, अशी प्रस्तावना करून, प्रोफेसरमजकुरांनी मला स्वतःचे चरित्र लिहून पाठविण्याची त्या पत्रात विनंती केली होती. चरित्र अर्थातच संक्षेपाने पाठवावयाचे होते. मी आत्मचरित्र लिहिण्यास आरंभ केला व बाळपणीचा वृत्तांत थोडक्यात आटपूनही टाकला. पण, तारुण्यातील वृत्तांत लिहू लागलो, तसतसा मजकुराचा विस्तार वाढावयास लागून, अलिकडील हकीगती तर फारच विस्तृत स्वरूपात कागदावर उतरल्या. याप्रमाणे जे आत्मचरित्र एका कागदाच्या मर्यादेत समाविष्ट करण्याचा प्रथम विचार होता, त्याचे अखेर १००-१२५ पृष्ठांचे एक लहानसे पुस्तकच झाले. त्यात लिहिलेल्या गोष्टींचा संबंध विशेषेकरून माझ्या ग्रंथकर्तृत्वाशीच आहे. खाजगी बाबींपैकी ज्यांचा संबंध त्यांच्याशी पोचतो, त्याच त्यात नमूद केल्या आहेत. शिवाय, माझ्या मूळ उद्देशात न कळत बदल होत गेल्यामुळे, त्या पुस्तकात प्रमाणशीरपणा नाही. हे दोष असताही हे पुस्तक अत्यंत मनोरंजक झाले आहे, असा, ते ज्या थोड्या व्यक्तींना मी आजपर्यंत दाखविले आहे, त्यांचा अभिप्राय आहे. त्या व्यक्तींची संख्या ४-५हून अधिक नाही. हे आत्मचरित्र शक्य तितके परिपूर्ण करण्याबद्दल मला सूचना आल्या आहेत; व माझ्या हातचे प्रकाशनाचे कार्य संपल्यावर त्या सूचना अंमलात आणण्याचा माझा विचार आहे........

माझ्या आत्मचरित्राचे प्रकाशन माझ्या हयातीत शक्य नाही. हे कळल्यावर ते करण्याची इच्छा आपण करणार नाही, अशी आशा आहे.

क. लो. अ. हे वि.

आपला

श्री. कृ कोल्हटकर

श्री. हिराबाई पेडणेकर

'अभिनव काव्यमाले 'तील कविता

कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या जन्मदिनानिमित्त, विदर्भ साहित्य संघात, ता. २९ जून रोजी झालेल्या समारंभाच्या वेळी, नागपूरचे सुप्रसिद्ध कवी आणि टीकाकार प्रो. भ. श्री. पंडित यांनी कै. हिराबाई पेडणेकर यांच्या कवित्वगुणांविषयी आणि काव्यरचनेविषयी शंका व्यक्त केली होती, असे समजते. पण, ही शंका अनाठायी आणि अनुचित आहे, असे म्हटल्यास चूक होणार नाही. १९०९ च्या वसंत ऋतूत पुणे येथे, रा. ब. ग. ज. आगाशे, रा. सा. गो. वा. कानिटकर, रे. ना. वा. टिळक, लेफ्टनंट कर्नल का. र. कीर्तिकर, श्री. श्री. कृ. कोल्हटकर, श्री. लक्ष्मणशास्त्री लेले, श्री. न. चिं. केळकर प्रभृती त्या काळातील प्रमुख आधुनिक कवींची सभा होऊन, 'शारदा प्रसादन मंडळ' या नावाची संस्था स्थापन करण्यात आली; व या संस्थेतर्फे आधुनिक मराठी कवितांचे संग्रह प्रसिद्ध करण्याचे ठरले. तदनुसार पहिला संग्रह, श्री. लक्ष्मणशास्त्री लेले यांच्या संपादकत्वाखाली, १९०९च्या डिसेंबरमध्ये, 'अभिनवकाव्यमाला, भाग पहिला' या नावाने प्रसिद्ध करण्यात आला. त्यात त्या काळातील १८ प्रमुख कवींच्या कवितांचा संग्रह करण्यात आला होता.

या अठरा कवींत फक्त सौ. लक्ष्मीबाई टिळक आणि श्री. हिराबाई पेंडणेकर या दोनच स्त्रिया होत्या; व त्यांपैकी सौ. लक्ष्मीबाईंच्या दोन आणि श्री. हिराबाईंच्या चार कविता या संग्रहात दिलेल्या आहेत. श्री. हिराबाई पेडणेकर यांच्या कविता १४८ पानावर सुरू होतात. त्यांच्या आरंभी श्री. हिराबाईंचा जो अल्प परिचय दिलेला आहे, त्यात प्रथम जन्मकाल इ. स. १८८५ असा दिला असून, नंतर पुढील चार ओळी मजकूर दिला आहे, "श्रीमती हिराबाई पेडणेकर यांनी 'जयद्रथविडंबन', 'झुंजारराव' आणि 'दामिनी' ही संगीत नाटके रचिली आहेत. यांपैकी पहिले प्रसिद्ध झाले असून, बाकीची अमुद्रित आहेत. याशिवाय प्रस्तुत कवयित्रीची थोडीशी स्फुट कविताही आहे." त्यानंतर (१) 'कवि आणि गुलाबकळी' (२) 'प्रेमाला उद्देशून' (३) 'उद्यान' आणि (४) 'रुष्ट प्रियकरास' अशा त्यांच्या चार कविता दिलेल्या आहेत. त्यांपैकी

'उद्यान' ही कविता हे 'जयद्रथविडंबन' नाटकातील पद आहे. या सर्वच कविता सरस असून, त्यात कल्पकता चांगली आहे. पण त्यातही 'रुष्ट प्रियकरास' ही दिंडी वृत्तातील कविता अत्यंत हृदयंगम आहे. 'कवि आणि गुलाबकळी' ही कविताही मनाला चटका लावणारी आहे. 'प्रेमास उद्देशून' या कवितेत मजेदार उपरोध आहे. या चार कवितांवरून हिराबाईंची कवित्वशक्ती वरच्या दर्जाची होती, असे वाटल्याशिवाय रहात नाही.

योगायोग असा की, 'अभिनव काव्यमाले'च्या याच पहिल्या भागात श्री. न. चिं. केळकर यांच्याही कविता दिलेल्या आहेत. त्यात श्री. हिराबाई पेडणेकर यांना उद्देशून लिहिलेली म्हणून जी "रचिशी वेषभूषा? अथवा कुसुमचापपाशा?" ही कविता प्रसिद्ध आहे, तिचा समावेश करण्यात आला आहे. त्या कवितेनंतर लगेच "प्रेमाचे प्रश्न" ही केळकरांची तितकीच मनोहर कविता दिलेली आहे. या कवितेतील ध्रुपद, शेवटल्या चार चरणांसह, खाली देत आहे,—

काव्यामृत गायनरस तव पितां पितां,
स्वैर चित्र आलापही मधुनि सेवितां,
कधि येइल वेला मर मम सुभाषिता
पौर्णमासपूर्णकलाप्रणयविधुकरें ?
भेटसि मज पुनरपि कधि सांग, प्रियकरे ?
प्रेमासनि सुस्थित कधि करिसि निजकरें? ।।ध्रु०।।

हे चरण वाचताना हिराबाईंचे संगीतनैपुण्य आणि कवित्वगुण हे दोन्ही डोळ्यांपुढे उभे रहातात. 'वेषभूषा' या कवितेच्या पाठोपाठ ही कविता देण्यात योजकता कोणाची ? श्री. लेलेशास्त्री की श्री. केळकर यांची ? आणि ही योजकता सहेतुक की निर्हेतुक ? श्री. हिराबाई पेडणेकर यांच्या 'रुष्ट प्रियकरास'या सुंदर कवितेचा श्री. केळकर यांची 'प्रेमाचे प्रश्न' ही कविता हा तितकाच सुंदर प्रतिवाद आहे, असा विचार, 'अभिनव काव्यमाले'च्या पहिल्या भागातील या दोन कविता वाचल्यावर, मनात आल्याशिवाय रहात नाही. सौ. लक्ष्मीबाई टिळक यांच्या याच भागातील "करंज्यामधे मोदक कशाला ?" आणि 'जळगावच्या कविसंमेलनास निरोप' या दोन कविता देण्यात श्री. लेलेशास्त्री यांची जी मार्मिकता आणि योजकता प्रकट झालेली आहे, तीच 'वेषभूषा' आणि 'प्रेमाचे प्रश्न' या केळकरांच्याही दोन कविता प्रसिद्ध करण्यात व्यक्त झालेली आहे, असे म्हटल्यास गैर होणार नाही. अर्थात् ही माझी सर्व अनुमाने आहेत.

'शारदाप्रसादन मंडळा'सारख्या प्रतिष्ठित कर्त्यांच्या संस्थेने साठ वर्षांपूर्वी काढलेल्या 'अभिनवकाव्यमाले'च्या पहिल्याच भागात ज्या अर्थी श्री. हिराबाईंच्या कवितांना स्थान मिळाले, त्या अर्थी तत्कालीन कविमंडळात त्यांना चांगली मानमान्यता असावी, हे स्पष्ट आहे. विशेषतः, श्री. लक्ष्मणशास्त्री लेले यांच्यासारख्या त्या काळात अतिशय चिकित्सक, चोखंदळ आणि कडक म्हणून गाजलेल्या पंडित कवि–टीकाकाराने श्री. हिराबाईंच्या कवितांचा संग्रह 'अभिनवकाव्यमाले'च्या पहिल्याच भागात करावा, ही घटना तत्कालीन कविमंडळांत त्यांना लाभलेल्या प्रतिष्ठेची निदर्शक आहे. अशा स्थितीत त्यांची कवित्वशक्ती आणि कवित्वगुण त्यांच्यासंबंधी शंका घेणे, हे न्यायाचे होणार नाही.

'अभिनवकाव्यमाले'च्या या भागात कै. लेलेशास्त्री यांनी श्री. हिराबाई पेडणेकर यांच्या संबंधीची जी परिचायक टीप दिलेली आहे, तीत बाईंच्या लिखित आणि प्रकाशित अशा 'जयद्रथविडंबन' आणि 'दामिनी' या दोन नाटकांबरोबरच 'झुंझारराव' या तिसऱ्याही नाटकाचा उल्लेख केलेला आहे. बाईंचे 'मामा' कै. गो. ब. देवल यांनी 'ऑथेल्लो' नाटकाची रंगावृत्ती, कै. महादेवशास्त्री कोल्हटकर यांच्या त्या नाटकाच्या मराठी भाषांतराच्या आधाराने, रंगभूमीवर आणण्यासाठी तयार केलेली होती. ते त्यांचे नाटक 'झुंझारराव' या नावाने प्रसिद्ध आहे. उलट, या टीपेत श्री. हिराबाईंच्या 'झुंझारराव' या नाटकाचा दुसऱ्या क्रमांकाने उल्लेख केलेला आहे. श्री. हिराबाईंची संकल्पित नाटके म्हणून 'संगीत मीराबाई' आणि 'संगीत पद्मावती' यांची नावे आतापर्यंत लोकांना माहीत होती. परंतु या टीपेमुळे 'झुंझारराव' या आणखी एका नावाची भर त्यांत पडली. कै. लेलेशास्त्री यांनी आपल्या चिकित्सक, काटेकोर स्वभावानुसार, बाईंविषयीची ही टीप त्यांच्यापासूनच माहिती घेऊन दिलेली असावी. हे उघड आहे. म्हणून, या वुनकळयात पडणाऱ्या 'झुंझारराव' या नाटकाविषयी शोध होणे जरूर वाटते. आपल्या 'मामां'च्या या गद्य नाटकाची संगीत आवृत्ति तर बाईंनी तयार केली नसेल ना ?

—म. ल. वऱ्हाडपांडे, दिल्ली

बौद्धधर्माची वैदिक पार्श्वभूमी

आरण्यक आणि औपनिषदिक विचार

तत्त्वचिंतकांचे युग (उत्तरार्ध)

— डॉ. सर भवानीशंकर नियोगी

आता आपण निरहंकार, आनंदमय अशा आत्मदर्शनाचा विचार मांडणाऱ्या मैत्री, उपनिषदाकडे वळू. मनाचा संयम केल्याने आत्मा जेव्हा त्या अति उज्ज्वल अशा, सूक्ष्मातिसूक्ष्म अशा आत्म्याचे दर्शन करतो, तेव्हा, आपल्या आत्म्यातून त्या आत्म्याचे दर्शन घडल्यामुळे मनुष्य आत्महीन, 'निरात्मा' होतो. (तदा आत्मना आत्मानं दृष्ट्वा निरात्मा भवति). निरात्मा झाल्याने त्याला 'असंख्य' आणि 'अनादि' असे म्हणावे. हे असे होणे हेच मोक्षाचे लक्षण आहे. हे श्रेष्ठातिश्रेष्ठ असे रहस्य आहे. (मैत्री उप. VI–२०). ह्यावर प्रश्न विचारला गेला की,–हे शरीर, अ-चेतन, अशा गाडीसारखे आहे. मग ही गाडी चालविणारा कोण ? ह्याचे उत्तर असे—तो शुद्ध, विशुद्ध, शून्य शांत, निष्प्राण, निरात्मा, अनंत, अक्षय, स्थिर, चिरंतन, अज, स्वतंत्र असा आहे, हाच ती गाडी चालविणारा होय. (मैत्री उप.–II, ४). संसारस्थितीचे हे वर्णन 'नेति, नेति' ह्या वर्णनासारखेच नकारात्मक स्वरूपाचे आहे. सेंट थॉमस एक्विनासचे म्हणणे असेच आहे. तो म्हणतो, प्रारंभीच्या स्वभावसिद्ध गोष्टींचे वर्णन 'ती अशी नाही, अशी नाही' असे म्हणून नकारात्मक पद्धतीनेच केले जाऊ शकते. उदाहरणार्थ, बिंदु म्हणजे काय असे विचारले तर 'ज्याला कोणते 'ही परिणाम नाही अशी (काल्पनिक) वस्तु असेच करावे लागते. त्याचप्रमाणे दान्ता (Dante) असेच म्हणतो.–काही गोष्टी अशा असतात की त्याचे आकलन आपल्या बुद्धीला होऊ शकत नाही. अशा वेळी त्यांच्या स्वभाव–गुणांचे 'नेति नेति' अशा पद्धतीने वर्णन करूनच त्या समजू शकतात. भारतीय न्याय–शास्त्रात त्याला 'पर्युदास' असे म्हणतात. वस्तूच्या अस्तित्वाचा प्रतिषेध नसतो. असो. पण ह्याच गोष्टीचे याज्ञवल्क्याने, ती वस्तू कशी आहे ते सांगून वर्णन केले आहे. तो म्हणतो, "एष ते आत्मा सर्वान्तरः यो अशनाया, पिपासि, शोकम्, मोहम्, जराम्, मृत्युम् अत्येति." तो तुझा आत्मा, वस्तुमात्रात भरला आहे. तो क्षुधा, तृषा, दुःख, मोह, वृद्धत्व आणि मृत्यूच्याही पलीकडे आहे (बृ. उ. ३–५). बुद्धाच्या विचारसरणीवर ह्याचा खोल ठसा उमटलेला आहे.

आत्म्याच्या ह्या द्विविध स्वरूपांची सांगड घालण्याचा प्रयत्न मांडूक्योपनिषदात केलेला आहे. येथे 'ॐ' ह्या रहस्यमय एकाक्षराचा उल्लेख करून आत्मा 'चतुष्पाद' आहे, असे वर्णन केले आहे. हे चार पाय (अवस्था) म्हणजे, जागृतावस्था, स्वप्नावस्था, सुषुप्ति आणि चवथी तुरीयावस्था. ही तुरीयावस्था सर्व प्रकारच्या द्वैतभावाच्या पलीकडे आहे, ती शिव म्हणजे कल्याणकारी व अद्वैत (अद्वितीय) आहे, असे म्हटले आहे.

आत्म्यासंबंधीची उपनिषदातील कल्पना कसकशी बदलत गेली ते ह्यावरून आपल्या लक्षात येईल. प्रथम आत्मा म्हणजे देहाचा मधला भाग असे सांगितले गेले होते (मध्यम ह्येष, अंगानाम् आत्मा). तेथून पुढे 'नेति', 'नेति' पर्यंत आणि मग हे आत्म्याला अंतर्यामी म्हणजे आतून सर्व गोष्टीवर नियंत्रण ठेवणारा, अशी त्याच्यासंबंधी कल्पना आली, आणि शेवटी

मांडूक्योपनिषदात सांगितल्याप्रमाणे आत्म्याच्या अद्वैताबद्दल (अद्वितीयत्वाबद्दल) कल्पना मांडली गेली. हे मांडूक्योपनिषद म्हणजे, शंकराचार्यांच्या मताप्रमाणे 'सर्व वेदान्तसार-संग्रह भूतम्', सर्व उपनिषदांचे सारच आहे.

प्रारंभीच्या वेदकाळात यज्ञ आणि अग्निहोत्र ह्यांना महत्त्वाचे स्थान होते; पुढे ह्या दोन विधींचे उच्चाटण झाले. त्यांच्या जागी दुसरे काय आले ते आता आपण पाहू. ह्याविषयी विचार करताना एका महत्त्वाच्या गोष्टीकडे आपण लक्ष द्यायला पाहिजे. ती गोष्ट ही की, ह्या काळात लोकांचे लक्ष बाह्य जगतावरून उडू लागले होते. जगत्-व्यापाराकडे भावनेच्या दृष्टीने पाहण्यात लोकांना आता रस वाटेनासा झाला होता. त्या दृष्टीने बाह्यव्यापारांचा अर्थ लावणे त्यांना रुचेनासे झाले होते. आता लोक अंतर्मुख बनले होते. हे विचार-स्थित्यंतर पुढे दिलेल्या श्लोकात फार चांगल्या रीतीने स्पष्ट करण्यात आले आहे,—

बहिर्मुख (अशी) इंद्रिये (फक्त) परमेश्वराने मारून टाकली आहेत (इतरांनी कोणी नाही). म्हणून (मनुष्य) बाहेर (विषयाकडे) पहातो, अंतरात्म्याकडे पाहत नाही. एखादाच बुद्धिमान मनुष्य मोक्षाची इच्छा करणारा होतसाता व सर्व इंद्रिये अंतर्मुख केलेला (इंद्रियांहून) उलट गमन करणाऱ्या (अंतर्मुख) आत्म्याला पाहतो. (हरी रघुनाथ भागवत.)

संस्कृत : परांचि खानि व्यतृणत् स्वयंभूस्तस्मा
त्परांङ पश्यतिनांतरात्मन् ।
कश्चित् धीरः प्रत्यगात्मानमैक्षदावृत्त-
चक्षुरमृतत्वमिच्छन् ॥ कठ. २-१-५

स्वप्नामध्ये व जागृतीमध्ये जाणले जाणारे सर्व विषय ज्याच्या योगाने मनुष्य जाणतो तो महान् सर्वव्यापी आत्मा होय. असे ज्ञान झाल्यावर बुद्धिमान् मनुष्य शोक करीत नाही. (कठ ८-४) भागवत.

त्या स्वयंभू तत्त्वाने ज्ञानेंद्रियांचा भेद करून त्यांना बहिर्मुख केले; त्यामुळे मनुष्याची दृष्टी बाह्य वस्तूकडे वळली. त्याचे लक्ष अंतरात्म्याकडे गेले नाही.

स्वप्नातम् जागहितांतं चोभी येनानुपश्यति ।
महांतम् विभुमात्मानम् सत्वाधीरोन शोचति (कठ ॥ ४)

कठोपनिषदात 'श्रेय' आणि 'प्रेय' यावर विशेष भर दिला आहे. श्रेय म्हणजे जे सर्वश्रेष्ठ कल्याणकारी आहे, ते आणि प्रेय म्हणजे हवे-हवेसे वाटणारे सुख. या उभयतांमधील भेद लक्षात यावा म्हणून माणसाने अभ्यास केला पाहिजे असे त्या उपनिषदाचे आग्रहाचे म्हणणे आहे. अधिक श्रेयस्कराचा स्वीकार करणारा तो ज्ञानी, अधिक सुखाच्या प्राप्तीने संतोष पावणारा तो अज्ञानी म्हणजे मूर्ख, हा भेद करण्याचा विवेक अंगी बाणवून घेण्याचा उपदेश येथे आला आहे.

उपनिषदे सांगतात,—"आत्मयाजो श्रेयो देव यजिमाम्" आत्म्याची पूजा करणारा देवांची पूजा करणाऱ्यापेक्षा अधिक श्रेष्ठ समजावा. या ठिकाणी स्वर्गाच्या कल्पनेपेक्षा मोक्षाची कल्पना अधिक वरची, असे स्पष्ट केले आहे.

जो आत्मयाजी आहे तो उपासनेचा अवलंब करतो. उपासना म्हणजे मनन-चिंतन. त्याकडेच आपण आता वळू.

"उपासनम् माम यथाशास्त्रम् उपास्यस्य अर्थस्य विषयी करणेन सामीप्यम् उपगम्य तैल धारावत् समानप्रत्यय प्रवाहेण दीर्घकालम् यत् आसनम्" गीता XII ३ (शां. भा.) एकाच विचारात बराच वेळपर्यंत स्थिर होऊन राहणे, ज्याप्रमाणे तेलाची धार अखंडितपणे सतत वाहत राहते त्याप्रमाणे एकाच विचारात सतत राहणे म्हणजे उपासना, असे शंकराचार्यांनी म्हटले आहे. विद्येचे निरनिराळे प्रकार सांगितले आहेत ते असे:—भूमा विद्या, वारुणी विद्या, उद्गीथ विद्या, संवर्ग विद्या, दहर विद्या, प्राण विद्या, अक्षि पुरुष विद्या, अंग अथवा प्रतिकोपासना, वैश्वानर विद्या, आणि मधु विद्या. वेद आणि वेदांत ह्यात फरक आहे तो असा की, वेद बाह्य जगताचा विचार करतात आणि समाज-व्यवस्थेचे एक अंग म्हणूनच ते मनुष्याकडे पाहतात, पण वेदात माणसाला अंतर्मुख होऊन आपल्या आत पाहायला सांगतो. सर्व विश्वाच्या मुळाशी जी शक्ती कार्य करीत आहे ती आणि आपला खरा स्वभाव हे दोन्ही एकच आहेत हे सारभूत तत्त्व आत्मसात् करायला सांगतो. अश्वपति कैकेयाने उद्दालक अरुणीला व दुसऱ्यांना उपदेशिलेली वैश्वानर-विद्या हीच होय. बृहदारण्यकोपनिषदात (I. ४) सांगितले आहे,—हे जे काही आहे ते सर्व प्रारंभी आत्माच होते. तो आत्मा पुरुष रूपाने होता. त्याने आवती-भोवती

सर्वत्र पाहिले आणि त्याला स्वतःशिवाय निराळे असे काहीच दिसले नाही. त्याने पहिले वाक्य उच्चारले, "मी आहे." त्यापासून "मी" हा शब्द उद्भवला ह्याचा अर्थ असा की "आत्मा" हा शब्द 'मी' पणाच्या कल्पनेचा वाचक आहे. अश्वपतीने पायरी-पायरीने पुढे जाऊन हेच दाखविण्याचा प्रयत्न केला आहे की प्रत्येकाचा 'मी' आणि संपूर्ण विश्वाचा 'मी', वैश्वानर आत्मा, विश्व-पुरुष, दोन्ही एकच आहेत छांदोग्योपनिषदात (V १८) मध्ये असे प्रतिपादन करून एक आणि दुसरा असा भेद निरर्थक आहे; कारण एकाचे विश्वरूप आणि दुसऱ्याचे विश्वरूप ह्यात काही भेद नाही, असे त्याने सांगितले आहे.

आता भार्गवी वारुणी विद्येचे दुसरे उदाहरण घ्या. तैत्तिरीय उपनिषदांत (III-१-६) मध्ये सांगितले आहे, की भृगूला वस्तुरूप अशा अन्न-ब्रह्मापासून तो एका पुढच्या दुसऱ्या अधिक पुढच्या अशा काल्पनिक ब्रह्मांतून नेत नेत शेवटी आनंद-ब्रह्मापर्यंत त्याला नेण्यात आले. पुढे जे काही मला सांगायचे आहे त्यावर ह्याचा विशेष परिणाम होणार असल्याकारणाने मी ह्या गोष्टीचे येथे थोडे अधिक स्पष्टीकरण करतो. वरुणाने आपला पुत्र जो भृगू याला जो उपदेश केला त्याची पार्श्वभूमी अशी आहे.—ब्रह्म हे सत्य, ज्ञान आणि अनंत आहे. त्याच्या स्वरूपातूनच जडरूपी तत्वे आविर्भूत झाली, आणि त्या तत्वांतून पंचकोषात्मक असा देह बनला. हे पाच कोष म्हणजे अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय कोष. ह्या ठिकाणी वरुण भृगूला सांगतो,—ज्यापासून सर्व प्राणिमात्र उत्पन्न होतात, ज्याच्या साह्याने ते जगतात आणि ज्यात ते शेवटी विलीन होतात ते ब्रह्म आहे. भृगूला तपश्चर्या करायला सांगण्यात आले. त्याने तप केले तेव्हा त्याला कळले की ब्रह्म म्हणजे अन्न. त्यानंतर त्याला कळले, ब्रह्म म्हणजे प्राण, मन, विज्ञान आणि शेवटी आनंदरूप आहे. अन्नाचा तिरस्कार करता उपयोगी नाही हे त्यांच्या मनावर ठसविण्यात आले. या शिकवणीचा आशय हाच की, जड वस्तु, मनस्तत्त्व आणि आत्मतत्त्व तिन्ही मुळात सारांशाने एकच आहेत, त्यांचा खरा स्वभाव आनंद हाच आहे आणि हा आनंदच पृथ्वीवरील जीवनाचे सार आहे. सृष्टीची सृजन-शक्ती म्हणजे हे जीवन-सार. या ठिकाणी निसर्गापलीकडच्या कोणत्याही गोष्टीचा उल्लेख नाही. ब्रह्माचे शब्दरूपाने वर्णन करणे अशक्यच आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. सुरुवातीला ब्रह्म म्हणजे मंत्र असाच अर्थ गृहीत होता. ह्या मंत्रांच्या सहाय्याने देवांना प्रसन्न करून घेतले म्हणजे त्यांच्याकडून आपली अन्नादिकाबद्दलची इच्छा तृप्त करून घेता येते, असे मानले जाई. पण, देव स्वतः काही खात नाहीत किंवा पीत नाहीत असे जेव्हा उपनिषदे सांगू लागली तेव्हा मग ह्या मंत्राचे महत्त्व वाटू लागले. वेदांत आलेली सूत्रे म्हणजे मंत्र-वेदांचाच एक भाग असलेल्या कर्मकांडाच्या विशिष्ठ विधिपुरत्याच उपयोगात आणल्या जाणाऱ्या क्रिया होत्या. पण, विद्या अथवा उपासना यांची गोष्ट निराळी होती. ऋग्वेदात ज्याला 'सत्यस्वरूप' असे म्हटले आहे त्या वैश्वानर अग्नीशी यांचा घनिष्ट संबंध होता. एकूण उपनिषदे दोनशेच्या जवळपास आहेत असे म्हणतात. त्यांपैकी फक्त तेरा उपनिषदेच महत्त्वाची गणली जातात. अनेक मुद्यांसंबंधी अगदी परस्परविरोधी मते त्यात मांडलेली आढळतात. सृष्टीच्या उत्पत्तीविषयीही त्यात अशीच मतभिन्नता आहे. ईश्वराच्याविषयी आस्तिक्य, नास्तिक्य, अज्ञेयवाद, उच्छेदवाद (Nihilism), सृष्टिनियमांवरच देवत्वाचा आरोप करणारा बहु-ईश्वर-वाद, अशा अनेक विषयांवर त्यांत तऱ्हेतऱ्हेची विरोधी मते आलेली आहेत. अनेक विचारवंतांच्या कल्पनेच्या क्षितिजावर आत्म्याच्या कल्पनेप्रमाणे ब्रह्म, सत्, असत्, काम, मृत्यू, जल, वायू, आकाश इत्यादिकांसंबंधीच्याही अनेकानेक कल्पना उदयास आलेल्या आपल्याला आढळतात. निसर्गशक्तीवर देवत्वाचा आरोप करणारी बहु-ईश्वर-वादाची भूमिका जरी या काळात दृढमूल असली तरी, त्या तत्वज्ञानाच्या मुळाशी मुख्य विचार सातत्याने घोळत असलेला दिसतो तो अनुभूतिजन्य अशा व्यक्तिगत जीवात्म्याचे अनुभूतीच्या पलीकडच्या अशा विश्वात्म्याशी एकरूपत्व सिद्ध करणे, हाच होता. केवलाद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैताद्वैत, शुद्धाद्वैत, अशा प्रकारच्या उपनिषदांतूनच बाहेर पडलेल्या तत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या शाखा आपण पाहतो—ह्याचे कारण, माणसाच्या मनाला निव्वळ श्रद्धेवर विसंबून राहण्यात समाधान वाटेना, सत्य हुडकून काढण्याकडे, मननाकडे त्याची प्रवृत्ती वळली, हे आहे. "आत्मा वा अरे द्रष्टव्यो श्रोतव्यो मंतव्यो निदिध्यासितव्यः" हे याज्ञवल्क्याने श्रोत्यांना आग्रहपूर्वक सांगितलेले वचन

लक्षात घेण्यासारखे आहे. श्रवणाने, चिंतनाने आणि मननाने आत्म्याचे दर्शन माणसाने करून घ्यायचे आहे. ह्या गोष्टीचा विचार छांदोग्योपनिषदात सुचविल्याप्रमाणे दुसऱ्याही एका गोष्टीबरोबर करावयाचा असतो. नामरूपाचा म्हणजे व्यक्तित्वाचा उदय अन्न, जल आणि अग्नी ह्या तीन मूल तत्त्वांपासून झाला आणि त्या मूल तत्त्वांपासून क्रमशः मन, प्राण आणि वाचा उदयाला आली. त्यांचे वर्णन अनुक्रमे कृष्णवर्ण, श्वेतवर्ण आणि ताम्रवर्ण असे केले आहे (छांदो. VI-३–६). श्वेताश्वतर उपनिषदांत त्याचा उल्लेख "अजाम्, एकाम्, लोहित, शुक्लकृष्णाम्" अशा शब्दात आला आहे, (तो एक अज लाल, पांढऱ्या आणि काळ्या रंगाचा आहे.) कपिल मुनीच्या सांख्य-दर्शनाचे हे उगमस्थान आहे असे मानण्यात येते. कपिलाला 'मुनी'—म्हणजे मनन करणारा, असे म्हटले आहे. महाभारतातील शांतिपर्वाच्या १३व्या पर्वात ह्या सांख्यदर्शनाचे विश्लेषण केले आहे. ईश्वर कृष्णाची म्हणून जी सांख्य सूत्रे म्हटली जातात, ती फार अलीकडच्या काळातली आहेत. सर हरीसिंग गौर सांख्यदर्शनाचे वर्णन "अत्यंत निष्ठुरपणे केलेले मूर्तिभंजन आणि मूलतः विचारनिष्ठ तत्त्वज्ञान" असे करतात. सांख्यदर्शनानेच त्यांना बुद्धाकडे खेचून आणले असावे असे वाटते. ढोबळ शब्दात ह्या दर्शनाचे स्वरूप सांगायचे तर, कपिलमुनीला परमेश्वराचे अस्तित्व मान्य नाही, मग त्याला देव म्हणा किंवा दुसरे कोणतेही नाव द्या. इंद्रियगोचर ज्ञान हे प्रत्यक्ष ज्ञान आहे म्हणून तेच तो मान्य करतो; केवळ कल्पनेवर आधारलेले किंवा धर्मग्रंथात सांगितलेले ज्ञान तो मान्य करीत नाही. विश्वोत्पत्तीचा त्याचा सिद्धांत अनुभूतिजन्य तर्कपद्धतीशी सुसंगत असा आहे.

कठोपनिषद आणि श्वेताश्वतर उपनिषदांमध्ये सांख्य–विचाराला चालना देणारा जसा विचार आहे त्याचप्रमाणे योगाची बीजेही त्यात रुजलेली आढळतात. बुद्ध मताप्रमाणे वेदांत आणि सांख्य विचाराला योग फार महत्त्वाचा पूरक भाग ठरला. योग शब्दाचा मूळ अर्थ 'जुंपणे', 'जुळविणे' असा आहे. लॅटिन भाषेत 'Jugam' (जुगम) हा शब्द नांगराचे 'जू' ह्या अर्थाचा आहे. यज्ञसंस्थेच्या मुळाशी जो विचार होता तो, ह्या जीवनात आणि त्यानंतर इंद्रियजन्य सुखलाभाचा विचार होता. त्याला 'भोग' असे नाव देता येईल. म्हणजे त्या काळातला मुख्य विचार भोगवादी होता. ह्या उलट उपनिषदातला विचार त्यागाचा होता. ऑल्बर्ट स्वाइत्झरच्या शब्दात सांगायचे तर, The former was World and Life Affirmation, while the latter was the World and Life Negation. बुद्ध आणि आरिस्टॉटलने पुरस्कारलेला भोग व त्याग यातील मध्यममार्ग योगाने साधला आहे.

ह्यानंतर शेवटी आपल्याला पहावयाचे आहे ते हे, ब्रह्माशी एकरूपत्व साधण्याचा म्हणजे पूर्णत्वाप्रत जाऊन पोहोचण्याचा उपनिषदप्रणीत मार्ग कोणता होता? त्यासाठी उपनिषदांमधे ठिकठिकाणी जे नैतिक अनुशासन अत्यावश्यक म्हणून सांगून ठेवले आहे त्याचा विचार आपण केला पाहिजे. उपनिषदांचा नीतिधर्म पूर्णत्व–म्हणजे निःश्रेयाची प्राप्ति हे जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे असे मानतो. इहलोकात आणि स्वर्गात इंद्रियजन्य सुखोपभोगाची म्हणजे प्रेमाच्या प्राप्तीची जी कल्पना होती तिला मागे टाकून पुढे जाणारी अशी ही श्रेयाची कल्पना आहे. ह्या दोन्हीही गोष्टी साध्य करून प्रगतीच्या मार्गाने पुढे जाण्याकडे ह्या श्रेयमार्गाचा कल आहे. कठोपनिषदात जाला 'प्रेय' आणि 'श्रेय' असे म्हटले त्यांनाच पुढे 'अभ्युदय' आणि 'निःश्रेयस्' असे म्हणण्यात येऊ लागले. पूर्णत्व म्हणजे आत्मप्राप्ति.

जीवनाचे हे सारसर्वस्व प्राप्त करून घेण्याचे दोन उपाय सांगितले आहेत. (१) ईश्वरी कृपा, आणि (२) स्वतःचा प्रयत्न केन आणि छांदोग्य या "ब्रह्मोपनिषदांत" जो प्रार्थनेचा मंत्र आला आहे, त्यात या दोघांचाही उल्लेख आहे. प्रार्थना आहे ती अशी :— "ये उपनिषत्सु धर्माः ते मयि सन्तु । ते मयि सन्तु ।" धर्म शब्दाचा अर्थ आपण समजून घेणे आवश्यक आहे. कठोपनिषदात (I. १-२१) 'धर्म' शब्द 'आत्मा' ह्या अर्थाने वापरला आहे. मृत्यूनंतर जीवन असते की नाही असा प्रश्न नचिकेताने विचारला त्यावर यमाने उत्तर दिले, न हि सुविज्ञेयमणुरेष धर्मः ह्या उत्तरात आलेल्या 'धर्म' शब्दाची व्याख्या शंकराचार्यांनी 'आत्मा' अशी केली आहे. त्याचप्रमाणे ईशावास्यउपनिषदात आलेला शब्द 'सत्यधर्म', त्याचाही अर्थ 'सत्यात्मन्' असाच केलेला आहे. आपल्या निरुक्तांत यास्काने धर्माचे परमात्मा म्हणून विश्लेषण

केले आहेत. (पातंजल योगसूत्र, व्यासभाष्य, IV, २९ श्लोकावरील टीका पाहा.) तेव्हा पुढे 'धर्म' शब्द जेथे येईल तेथे त्याचा हा विशिष्ठ अर्थ अभिप्रेत आहे हे आपण विसरता कामा नये.

त्याचप्रमाणे 'बृहदारण्यकोपनिषदा'तील ही प्रार्थना पहा:—

"**असतो मा सद्गमय। तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योर्मा अमृतं गमय।**' या मंत्रात अगदी स्पष्टपणे परमेश्वरी कृपेचीच मागणी केलेली आहे. पण त्याबरोबरच उपनिषदात स्वतःच्या प्रयत्नावरही भर दिलेला आहे. कसा, ते पुढे पाहू.

कठोपनिषदात II, २० मध्ये म्हटले आहे निर्माणकर्त्याच्या (धातुः) कृपेने (प्रसादात्) 'ज्याला आत्म्याच्या विशालतेचे दर्शन होते.' हे विधान ज्ञानाच्या मार्गाने मोक्ष मिळण्याचा जो सिद्धांत सर्वसाधारणपणे उपनिषदात मांडला आहे, त्याचा विरोध करणारे आहे. म्हणून शंकराचार्यांनी 'धातुः प्रसादात्' या शब्दाचा अर्थ 'धातुः संप्रसादात्' असा केला. प्रसाद आणि संप्रसाद यात फरक असा की, 'योगमार्गाचा अवलंब करून इंद्रियांचे पूर्णपणे दमन केल्यानंतर—' ध्येय प्राप्त होते. मुंडकोपनिषदाच्या पुढे दिलेल्या मंत्रात उपनिषदांचा सिद्धांत पूर्णरूपाने आला आहे.—

सत्येन लभ्यस्तपसात्येष्ठ आत्मा।
सम्यक् ज्ञानेन ब्रह्मचर्येणनित्यम्

(मुंडक IV–१–५) सत्य, तप, योग्यज्ञान आणि सतत ब्रह्मचर्य यांचे योगाने हा आत्मा प्राप्त होतो. ज्योतिर्मय व शुभ्र अशा याला ज्यांचे दोष नाश पावले आहेत असे यति आपल्या शरीरामध्येच स्थित असा पाहतात (ह. र. भागवत) त्याचप्रमाणे कठोपनिषदातही (१२–१२) म्हटले आहे:—

तं दुर्दर्शं गूढमनुप्रविष्ठं गुहाहितम् गव्हरेष्ठं पुरणम्।
अध्यात्म योगाधि गमेन देवम् मत्वाधीरो हर्षशोकौजहाति
कठ I–२–१२

दिसण्यास कठीण, गहन, (अज्ञानाने) आच्छादिलेला, बुद्धीच्या (गुहा) ठिकाणी स्थित, अनेक संकटांनी प्राप्त होणारा, प्राचीन, असा तो परम (आत्मा) चित्ताच्या आत्म्याचे ठिकाणी लय केल्याने ज्ञात होतो. असे झाल्यावर बुद्धीमान मनुष्य हर्ष व शोक या दोहोंचाही त्याग करतो. (ह. र. भागवत)

आत्म–प्राप्तीच्या मार्गाचे अनुसरण करता यावे एतदर्थ शुद्ध नैतिकतेचे (ब्रह्मचर्य) महत्त्व किती आहे ते अश्वपती कैकेयाने कटाक्षाने सांगितले आहे. 'आमच्या ठायी असणारा आत्मा म्हणजे कोण?' 'ब्रह्म म्हणजे काय?' असे प्रश्न विचारून, ह्या विषयात अश्वपतीने त्यांना उपदेश करावा म्हणून काही धर्मशास्त्रपारंगत विद्वान् (श्रोत्रिय) त्याच्याकडे आले. अश्वपती हा एका राज्याचा स्वामी होता. तो आपल्या शय्येवरून प्रातःकाळी उठला आणि म्हणाला, —

नमेस्तेनोजनत्यदे न कदर्यो न मद्यपो नानाहिताग्निर्नाविद्वान न स्वैरी स्वैरिणी... (छां. उ. V. ११)

माझ्या राज्यामध्ये (कोणी) चोर नाही, अनुदार नाही, मद्यपी नाही, (कोणी ब्राह्मण) अनाहिताग्नि नाही, अविद्वान नाही, कोणी स्वैर नाही, मग स्वैरिणी कोठून असणार? (ह. र. भागवत)

ब्राह्मण जेव्हा (समित्पाणिः), होतात समिधा घेऊन–म्हणजे शिष्य रूपाने–क्षत्रिय राजाकडे जात तेव्हा क्षत्रिय राजा त्यांना उपदेश करीत असे, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

प्रजापतीचे तीन प्रकारचे पुत्र होते. देव, मानव आणि दानव. ते तिघेही आपल्या पित्यावरोबरच राहत असत. प्रजापतीने त्यांना मुख्य तीन गुणांचे संवर्धन करायला सांगितले. जो देव होता तो उपदेश द्यावा म्हणून आपल्या पित्याला विनंती करून म्हणाला, 'मला सांगवे, महाराज', प्रजापतीने एकच अक्षर उच्चारले, –'द'. मग त्याने विचारले, "मी काय सांगितले ते तुला कळले का?" देवाने उत्तर दिले, "होय. स्वतःवर नियंत्रण ठेवा (दमयन्त) असे आपण सांगितले." उपनिषदामध्ये देव म्हणजे अनुशासन–हीन, असे म्हटले आहे.

जेव्हा प्रजापतीचा दुसरा पुत्र मानव त्याच्याकडे उपदेशासाठी गेला, त्या वेळी त्यालाही प्रजापतीने 'द' असेच सांगितले. पण येथे 'द'चा अर्थ दे (दत्त) असा होता. नंतर शेवटी पाळी आली दानवांची. त्यांनाही प्रजापतीने तेच सांगितले, — 'द'. ह्या तिसऱ्या 'द'चा अर्थ होता, 'दयाद्ध्वम्' म्हणजे दुसऱ्यावर दया करा. हा संपूर्ण मनुष्य–जातीलाच केलेला उपदेश आहे असे म्हणायला हरकत नाही.

कारण, मानव-जातीत देव आहेत तसे दानवही आहेतच (बृहदारण्यकोपनिषद् V. २).

ब्रह्मचर्याचे पालन करून मनुष्य पूर्णत्व कसे प्राप्त करून घेऊ शकतो त्याच्या विश्लेषणाकडे आता मी आपले लक्ष वेधू इच्छितो. छांदोग्योपनिषदाच्या आठव्या प्रकरणात, देह म्हणजे 'ब्रह्माचे नगर' (ब्रह्मपुर) असे म्हटले आहे. पुढे, ह्या नगरीत एक लहानसे कमलपुष्प असून त्या कमलात लहानसे आकाश आहे असे सांगितले आहे. ह्या आकाशाचा विस्तार जगताच्या आकाशाएवढा पसरलेला आहे असे म्हटले आहे (अयं आकाशः). "मनुष्याला वृद्धत्व आले तरी तो वृद्ध होत नाही, मनुष्याला मरण आले तरी तो मृत्यु पावत नाही, ते खरे ब्रह्मपुर आहे." (छांदो. VIII, १.४). दररोज, सुषुप्तावस्थेत सर्व प्राणिमात्र त्या ब्रह्म-जगतात प्रवेश करीत असतात, पण त्यावरील 'असत्या'च्या आवरणामुळे ते मार्ग चुकतात. एका मोठ्या रोचक गोष्टीच्या आधाराने हे स्पष्ट करून सांगण्यात आले आहे. हे जराहीन, दुःखहीन, मृत्युहीन ब्रह्मतत्त्व काय आहे ते शोधण्यासाठी देवांपैकी इंद्र आणि दानवांपैकी विरोचन हे प्रजापतीकडे गेले, व आपल्याला उपदेश करावा अशी त्यांनी प्रार्थना केली. त्याने त्यांना ब्रह्मचर्य-पालनाचा उपदेश केला आणि नंतर, वस्त्राभूषणादिकांनी स्वतःला सजवून त्यांनी एका पाण्याने भरलेल्या भांड्यात आपापले रूप पाहावे असे सांगितले. विरोचनाने आपले प्रतिबिंब पाहिले आणि त्याला वाटले, आपल्याला आत्म्याचे दर्शन घडले. तो तसाच दानवाकडे गेला आणि म्हणाला, "या जगातच ज्याला सुखी करायचे आहे असा तो आत्मा आहे. ज्याने इहलोकातच स्वतःला सुखी करून घेतले, त्याला परलोकही प्राप्त झाला !" पुढचे आणखी ज्ञान मिळविण्यासाठी तो प्रजापतीकडे पुन्हा गेलाच नाही. पण इंद्राने तसे केले नाही. तेव्हा इंद्राला सांगण्यात आले, "स्वप्नावस्थेत ज्याची हालचाल सुरू असते आणि सुषुप्तीच्या अवस्थेत ज्याचा अनुभव येतो, तो आत्मा आहे." त्या ठिकाणी खरा आत्मा सापडेल हे ऐकून इंद्राचे समाधान झाले नाही. अनेक वर्षपर्यंत ब्रह्मचर्याचे पालन करण्यात घालविल्यानंतर तो पुन्हा प्रजापतीकडे गेला. तेव्हा प्रजापती म्हणाला, "इंद्रा, हे शरीर मर्त्य आहे, त्यावर मृत्यूचा अधिकार आहे. परंतु हे शरीरच त्या अमर आणि निराकार आत्म्याचे अधिष्ठान आहे. हृदयाकाशात संप्रसादाचा (त्या शांतस्वरूपाचा) उदय झाला आणि सर्वोच्च प्रकाशात (ज्योती) जाऊन त्याने आत्मरूप धारण केले म्हणजे तो सर्वश्रेष्ठ व्यक्ती (उत्तम पुरुष) बनतो. तोच पूर्णत्वाप्रत गेलेला मनुष्य, जो देहावस्थेतून मुक्त झालेला असतो, जो देहाच्या इच्छा आणि वासनांनी विचलित झालेला नसतो, आणि ज्याने आपले मूळचे शुद्ध आणि निष्कलंक असे तेजोरूप धारण केलेले असते" (छांदो. उप. VIII. १.४). केनोपनिषदात याचाच उल्लेख "प्रतिबोध विदितम् मतम् अमृतत्वम् हि विन्दते" असे केले आहे. हीच जागृती (प्रतिबोधी अथवा संबोधी) आहे (केनोपनिषद्, II).

उपनिषदात मनुष्य-जीवासंबंधी जो विचार आलेला आहे त्या दृष्टीने पाहता जन्मावर आधारलेले असे मनुष्याचे सामाजिक विभागीकरण होऊ शकत नाही. बृहदारण्यकोपनिषदात ही गोष्ट अगदी स्पष्ट करून सांगितलेली आहे. प्रारंभी हे जगत् ब्रह्म होते, एकच होते. पण त्याचा विकास झाला नाही म्हणून क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे वर्ण (वर्ग) निर्माण केले. या ठिकाणी जो वर्णभेद आहे तो मनुष्याने अंगीकारलेल्या उद्योग-धंद्याच्या स्वरूपावरून आहे, जन्मावरून नाही. (बृह. उप. I ४-११).

आतापर्यंत आपण जे पाहिले ते हेच की, उपनिषदांनी स्वतंत्र विचाराचा पुरस्कार केला. त्यांनी यज्ञसंस्थेचा धिःकार केला. त्यांनी देवांचे अस्तित्व नाकारले. परमात्म्याच्या म्हणजे ब्रह्माच्या प्राप्तीचा मार्ग कर्मकांड नसून सदाचारसंपन्न, शुद्ध आयुष्य जगणे आणि स्वतः प्रयत्न करणे हा तो मार्ग आहे, हे त्यांनी सांगितले. या काळात ब्रह्माचे स्वरूप अनाकलनीय असेच राहिले "नेति, नेति" असेच त्याचे वर्णन केले गेले. आत्म्यासंबंधीची कल्पनाही गोंधळातच पडलेली दिसते. सारांश, शरीर, मन हे व्यक्तिनिष्ठ परंतु आत्मा हा विश्वरूप, विभू असा तऱ्हेतऱ्हेने केलेला आढळतो.

उपनिषदांच्या उपदेशाचा मूलमंत्र म्हणजे त्याग. "यदा सर्वे प्रलीयन्ते कामः" इत्यादी वाचनाद्वारे हा विचार व्यक्त झाला आहे. दुसऱ्या शब्दात "इह अमुत्र फलभोग विरामः" असा हा उपदेश आहे.

(पुढील मजकूर पान १९२ वर)

कलाक्षेत्रात महाराष्ट्र संस्कृती

—प्रा. म. शं. वाबगावकर

एखाद्या विशिष्ट लोकसमूहाच्या धर्मकल्पना, नैतिक धारणा, त्याची कलामूल्ये व त्याच्या नित्याच्या व्यावहारिक समष्टिजीवनात होणारा या सर्व जीवनमूल्यांचा प्रत्यक्ष आविष्कार या सर्वांचा समवाय म्हणजेच त्या लोकसमूहाची संस्कृती. ती माणसांच्या मनात भावनांच्या रूपाने वसते. संकेतांच्या द्वारे विधिनिषेधांच्या कक्षेत येते. साहित्याच्या द्वारे बोलते. महापुरुषांच्या आचरणातून शोभते. ऋषिमुनी, साधुसंत आणि आचार्य यांच्या विचारधनाने समृद्ध होते आणि कलांच्या विविध आविष्कारांमधून अमरत्व प्राप्त करण्याचा प्रयत्न करते. नीती, धर्म आणि अध्यात्म यांच्याप्रमाणेच कला हेही संस्कृतीचे एक प्रधान अंग आहे. धर्म आणि कला यांचे संबंध संस्कृतीच्या संदर्भात तुलनेने विशद करावयाचे तर व्यक्तितत्त्वाचे विश्वतत्त्वात विकसन हे धर्माचे ध्येय असते; तर अमूर्त, केवल विश्वतत्त्वाला व्यक्तितत्त्वाच्या माध्यमातून इंद्रियसंवेदनेच्या द्वारा समूर्त करण्याचा कलेचा प्रयत्न असतो. कलानिर्मितीची प्रेरणा ही मनुष्याच्या जीवनक्रियेशी संबद्ध अशा मूलभूत प्रेरणांपैकी एक आहे अथवा नाही ही मतभेदाची बाब आहे. परंतु कलानिर्मिती ही आत्माविष्काररूप मानली किंवा व्यक्तीच्या सामुदायिक जाणिवेची ती एक संवादात्मक क्रिया मानली तरीही कलानिर्मिती ही एकाच वेळी तिच्या निर्मात्याचे व्यक्तिमत्त्व व त्या निर्मितीचा स्थलकालातीत आशय या दोहोंचेही प्रकटन करीत असते.

संगीत, नृत्य, नाट्य, चित्रपट आणि चित्र, शिल्प इत्यादी ललित कलांच्या क्षेत्रात महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन कसकसे संस्कारित होत गेले आणि त्याच्या कलात्मक जीवनाच्या या उत्क्रांतीतं त्याच्या प्रादेशिक स्वभाववैशिष्ट्यांचा, मनःपिण्डाचा आणि अस्मितेचा आविष्कार कसकसा होत गेला हे पाहू जाता असे दिसते की, रंगभूमीचा काही अंशी व चित्रपटाचा सर्वांशी अपवाद जर वगळला तर संगीत, नृत्य, नाट्य, चित्र, शिल्प इत्यादी इतर सर्व कला महाराष्ट्राची पृथगात्म प्रादेशिक संस्कृती आकाराला येण्यापूर्वी भारतवर्षात परिणतावस्थेला पोचल्या होत्या. ह्या प्रगल्भ कलाधनाचा वारसा सनातन भारतीय संस्कृती–कडून पैतृक संचिताच्या स्वरूपात महाराष्ट्राला लाभला, प्रागैतिहासिक कालापासून तो सातवाहन, आभीर, वाकाटक, राष्ट्रकूट, कलचुरि, चालुक्य, कदंब, शिलाहार, यादव इत्यादी विविध राजकुलांच्या सत्तेखाली इ. स. १३१८ साली दिल्लीच्या खिलजींनी देवगिरीच्या यादवसम्रा-

---

(पान १९१ वरून)

आल्बर्ट स्वाईत्झर यालाच World and life Negotion म्हणतो. मुळात मनुष्यजीव परमात्मास्वरूपीच आहे. ही मनुष्याबद्दलची कल्पना उपनिषदांनी दिली. "तत्वमसि" या शब्दाद्वारे ती व्यक्त होते. मनुष्याची आध्यात्मिक उत्क्रांती कशी होत गेली तेही आपण या प्रकरणात पाहिले. ऋतुमय किंवा काममय पुरुषापासून तो उत्तम पुरुषापर्यंत या कल्पनेचा आविष्कार होत गेलेला आपण पाहिला. या उत्तम पुरुषाच्या लक्षणाविषयी सांगितले,–" प्रतिबोध ", " प्रतिबुद्ध ", " य येषा सुप्तेष्णु जार्गति " –" जो झोपलेल्यांच्यामध्ये जागा असतो. " (केनो. II; बृह. उप. IV; कठो. V. C.)

औपनिषदिक जीवन–क्रमाला बुद्धाने लोकप्रिय कसे बनविले, आणि त्याने " उपनिषुत्सुधर्मः " या वचनाप्रमाणे शुद्ध जीवनावर (शील) भर कसा दिला ते आता आपण पाहू.

टांची सत्ता अक्षरशः धुळीस मिळविली; तोपावेतो महाराष्ट्राचे कलाजीवन नित्यविकसनशीलतेने विलक्षण ऐश्वर्यसंपन्न व समृद्ध होत आलेले होते. वाकाटकांच्या व राष्ट्रकूटांच्या राजवटीतच अजिंठ्याची विश्वविख्यात लेणी कोरली गेली. आठव्या शतकातील राष्ट्रकूट पहिल्या कृष्णराजाच्या राजवटीत वेरूळचे सौंदर्यसंपन्न कैलासलेणे कोरले गेले, इस्लामच्या क्रूर आक्रमणाने महाराष्ट्राच्या वैभवसंपन्न कलाजीवनाची ही परंपरा उध्वस्त केली. घोडे येथील जुम्मा मशिदीत इ. स. १५८६ मधला एक फार्सी शिलालेख आहे. त्यात म्हटले आहे की, "हे परमेश्वरा, हे मुहम्मदा, हे अली! जनाब मीर मुहम्मद झमान याने जेव्हा ऐश्वर्याचे दार आपल्या हाताने आपल्या बाजूस उघडावे अशी हिम्मत धरली तेव्हा परमेश्वराच्या कृपेसाठी तीस व तीन देवळे मोडली व या खराबावादेत (म्हणजे घोडे येथे) इमारतीचा पाया घातला." (ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड १, लेखांक ८९) घोडे ह्या एका गावात मशीद बांधण्यासाठी तेहतीस देवळे पाडली गेली. ह्यावरून संपूर्ण महाराष्ट्रात मूर्ति, शिल्पे, मंदिरे ह्यांचा केवढा प्रचंड विध्वंस झाला असेल ह्याची कल्पना करता येते. महाराष्ट्रीय संगीत, चित्र व नृत्य यांवर मात्र इस्लामी संस्कृतीच्या साहचर्याचा संस्कार दिसतो. पण यादवकालापासून गेली सातशे वर्षे तरी संगीत हीच महाराष्ट्राची प्रमुख व प्रातिनिधिक कला राहिली आहे. चालुक्यवंशीय राजा तिसरा सोमेश्वर याने शके १०५१ मध्ये लिहिलेल्या आपल्या 'मानसोल्लास' ग्रंथात रागतालासह दोन मराठी गीते दिली असून "महाराष्ट्रेषु योषिद्भिः ओवी गेया तु कन्डने" म्हणजे दळणकांडण करताना महाराष्ट्रीय स्त्रिया ओवीसारखे प्रबंध गात असत, असा उल्लेख केला आहे. महाराष्ट्रातल्या जात्यावरच्या ओवीगायनाला अशी किमान नऊशे वर्षांची परंपरा आहे! आणि नित्याच्या मराठी लोकजीवनात संगीत कसे पुरातन कालापासून प्रविष्ट झाले होते याचाही तो एक पुरावा आहे. फार काय, आपआपल्या पद्धतीचा आद्य व आधारभूत ग्रंथ म्हणून उत्तरेचे औत्तरीय व दक्षिणेचे दाक्षिणात्य संगीत विद्वान आजही ज्यावर आग्रहाने अधिक हक्क सांगतात ते 'संगीत रत्नाकरा'सारखा संगीत शास्त्राचा प्रमाण ग्रंथ महाराष्ट्राच्या तत्कालीन राजधानीत देवगिरीला यादववंशीय सिंघणराजाच्या राज्यकालात म्हणजे इ. स. १२१० ते १२४७ च्या दरम्यान रचला गेला.

हा ग्रंथ रचणाऱ्या शार्ङ्गदेवाच्या तीन पिढ्या मराठ्यांच्या राजदरबारात वाढल्या व वावरल्या होत्या. शार्ङ्गदेवाचे वडील सोढलदेव हे तर यादवांचे श्रीकरणाग्रणी होते. शार्ङ्गदेवाने सदाशिव, ब्रह्मा, भरत, कश्यप, मतंग, याष्टिक, दुर्गा, शक्ती, शार्दूल, कोहल, विशाखिल, दत्तिल, कम्बल, अश्वतर, वायु, विश्वावसु, रंभा, अर्जुन, नारद, तुंबरु, आंजनेय, मातृगुप्त, रावण, नंदिकेश्वर, स्वाति, गण, बिंदुराज, क्षेत्रराज, राहल, रुद्रट, नान्यदेव, भोजपरमर्दी, सोमेश्वर व भरताच्या नाट्यशास्त्राचे काही टीकाकार इत्यादी अनेक पूर्वसूरींचा उल्लेख आपल्या ग्रंथात केला आहे. पण संगीतावर ग्रंथरचना करणाऱ्या ह्या ग्रंथकारांपैकी महाराष्ट्रातील कोणते व इतरत्र उदयास आलेले कोणते हे निश्चित सांगता येत नाही. कारण मतंगमुनि, नारद, आंजनेय, नान्यदेव ह्यासारखे काही थोडे ग्रंथकार वगळले तर इतरांचे ग्रंथही आज उपलब्ध नाहीत. संगीतरत्नाकरावर चार संस्कृत, दोन तेलगु व एक हिंदी टीका रचण्यात आल्याचे कुन्हन राजा यांनी दाखविले आहे. (संगीतरत्नाकर, अडयार प्रत, प्रस्तावना पृ. १०) त्यातील एक संस्कृत टीका तर तेलंगणाचा राजा सिंहभूपाल ह्याने लिहिलेली आहे. तो इ. स. च्या चवदाव्या शतकात होऊन गेला. ह्यावरून महाराष्ट्रात निर्माण झालेल्या 'संगीतरत्नाकरा'ला त्याकाळीच महाराष्ट्राबाहेर सर्वदूर प्रामाण्य कसे लाभले होते ते लक्षात येते. विजयनगराच्या राजांच्या आश्रयाला असलेल्या पंधराव्या शतकातील कल्लीनाथाचीही संगीतरत्नाकरावर संस्कृत टीका उपलब्ध आहे. शार्ङ्गदेव आपल्या संगीतरत्नाकरात त्या काळी विप्रकीर्ण वर्गातील ज्या छत्तीस प्रकारच्या गानप्रबंधांचे गायन होत असल्याचे सांगतो त्यात ओवीसारखा अस्सल मराठी छंद आणि धवल म्हणजे धवळ्यासारखे खास मराठी गानप्रबंध आहेत. आद्य मराठी कवयित्री महदंबा हिच्या धवळ्यांचे स्मरण येथे सहजच होते. आणि विवाहप्रसंगी गायल्या जाणाऱ्या ह्या वरविषयक गीतांतून धार्मिक-सामाजिक सोहळ्यातील लोकसंगीताचा तत्कालीन वापरही सहजच कळतो. शार्ङ्गदेवालाच समकालीन असणाऱ्या पार्श्वदेवाच्या 'संगीत समयसारा'त अनेक अस्सल मराठी संज्ञा व संगीतप्रकार वर्णिले

आहेत. संगीतरत्नाकराचा पूर्वोक्त टीकाकार कल्लीनाथ 'रत्नाकरा'तील विषयविवेचनात "गोपालनायकही असे गात" असा ज्यांच्या गानपद्धतीचा गौरवान्वित हवाला देतो ते देवगिरीच्या यादवांच्या दरबारातले अग्रगण्य संगीतज्ञ व गायक गोपालनायक ह्यांना अल्लाउद्दिन खिलजीने सक्तीने दिल्लीस नेले. तेथे अमीर खुश्रू त्यांच्यापाशी संगीत शिकला व त्यांच्यात गायकीत थोडा फेरफार करून त्याने 'ख्याल' गायकी काढली. म्हणजे ख्याल गायकीचे जनकत्वही पर्यायाने असे एका महाराष्ट्रीयाचे आहे! दक्षिणेत तंजावरचे प्रतापसिंहमहाराज व तुळजाराजे भोसले ह्या मराठी नृपतींच्या प्रोत्साहनाने अस्सल मराठी चाली व गायनप्रकार दाक्षिणात्य संगीतातही प्रविष्ट झाले. तुळजाराजे भोसले यांनी स्वत: इ. स. १७८३ च्या सुमारास 'संगीत सारामृत' या नावाचा ग्रंथ रचला. याच सुमारास उतके गोविंदाचार्य ह्यांच्या 'नाटचशास्त्रसंग्रह' ह्या मराठी गद्यग्रंथाची निर्मिती झाली. संगीतरत्नाकराच्या नृत्याध्यायाच्या आधारे व अन्यग्रंथांचेही आधार घेवून हा ग्रंथ रचला आहे. तो अपूर्व असला तरी संगीत व नृत्य ह्यावरील आद्य मराठी गद्यग्रंथ ह्या दृष्टीचे त्याचे महत्त्व आहे. अमीर खुश्रूच्या ख्याल गायकीपेक्षा शारंगदेवाची प्रबंधगायकी व ध्रुपदगायनरूप तिचा पर्यायच अठराव्या शतकापर्यंत अधिक लोकप्रिय होता. व त्यासंबंधीची ग्रंथरचनाही होतच होती. रागांची लक्षणे व उदाहरणे ज्यात विवेचिली आहेत अशी अनेक जुनी विस्कळित बाडे पुण्याचे सुप्रसिद्ध सरदार श्री. आबासाहेब मुजुमदार ह्यांच्या संग्रही आहेत. 'संगीतदर्पण' ह्या प्रसिद्ध संस्कृत ग्रंथाचा कर्ता लक्ष्मीधरसुत चतुर दामोदरपंडित हा इ. स. १६२५ च्या सुमारास होऊन गेला. त्याच्या ह्या ग्रंथावरील एका जुन्या मराठी गद्य टीकेचे हस्तलिखित मराठवाडा साहित्य परिषदेच्या हस्तलिखित संग्रहात संगृहीत करण्यात आलेले आहे.

अमीर खुश्रूला साधारण समकालीन असणाऱ्या संत नामदेवांनी पोटार्थी ख्यालगायकांचा केलेला निषेध लक्षणीय आहे. नामदेव म्हणतात —

राजसी तामसो जे गान – तोडी ताल मोडी मान
ख्याल गावे कंपस्वर – रिझवी दात्याचे अंतर
हे तो प्रीति धनावरी – अर्था अनर्थ-तो करी
नामा म्हणे शास्त्रार्थ – अर्थ तोचि होय स्वार्थ

(नामदेवगाथा, इंदिरा प्रेस, अभंग क्र. २२६१)

नामदेवांनीच श्रीपांडुरंगासवे स्वप्नात येऊन कवित्वाचा आदेश ज्या तुकोबांना दिला आणि "नामदेवापायी स्वप्नी झालेल्या या भेटीचा कवित्वप्रसाद ज्या तुकोबांच्या पोटी" राहिला होता त्या तुकोबांनीही याच थाटात तत्कालीन पोटार्थी गायकांचा परामर्श घ्यावा हे स्वाभाविकच होते. तुकोबा म्हणतात —

वरते करोनिया तोंड – हाका मारितो प्रचंड
राग आळवितो नाना – काय गातो ते कळेना
आशा धरोनि मनी – काही देईल म्हणऊनी
पोटा एकासाठी – तुका म्हणे जाले कष्टी

(तुकारामांच्या अभंगांचो (सरकारी) गाथा, क्र. २९७०). रामदासांनी 'धन्य ते गायनी कळा' अशा शब्दात केलेले गायनकलेचे गौरव येथे सहज स्मरते. फार काय, भूप, केदार, कल्याण, पहाडी, बागेश्री, जयजयवंती, आसावरी, खमाज, सारंग, वसंत, भैरवी, भीमपलास, कानडा, काफी, धनाश्री इत्यादी अनेक रागातील पदे रामदासांच्या गाथ्यात हिंदी व मराठी या दोन्ही भाषांतून रचलेली आढळतात. उदाहरणार्थ—

सारंगी में सारंग रे ।। ध्रु. ।।
जंत्र गुनीजन ढोलक बाजे । चलत संगीत रंग रे ।।
तान मान में ध्यान लगावें । गावतु है श्रीरंग रे ।।
खेलत है नंदलाल वसंत ।। ध्रु ।।
अबिर सिलारस मृगमद केसर
डारत लाल गुलाल ।। १।।
तेल फुलेल गुलाल कुसुंबा । छिरकत मदनगुपाल ।।

(समर्थांची गाथा, पृ. ४७८।४७९). हे रामदासांचे पद 'सारंग' व 'वसंत' या दोन रागात बांधलेले आहे व मौज ही की ही दोनही रागांची नावे या पदात गुंफिली आहेत! समर्थांच्या गाथ्यात पदांच्या शिरोभागी रागांचे नामोल्लेख आढळतात; तसे इतर संतांच्या प्रकाशित वाङमयात ते आढळत नाहीत. पण संतांचे अभंग आजही वेगवेगळ्या रागात गायिले जातात. नाथ व इतर सिद्ध यांच्या साहित्यात पदांची रचना रागदारीत केलेली उपलब्ध आहे. (सिद्ध साहित्य, पृ. ४७४) सिद्ध साहित्यात एकूण अठरा राग आलेले आहेत. सिद्ध आणि इतर उत्तरकालीन संत यांनी ही रागदारी लोकसंगीतातून घेतली असावी. पुढे या लोकसंगीताचे संहितीकरण होऊन त्यालाच रागदारीचे स्वरूप मिळाले असावे. नाटचशास्त्राच्या ३२ व्या

अनुक्रमणिका

अध्यायात जातींची उदाहरण देताना प्राकृत भाषांतील उदाहरणे दिली आहेत हे त्या दृष्टीने सूचक आहे. या लोकसंगीतपरंपरेचाच 'देशी' या व्यापक संज्ञेत शास्त्रकारांनी समावेश केला. सिद्ध, नाथ व इतर साधुसंत यांच्या संगीतसाधनेला असा इसवीसनाच्या निदान सहाव्या-सातव्या शतकापासूनचा इतिहास आहे. नामदेवांनी पोटार्थी ख्यालगायकीचा निषेध केल्याचे वर सांगितले आहेच. शिखांच्या 'ग्रंथसाहेबा'त खुद्द नामदेवांची म्हणून जी ६१ पदे आहेत त्यांना 'राग' सांगितले आहेत. नामदेवांचा थोडा पूर्ववर्ती 'वछाहरण'कर्ता महानुभाव कवी दामोदर पंडित हा पट्टीचा संगीतशास्त्रज्ञ व गायक होता. दामोदर पंडिताची रागतालात बांधलेली हिंदी भाषेतील अनेक पदे उपलब्ध झालेली आहेत. महानुभाव वाङमयाचे सुप्रसिद्ध संशोधक श्री. ह. ना. नेने यांनी ती प्रसिद्ध केली आहेत.

यादवसत्तेच्या लोप होवून पुरते पावशतकही लोटले नव्हते व देवगिरीस महंमद तघलखाचा सुभेदार बाटलूखान कारभार पाहत होता त्यावेळी तेथे येऊन गेलेल्या 'इब्न बतूता'च्या प्रवासवर्णनात यादवांच्या दरबारी संगीतशाळेचे भव्य वर्णन आले आहे. गायकगायिकांची एक स्वतंत्र पेठच देवगिरीला होती. तिच्या मध्यभागी उंची गालिच्यांनी शृंगारलेला भव्य शामियाना होता त्यात दर गुरुवारी मुख्य गायनाधिकारी समळचा ताफ्यासह गायनाची मजलस भरवी व तिसऱ्या प्रहरापासून देवगिरीतल्या साऱ्या नामांकित गायिका गटागटाने येऊन 'हजेरी' देऊन जात. राजा स्वतः या कार्यक्रमांना उपस्थित असे. संगीतरत्नाकारात शार्ङ्गदेवाने केलेल्या नृत्यशाळेच्या व सभासंनिवेशाच्या वर्णनाचे त्यानंतरच्या पाउणशे वर्षांतले हे यथातथ्य चित्र इब्न बतूताच्या प्रवासर्णनावरूनही अशा प्रकारे आपणाला कळून येते. या गायकगायिकांच्या वैभवाची, घराची, त्यांच्या आतील उंची गालिचे, झोपाळे व त्यावर पहुडणाऱ्या सुंदर वस्त्रालंकारांनी विनटलेल्या रूपगर्विता स्त्रिया, त्यांना वारा घालणाऱ्या दासदासी ह्यांची बतूताने विस्तरशः केलेली चक्षुर्वैसत्यं वर्णने मुळातूनच वाचली पाहिजेत. त्यावरून यादवकाल हे जे महाराष्ट्र संस्कृतीचे सुवर्णयुग त्या युगात संगीनृत्यादि ललित कलांचा कसा परमोत्कर्ष झाला होता हे ध्यानात येते. पुढे यावनी अमलात झालेले एकनाथपंचकातील कवी दासोपंत (इ. स. १५५१–१६१६) ह्यांच्या प्रकाशित १६०० पदांपैकी बहुसंख्य रागबद्ध आहेत. त्यात चाळीसपंचेचाळीस राग आलेले आहेत. काफी, बहिरवी रागातली दासोपंताची हिंदी पदेही आहेत. एकनाथांच्या पदात संगीत, गेयता व त्याहून विशेष म्हणजे पुढच्या शाहीरकाव्यातल्या लोकसंगीतावलंबाचा स्पष्ट उगम आहे. किंबहुना मराठीतले आद्य लावणीकार एकनाथ होत असे म्हटले तरी शोभेल. रामदासांच्या गाथ्यातील पदांना राग–ताल सांगितलेले आहेत ह्याचा उल्लेख वर आला आहेच. इस्लामी धर्मात संगीत वर्ज्य मानले आहे. तथापि महाराष्ट्रातले मुसलमान राजे देखील गानपंडित असत. विजापूरचा इब्राहीम आदिलशहा दुसरा (इ. स. १५८०–१६२७) हा मोठा गायक, कवी व अनेक भाषाभिज्ञ होता. मराठी भाषा त्याला उत्तम प्रकारे अवगत होती. भारतीय संगीतातील रागरागिणी व नवरसांची कल्पना म्हणजे या शास्त्रातील परिणतीचे शिखरच होय असे त्याचे मत होते. त्याच्या दरबारात भारताच्या सर्व भागातील तसेच परदेशातीलही अनेक गायकवादक असत. त्याने निरनिराळ्या रागतालात स्वतः बांधलेल्या ध्रुपदांपैकी पहिली चीज गणपतीवर व दुसरी सरस्वतीवर आहे! या आदिलशहाचा–किताब इ. नवरस' हा संगीतावरील ग्रंथ दिल्लीच्या संगीत नाटक अकादमीने आता छापला आहे.

पुढे आंग्लभाषेच्या काळात नोटेशनच्या म्हणजे स्वररचनेच्या निर्मितीचा उपक्रम झाला तोही प्रथम महाराष्ट्रात. इ. स. १८७४ मध्ये 'पुणे गायन समाज' निघाला. मद्रासेत १८८३ साली 'ज्युबिली गायन समाज' हा पहिला संगीत–समाज काढण्याचा आद्य मानही सहस्रबुद्धे नामक एका महाराष्ट्रीयाचाच. १८८६ मध्ये घारपुऱ्यांचे 'संगीत मीमांसक' हे प्रसिद्ध मासिक सुरू झाले. नाटयाचार्य देवलांचे बंधू रावसाहेब कृष्णराव देवल यांनी श्रुतिस्वर सिद्धांताची चर्चा इ. स. १८९०त सुरू केली. यापूर्वीच गायनाचार्य पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांनी इ. स. १८८३त 'संगीत दर्पण' मासिक मुंबईत सुरू केले होते व त्यांच्या 'समाजा'त डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, न्या. मू. तेलंग, म. मो. कुंटे, महादेव चिंतामण आपटे अशी तत्कालीन सार्वजनिक जीवनातली मोठमोठी कर्तृत्ववान व आपापल्या क्षेत्रातील अग्रणी माणसे संगीत शिकावयाला येत असत. बाळ-

अनुक्रमणिका

कृष्णबुवांचे शिष्य पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांनी समूहसंगीत व प्रार्थनासंगीत यांचा पाया घातला; आणि तद्द्वारा संगीतकलेचा ओघ नव्या युगधर्माला अनुरूप अशा राष्ट्रप्रेम, भक्ती, ज्ञान, वैराग्य इत्यादी उदात्त विषयांकडे वळविला. पं. वि. ना. भातखंडे (इ. स १८६०–१९३६) यांनी 'लक्ष्यसंगीत' व 'हिंदुस्थानी संगीत पद्धती' प्रसिद्ध केली. आता या मराठी गानपंडिताचे ग्रंथ हिंदीत अनुवादित होऊन भारतमान्य झाले आहेत. मिराशीबुवांनीही नोटेशनयुक्त खानदानी चिजांची पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. नाटचसंगीताने जुन्या खानदानी चिजांची वूज राखली तर चित्रपट-संगीतात आरंभी नाटचसंगीताची पद्धती, पुढे बंगाली पद्धती, मग पंजाबी ढंग आणि आता परत महाराष्ट्रीय वा युरोपीय पाश्चिमात्य चित्रपटातल्या संगीत चालीचे अनुकरण अशी आवर्तने होत आली आहेत! पण एकंदरीत यादवकालापासून आजतागायत महाराष्ट्राच्या सर्व थरांतील लोकजीवनात शास्त्रीय संगीताचा वा लोकसंगीताचा निकट संपर्क सतत राहत आला आहे. अल्लादियेखाँ, अब्दुल करीमखाँ यांच्यासारख्या नामवंत औत्तरीय गवयांना देखील महाराष्ट्रात येऊन राहावेसे वाटले ते याचमुळे. म्हणूनच शास्त्रीय संगीताची संस्कारित अभिरुची हा सुसंस्कृत मराठी मनाचा एक विलोभनीय विशेष ठरला आहे.

चित्र व शिल्प क्षेत्रातही भृगुशिल्प पद्धतीचे नाशिकचे सुंदरनाथ मंदिर, दाक्षिणात्य मय पद्धतीची 'नारोशंकर' देवळे, मराठवाडचातल्या कोंडापूरच्या उत्खननातली गांधारदेशीय अति प्राचीन कलेच्या नमुन्यांची मृण्मयचित्रे, मृत्तिकेची अलंकृत पात्रे, धातु-मूर्ती ही महाराष्ट्राच्या इतिहासपूर्वकालीन कलावैभवाची साक्ष होय. प्राचीन भारतीय वस्तुशिल्पाचे भृगु, त्याचा पुत्र शुक्र, अपराजित इत्यादि अनेकांनी लिहिलेले ८००–९०० ग्रंथ उपलब्ध आहेत. नागर, वेसर, द्राविड, व्यंतर, कलिंग, यामुन ही सहा वळणे भारतीय स्थापत्य व शिल्पचित्रात प्रचलित होती. याहूनही वेगवेगळे अनेक प्रकार महाराष्ट्रातील जुन्या अवशेषात आढळतात. नग्नजित, विश्वकर्मा, मय इत्यादि स्थापत्य-चित्रशिल्पज्ञ हे उत्तर भारतातले. पुराणात अठरा स्थापत्य विशारदांचा गौरवोल्लेख येतो, भारशिव, सात वाहन, वाकाटक आदी राजकुलांनी पुरस्कृत केलेली संस्कृती हीच महाराष्ट्राच्या सागर सांस्कृतिक जीवनाची पूर्वपीठिका होय. तिचाच विकास राष्ट्रकूट, चालुक्य यादव ह्यांनी इस्लामी आक्रमणापावेतो केला. ह्याचे प्रत्यंतर महाराष्ट्रातील स्थापत्यचित्रशिल्पाच्या इतिहासातही येते. विष्णुधर्मोत्तरातील चित्रसूत्रासारखा महान प्रमाणग्रंथ लिहिणारा भृगुशुक्रपरंपरेतील मार्कंडेय हा विदर्भातील चांदा जिल्ह्यातील मार्कंडचाचा. चालुक्य शिल्पपद्धतीच्या अत्युत्कृष्ट प्राचीन मंदिरांचे दर्शनीय अवशेष आजही मार्कंडा येथे विपुल आहेत. संगीतरत्नाकरासारखा संगीतशास्त्राचा प्रमाण आकर-ग्रंथ जसा महाराष्ट्राने भारताला दिला तसा चित्र-सूत्रासारखा महान् ग्रंथही महाराष्ट्रात निर्माण झाला ही महाराष्ट्राला निःसंशय अभिमान वाटण्याजोगीच बाब आहे. सोमेश्वर चालुक्यराजाचीही चित्रसूत्रे आहेत. अजिंठा, वेरूळ, कार्ले, भाजे, जोगेश्वरी, घारापुरी, अंबरनाथ, रामटेक, पवनार, भद्रावती, मार्कंडा इत्यादि किती तरी स्थाने गेल्या दीडहजार वर्षातल्या महाराष्ट्र-जीवनातले चित्रशिल्पवैभव उरी–पोटी जपत आजही उभी आहेत. घारापुरीचे अत्यद्‌भुत, नितांतसुंदर खोदकाम कुणी केले, केव्हा केले हे त्यातला शिलालेख पोर्तुगीजांनी हरविल्यामुळे नक्की सांगणे कठीण झाले आहे. पण घारापुरीतली शिवचित्रे ही भारतीय कलेत सर्वोच्च, सर्वश्रेष्ठ ठरली आहेत. फार काय, महाराष्ट्रा-बाहेरील खजुराहोचे लक्ष्मणमंदिर व इतर मंदिरे सजविणारे कारागीर महाराष्ट्रातून तेथे गेलेले होते, असे इतिहास सांगतो. एकूणच महाराष्ट्राचा राजकीय इतिहास, मराठी माणसाच्या मनःपिंडाची घडण व मराठी शिल्प ह्या तिहींच्या घडणीवर सह्याद्रीच्या पर्वतश्रेणीचा परिणाम झाला आहे. चालुक्य-शिल्पानंतर यादवशिल्पात चुना न वापरता देवळे बांधण्याची हेमाडपंती पद्धती उल्लेखनीय आहे. हेमाडपंती पद्धतीचे शुद्ध स्वरूप महाराष्ट्राच्या चतुःसीमा ओलांडून दूरवर ओरिसातल्या भुवनेश्वरमंदिराच्या उभारणीत देखील पोचलेले दिसते. वऱ्हाडात रोहिण-खेड येथे एका मशिदीत एक शिलालेख आहे. एरवी पाहिले तर डोळ्यांना तो लेख कधी दिसत नाही. पण भिंतीतल्या त्या शिलेवर पाण्याने भिजविलेले ओले फडके फिरविले की त्या शिलालेखाची अक्षरे दिसू लागतात! महाराष्ट्रातील शिल्पसौंदर्याच्या अशा नवल-कथा किती म्हणून सांगाव्या! महाराष्ट्राच्या इतिहासकालीन पराक्रमाची पताका मिरविणारे शिवनेरी,

पुरंदर, सिंहगड हे व शिवाजीमहाराजांनी बांधलेले सह्याद्रीतले अनेक किल्ले, पेशव्यांनी बांधलेली अमृतेश्वर, ओंकारेश्वरासारखी देवळे आणि त्यांचे शनिवारवाडा, विश्रामबागवाडा हे राजवाडे हे वस्तुत: यादवशिल्पाचेच वारसदार होत. यातील कित्येक किल्ले मूलत: अतिप्राचीन आहेत. लोहगडच्या किल्ल्यात तर बौद्धकालीन गुहा आहेत.

शिल्पकलेप्रमाणेच चित्रकलेचीही महाराष्ट्राची अभिरुची व परंपरा अभिमानास्पद आणि उल्लेखनीय आहे. जुन्या हस्तलिखित पोथ्यांमधली जिवंत रंगचित्रे आजही आपले मन वेधून घेतात. नागपूरकर भोसल्यांच्या खाजगी संग्रहातले ज्ञानेश्वरीचे एक प्राचीन हस्तलिखित नागपूरच्या केंद्रीय संग्रहालयात आहे. त्यातली भारतीय युद्धप्रसंगी कृष्ण अर्जुनाला गीतोपदेश करीत आहेत हे अथवा गणपती, सरस्वती इत्यादि चित्रे इतकी अप्रतिम आहेत की आजच्या मोठमोठ्या चित्रकारांनीही क्षणभर स्तंभित व्हावे. वापरलेले रंग तर इतके अम्लान, टवटवीत आणि ताजे की जणु ती चित्रे नुकती क्षणापूर्वी रंगविलेली वाटावी. इतिहासकालीन राजेरजवाडे, सरदार–दरकदार, मुत्सद्दी व सेनापती ह्यांच्या वाड्यातील भित्तिचित्रांच्या द्वारा देखील हा चित्रकलेचा वारसा आपणापर्यंत पोचला आहे. मेणवली येथील नाना फडणवीसांच्या वाड्यातली भित्तिचित्रे ह्या संदर्भात कुणालाही सहज स्मरावीत. मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेत विस्तार झाला त्या काळी बांधल्या गेलेल्या सागर येथील एका जुन्या महाराष्ट्रीय वाड्यात आजही तेव्हाच्या महाराष्ट्रीय चित्रकलेचा वारसा जतन करणारी ही उत्कृष्ट भित्तिचित्रे पाहावयास मिळतात. पुण्यात पेशव्यांच्या दरबारी ईस्ट इंडिया कंपनीतर्फे असलेला इंग्रज रेसिडेंट मॅलेट ह्याचा सासरा चित्रकार वेल्स् ह्याला पेशव्यांनी खुद्द शनिवारवाड्यातच चित्रशाळा काढून दिली होती. त्याने रंगविलेल्या नाना फडणवीस, महादजी शिंदे व सवाई माधवराव पेशवे ह्यांच्या प्रतिमा अजून पुण्यात आहेत. त्याकाळी समाजरचनेत वीस प्रकारचे हस्तकलाकुशल कारागीर असत. भिवा सुतार, बाबुराव पेंटर ह्यांची घराणी या जुन्या परंपरेतीलच होत. पुढे इंग्रजी अमदानीत २ मार्च इ. स. १८५७ रोजी मुंबईचे प्रसिद्ध सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट अॅन्ड इन्डस्ट्रीज् हे विद्यालय सुरू झाले. केरळच्या राजघराण्यातील राजपुरुष असलेले प्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा (इ. स. १८४८–१९०६) ह्यांचे वास्तव्य मुंबईत असे. गणपतराव म्हात्रे, वाघ, तालीम, करमरकर, कोल्हटकर, फडके, बाबूराव पेंटर, नी. म. केळकर, दलाल अशी कितीतरी नावे शिल्प व चित्रकलांच्या क्षेत्रातला महाराष्ट्राचा विक्रम आठवू जाता ओठावर येतात.

नृत्यक्षेत्रात 'संगीतरत्नाकर'कार शार्ङ्गदेवाच्या लेखनातील 'कोल्हाटिक' सारखे खास मऱ्हाटी शब्द यादवकालीन महाराष्ट्रातील लोकनृत्यादिक काही नृत्यपरंपरांचे अस्तित्व सुचवितात. ज्ञानेश्वरीच्या सतराव्या अध्यायात तामस दानाचे उदाहरण देण्याच्या निमित्ताने जे वर्णन येते त्यावरून यादवकालातही तमाशाचे काही पूर्वरूप अस्तित्वात होते असे स्पष्ट दिसते. 'दौलतजादा' करण्याचा काही प्रकारही त्यात होता असेही दिसते. त्या ओव्या अशा :—

मग म्लेंच्छांचे वसंठे । दांगाणे हात कंकटें ।
कां सिहबीरें चौहटें । नगरिचें तें ॥ २९३ ॥

तिहीं तिहि ठाईं मीलनीं । समयो सांजवेल कां रजनी ।
तेव्हंलि उदारां होणें धनीं । चोरियेचां ॥ २९४ ॥

पात्रें भाट नागारी । सामान्या स्त्रिया जुवारी ।
जियें मूत्तिवंतें भुररीं । मूलावेया ॥ २९५ ॥

रूपनृत्याची पुरवणी । तेयां पुढे डोलेभारणीं ।
गीत भाटीव श्रवणीं । कर्णजपु ॥ २९६ ॥

तेया हि वरि अलुमालु । घे फूलागंधाचा परिमलु ।
तवं भ्रमाचा तो वेतालु । अवतरे चि ॥ २९७ ॥

येथे 'रूपनृत्याची करवणी' या चरणात रूप म्हणजे नाट्य, नाट्याभिनय, नाटक असा अर्थ आहे. संस्कृतात नाटकाला 'रूपक' असाच शब्द आहे. वामनाच्या काव्यालंकारसूत्रवृत्तीत 'संदर्भेषु दशरूपकं श्रेय:' म्हणजे सर्व प्रकारच्या साहित्यात नाटक श्रेष्ठ असे सूत्र आले आहे. यादवकालीन मराठीत 'रूप करणे' या वाक्संप्रदायाचा अर्थ 'नाट्याभिनय करणे' असा होता हे ज्ञानेश्वरीच्याच आगेमागे निर्माण झालेल्या नरेंद्राच्या रुक्मिणी स्वयंवरावरूनही दिसते. भीमकराजाच्या दरबारात भाट वेगवेगळ्या राजांचे वर्णन गीतसरणीने करतो व किन्नर 'रूप' करून सर्व सभेला चकित करतो—

ऐसा करिता अवस्वरू । रसरंगे धाला गगन सरोवरू
मग रूप करिताय खेचरू । नाटे न्नतुर्विधे ।।

— रु. स्व. ओवी ३१९

असे तेथे वर्णन येते. तात्पर्य, ज्ञानेश्वरीच्या पूर्वोक्त स्थली यादवकालातल्या तमाशाचेच ते चित्र आहे यात शंका नाही. आणि म्लेंच्छांची वसतिस्थाने, त्यांच्या (सैन्याची) शिबिरे, लावण्या हे तमाशाचे जन्मस्थल होय हा महत्त्वाचा ऐतिहासिक तपशीलही या वर्णनातून आपल्या हाती येतो.

आधुनिक काळात १९२० ते ३० च्या सुमारास सुखदेवप्रसादांसारख्या कथक नर्तकांनी महाराष्ट्राव प्रथम पदार्पण केले. मास्टर नानाथ, रघुवीर सावकार आदी नटांनी नृत्यकलेचा विशेष अभ्यासही केला. रशियन नर्तिका ॲन पॅव्हलोव्हा हिच्या प्रेरणेने उदयशंकरांनी भारतीय नृत्यात नवा मनु प्रवर्तित केला. रवींद्रनाथ टागोरांनी नवकुमार ह्या नर्तकाच्या साह्याने शांतिनिकेतनमध्ये 'मणिपुरी नृत्याचे पुनर्घटन केले. ह्याच सुमारास मलबारचे कथाकलीपटु कृष्णन् कुटी ह्यांनी महाराष्ट्रातील प्रख्यात नर्तिका लेडी मेनका यांच्या साहाय्याने व त्यांची भाची हिमा केसरकोडी हिच्यासमवेत पहिली भारतीय "बॅलेट" महाराष्ट्रात म्हणजे मुंबईत तयार केली. कथकाचार्य लच्छुमहाराज, बनारस घराण्याचे सितारादेवी व गोपीकृष्ण, मणिपुरीचे विपिनसिंह, भरतनाट्याचे गोविंदराज पिले अशी कितीतरी मंडळी मुंबईत येऊन नांदली आहेत. खास महाराष्ट्रीय अशा भरतनाट्यात पार्वतीकुमार वा कथकनृत्यात कल्याणपूरकर व श्रीमती जोशी अशी नावे येथे सहजच स्मरतात. रोहिणी भाटचांचा उल्लेख तर या संदर्भात आवर्जून केला पाहिजे. आदिवासी नृत्ये, लोकनृत्ये, गोंधळ, ललित, भारुडे व तमाशा यातून नृत्यकला आविष्कृत होत राहिली तरी नृत्यकलाक्षेत्रात संगीताच्या तुलनेने महाराष्ट्र अलिप्त व उदासीन राहिला आहे.

नाट्य व रंगभूमी या क्षेत्रात मात्र रंगभूमीवरील नाट्यप्रबंधाचा, अभिनयाचा व संगीताचा दर्जा लक्षात घेता एक बंगाल वगळल्यास अखिल भारतात महाराष्ट्रच अग्रेसर आहे. आधुनिक रंगभूमीच्या रूपातला महाराष्ट्राचा नाट्याविष्कार प्रथम इ. स. १८४३ त विष्णुदास भाव्यांनी जन्मास घातला. लिखित नाट्यप्रबंधाचा प्रयोग १८६१–६२ पासून सुरू झाला. त्या पुढचा टप्पा 'बुकिश' नाटकाचा. इ. स. १८४२ त जगन्नाथ शंकरशेटांनी मुंबईत पहिले देशी नाटकगृह उभारले. इ. स. १८५५ त 'अमरचंद वाडीकर' ही नाट्यसंस्था मुंबईत जन्मली. १८८० साली अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'शाकुंतला'ने रंगभूमीवर नवे युग प्रवर्तित केले. ८ जुलै १९२१ रोजी गंधर्व व ललितकलादर्श यांनी टिळक स्वराज्य फंडासाठी केलेला 'मानापमाना'चा अपूर्व संयुक्त प्रयोग हा किर्लोस्कर युगातील मराठी रंगभूमीच्या यशोवैभवाचा परमोच्च बिंदु. तेथून हळुहळु उतरत्या कळेला आरंभ झाला. १९३२ त नाट्यमन्वंतराचे नवतंत्राचे 'आंधळयांची शाळा' रंगभूमीवर आले. पाश्चिमात्य देशातही लीटल् थिएटर्स, कॉम्युनिटी थिएटर्स यांच्या द्वारा १९२० ते १९३० च्या काळात रंगभूमी जगविण्याचे असेच प्रयत्न करण्यात आले होते. १९३० ते ३५ च्या दरम्यान प्रमुख मराठी नाट्यसंस्था मृत्युपंथाला लागल्या. १९४१ त रांगणेकरांचे नाट्यनिकेतन स्थापन झाले. १९४३ त सांगलीला झालेल्या रंगभूमीच्या शतसांवत्सरिक महोत्सवानंतर हळुहळु नव्या जीवनाची काही चैतन्यलक्षणे पुनः नव्याने दिसू लागली आहेत. पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, पु. व्यं. दारव्हेकर, मधुकर तोरडमल, वसंत कानेटकर, वि. वा. शिरवाडकर, रत्नाकर मतकरी, बबन प्रभु, व्यंकटेश माडगूळकर, सुधा करमरकर, सई परांजपे, बाळ कोल्हटकर, विद्याधर गोखले, मधुसूदन कालेलकर, वसंत सबनीस, चि. त्र्यं. खानोलकर अशी कितीतरी नावे मराठी रंगभूमीच्या भविष्यत्कालीन ऊर्जिताची पुरःफले म्हणून नोंदली जातील. शेक्सपियर, इब्सेन, पिरांदेल्लो, कामू, ब्रेख्त इत्यादिकांचे संस्कार आत्मसात् करीत मराठी रंगभूमी राता 'ननाटचा'पावेतोची अद्ययावतता मिरवीत आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या जीवनातील राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अंगाच्या पोषणात मराठी रंगभूमी, नाट्यकला व नाट्यवाङमय यांचा वाटा निःसंशय फार मोठा आहे.

भारतीय चित्रपटकला व व्यवसाय यांचे आद्यप्रवर्तक दादासाहेब फाळके हे त्र्यंबकेश्वरला एका व्युत्पन्न संस्कृतपंडिताच्या पोटी जन्मलेले म्हणजे महाराष्ट्रीयच. एस्. एन्. पाटणकर, अनन्तराव मिस्त्री, बाबूराव पेन्टर हे आद्य महाराष्ट्रीय चित्रपट–निर्माते. व्ही. शांताराम, मास्टर विनायक, भालजी पेंढारकर. प्र. के.

अत्रे, पार्श्वनाथ आळतेकर, विश्राम बेडेकर, फत्तेलाल, केशवराव दाते, अच्युत रानडे, राजा नेने, दत्ता धर्माधिकारी, गजानन जागीरदार, राजा परांजपे, पु. ल. देशपांडे, माडगूळकर बंधु, सुधीर फडके, गोविंदराव टेंबे, सी. रामचंद्र, शांता आपटे, दुर्गा खोटे, वनमाला, हंसा वाडकर अशी किती तरी नावे चित्रपट–क्षेत्रातल्या महाराष्ट्राच्या कर्तबगारीचे स्मरण करून देतात. दादासाहेब फाळके, प्र. के. अत्रे, हंसा वाडकर, गजानन जागीरदार, बाबूराव पेंढारकर इत्यादी या क्षेत्रातल्या मान्यवर व्यक्तींची आत्मचरित्रे अथवा 'प्रभातकाल' हा शांताराम आठवल्यांचा प्रभात कंपनीचा इतिहास सांगणारा आत्मवृत्त–ग्रंथ या क्षेत्रातील महाराष्ट्राच्या कर्तृत्वावर पुष्कळच प्रकाश टाकतात. आर्थिक साधने व प्रदर्शनक्षेत्र मर्यादित असले तरीही मराठी चित्रपटाचा कलात्मक दर्जा नेहमीच उच्च राहत आला आहे.

राहता राहिला विचार काव्यकलेचा. एखाद्या लोकसमूहाचे काव्य हा त्याच्या सांस्कृतिक संचिताचा व परंपरेचा एक समृद्ध सारभूत आविष्कार असतो. या दृष्टीने महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा व काव्यपरंपरा यांच्या परस्पर अन्वयाचा काही आलेख काढता येतो का ते पाहिले पाहिजे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचा पहिला वाङमयीन आविष्कार हाल सातवाहनाची गाथा सप्तशती. ती महाराष्ट्री प्राकृतात आहे. पण, महाराष्ट्री प्राकृताच्या अपभ्रंशापासून मराठी निघाली असल्याने मराठीची ती गर्भावस्था व बीजावस्था होय. इसवीसनाचे पहिले दुसरे शतक हा स्थूलमानाने या शप्तशतीचा काल. इतिहासकालातील महाराष्ट्राच्या ज्ञात संस्कृतीची पायाभरणी सातवाहनकालात झाली. तिथपासून यादवकालाच्या अन्तापावेतो ही सांस्कृतिक परंपरा चित्र, शिल्प, संगीत, साहित्य इत्यादि कलांच्या द्वारा स्वतःला उत्तरोत्तर विकसनशीलतेने अभिव्यक्त करीत राहिली. या काळातील अपभ्रंशातले वाङमय पुरेसे उपलब्ध नाही व मराठीच्या मुकुंदराज व महानुभाव यांच्या पूर्वीच्या अर्भकावस्थेतले साहित्यही अज्ञात आहे. पण, उत्तरकाल हा मराठी सांस्कृतिक परंपरांच्या पतनासन्नतेचा काल दिसतो. या पतनानंतर व्हावयाच्या उत्थानाचे भावी आधार आधीच उपलब्ध करून ठेवण्याच्या हेतूने ज्ञानेश्वरांनी काव्यनिर्मिती केली. यादवकालानंतर कोसळलेली ही सांस्कृतिक परंपरा इस्लामचा आघात पचवून आपल्या पायावर उभी राहिली ती शिवकालात. पर्शियन् संस्कृतीची अनेक अभिजात अंगे शिवाजींने अचूक हेरली आणि आत्मसात् केली. हा इतिहासपंडित शेजवलकरांचा निर्वाळा येथे सहज आठवावा. येथे स्थिरावलेल्या मुस्लिम आक्रमकांची पर्शियन् ही राजभाषा, अरबी ही धर्मभाषा व उर्दू व दखनी ही व्यवहाराची बोलभाषा. या तिहींच्या माध्यमाद्वारा एतद्देशियांना परिचित झालेल्या त्यांच्या काव्यपरंपरेतील संचिताचे काही संस्कार रामदासात ओळखू येतात. बहामनीकालातल्या इस्लामचा आक्रमक आघात पचवून आपल्या पायावर उभ्या राहिलेल्या जागृत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा काव्यक्षेत्रातील परिस्फोट म्हणजे मुक्तेश्वर, रामदास आणि तुकाराम. पेशवाईच्या अस्तकाळी ही सांस्कृतिक परंपरा पुनः झाकाळल्यागत, नवोन्मेषरहित व जीर्णोपजीवी झाली होती. इंग्रजी विद्या, कला, शास्त्रे व संस्कृती यांच्या आघातासरशी ती कोलमडली. यापूर्वी ज्या इस्लामी परंपरेचे आक्रमण आम्ही अनुभवले होते ती इस्लामी परंपरा संस्कृतीच्या कोणत्याही अंगात आमच्याहून अधिक प्रगत वा विकसित नव्हती. पण, अव्वल इंग्रजीच्या कालखंडात ज्या आंग्लपरंपरेचे पद्धतशीर आक्रमण झाले ती आंग्लपरंपरा संस्कृतीच्या भौतिक अंगापुरती तरी आमच्याहून अधिक प्रगत होती. सनातन भारतीय प्रकृती (महाराष्ट्रीय प्रकृती हा तिचाच एक घटकावयव) आणि पाश्चिमात्य नवसंस्कृती यांच्या आघात प्रत्याघातातून, क्रिया–प्रतिक्रियांमधून नवा समाजपुरुष निर्मिला जात होता. आंग्लपरंपरेतील सत्त्वांश पचवून मराठी काव्यपरंपरा पुनः आपल्या पायावर आपल्या पूर्ण अस्मितेनिशी उभी राहिलेली दिसते ती प्रथम केशवसुतांमध्ये. मध्ययुगीन कृषिसंस्कृतीतून नव्या यंत्रयुगात नव्याने जन्म घेत असलेल्या, आकारास येत असलेल्या नवमहाराष्ट्राच्या जन्मखुणा व प्रसववेणा मराठी कवितेच्या इतिहासात पहिल्या प्रथम अभिव्यक्त झाल्या त्या केशवसुतामध्ये ! एकोणिसाव्या शतकाच्या चवथ्या चरणात भारताचे जे सांस्कृतिक पुनरुत्थान झाले त्या पुनरुत्थानाचा मराठी कवितेच्या क्षेत्रातला पहिला प्रकट उद्‌गार म्हणजे केशवसुत !! सनातन भारतीय

प्रकृती आणि पाश्चिमात्य नवविचार यांच्या आघात-प्रत्याघातातून भारतीय जीवनाला नवा घाट, नवा आकार लाभण्याची प्रक्रिया अजूनही संपलेली नाही. त्या प्रक्रियेतून संपूर्ण भारतीय समाज–आणि अर्थात् महाराष्ट्रही अद्यापही जातच आहे. केशवसुतांची कविता आजही शिळी वाटत नाही ती यामुळेच. केशवसुता-नंतरच्या मराठी कवितेच्या विकासात सिंहाचा वाटा मर्ढेकरांचा. अणुयुगातल्या नव्या आव्हानांना मराठी कविता पहिल्याप्रथम भिडली ती मर्ढेकरांमध्येच. अनिल, विंदा करंदीकर, मुक्तिबोध, कुसुमाग्रज, बोरकर, बापट, पाडगावकर, रेगे, इंदिरा, चित्रे, कोचे, ग्रेस, नारायण सुर्वे, र. कृ. जोशी इत्यादि अनेक मातब्बर कवींच्या काव्यातून जाणिवांची नवी वळणे आणि अणुभवांच्या नव्या दिशा शोधीत मराठी काव्यपरंपरा आता शतमुखांनी विकसित होत आहे.

संस्कृती व कला ह्यांच्या निरामय विकासासाठी आवश्यक असलेली शांतता, स्थैर्य व समृद्धि यादवसत्ते-च्या पतनानंतर गेल्या सात शतकात विविध राजकीय उलाढाली नित्य व्यग्र असलेल्या महाराष्ट्रात सातत्याने तशी सहसा कधी नांदली नाहीत. परंतु परिस्थितीच्या या प्रतिकूलतेतही कलेच्या व संस्कृतीच्या क्षेत्रात आपल्या अस्मितेने संस्कारित केलेले जे काही स्वत्व व सत्त्व महाराष्ट्राने प्रकट केले व जतन केले, ते अभि-मानास्पद आहे. मात्र अर्थ व काम या दोन पुरुषार्थांवर जगणाऱ्या कलांनी धर्म व मोक्ष यांच्या मर्यादेत नांदले पाहिजे. एरव्ही पुरुषार्थशून्य समाजाच्या अंध कला-सक्तीचे पर्यवसान विलासीपणात होऊन ते समाज-नाशाला कारणीभूत होते. कलाविलास ही जीवनाच्या ताटातली चटणी व तोंडी लावणे आहे; मुख्यान्न नव्हे. महाराष्ट्राच्या कलाजीवनाच्या इतिहासातील यादव-सत्तेच्या आणि उत्तरपेशवाईच्या पतनाध्यायाने शिक-विलेला एवढा धडा 'मऱ्हाटा विवेका'ने आपण नीट समजून घेतला तरच महाराष्ट्र संस्कृतीच्या निरामय विकासाला पोषक होईल अशा प्रकारे आपल्या पूर्वजांनी आपल्यापर्यंत पोचविलेले हे कलाधन आपण साक्षेपाने संवर्धू शकू.

प. वा. श्रीमंत बाबूरावजी देशमुख

—शं. बा. शास्त्री

महाराज !

बाबूरावजींचे आप्तेष्ट, नोकर–चाकर, परिवारातील सर्व लोक त्यांना 'महाराज' म्हणून संबोधीत असत. आणि, केवळ राजे–महाराजांनाच लावण्यात येणारी ही उपाधी बाबूरावजींना खरोखरीच शोभून दिसत असे. कारण खऱ्या अर्थाने 'महाराजत्व' त्यांच्या ठायी होते. आज राजे-महाराजे नामशेष झाले आहेत. शिल्लक आहेत ते निव्वळ नावापुरते. त्यांच्या ठायी 'राजत्व' किंवा 'महाराजत्व' किती होते किंवा आहे हा विचार या ठिकाणी प्रस्तुत नाही. पण जन्माने किंवा अधिकारपदाने राजे नसणाऱ्या बाबूरावजींना ही उपाधि त्यांच्या परिवाराकडन मिळालेली होती ती स्वयंस्फूर्तीने,—महाराजांच्या अंगी असावयास हवे ते सद्‌गुण त्यांच्या ठायी भरपूर प्रमाणात असल्याचा प्रत्यय पदोपदी आला असल्यामुळे ! त्यांच्या सहवासाचा अल्पसाही लाभ घडलेले लोक त्यांच्या विषयी बोलताना "बादशहा माणूस" म्हणून उद्‌गार काढीत, ते खरेच असत. बाबूरावजी खरोखरीच 'महाराज' होते.

* * *

राजे–महाराजांच्या मानाने बाबूरावजींचा खजिना कमी असेल कदाचित्, पण, त्यांचे ऐश्वर्य मोजण्याचे हे माप नाहीच. त्यांची श्रीमंती मोजायची तर ती मनाच्या श्रीमंतीच्या मापाने मोजावी लागेल. आणि त्या दृष्टीने पाहिले तर ते अनेक महाराजांपेक्षा अधिक श्रीमंत होते असेच म्हणावे लागेल.

अडीअडचणीत सापडलेला म्हणा किंवा कोणत्याही स्वरूपाच्या सार्वजनिक कार्याची धुरा खांद्यावर बाळगणारा म्हणा, याचक म्हणून बाबूरावजींकडे आला आणि विन्मुख होऊन परत गेला, असे कधी घडलेच नाही. एवढेच नव्हे तर, यापेक्षाही अधिक महत्त्वाचे म्हणजे, याचकाची जी काही अपेक्षा असेल तीपेक्षा काकणभर अधिकच दान पदरात घेऊन तो परत जायचा, हा बाबूरावजींचा रिवाज होता आणि त्यावरही वरताण अशी की, आपण केलेले हे दान षट्‌कर्णी होता कामा नये, अशी बाबूरावजींची सक्त ताकीद असायची. उल्हासाच्या अथवा कृतज्ञतेच्या भरात तसा प्रकार जर कोणी केलाच तर त्याबद्दल बाबूरावजींना संताप येई आणि 'पुन्हा कधी प्रसंग आला तर माझ्याकडे येऊ नका' असा दम भरण्यापर्यंत पाळी येई. मागणाऱ्याने मागावे, आपण त्याची गरज लक्षात घेऊन त्याच्या अपेक्षेपेक्षा थोडे अधिकच त्याला द्यावे, द्यावे तेही मोठ्या आनंदाने, स्वतःकडे मोठेपणाचा अथवा श्रीमंती अरेरावीचा लवलेशही न घेता विनम्र वृत्तीने द्यावे, जणू काय घेणाऱ्यानेच देणाऱ्यावर उपकार केले आहेत अशी भावना मनाशी बाळगून द्यावे, हा बाबूरावजींचा स्वभाव होता.

* * *

पण त्यांचे हे औदार्य विवेकहीन असे, असे मात्र म्हणता यायचे नाही. त्या औदार्याला सीमा होती फक्त एकच;—ती म्हणजे पात्रापात्र–विवेक. वाटेल त्या लुंग्या–सुंग्याने उठावे आणि बाबूरावजींना खोट्या–नाट्या थापा मारून लुबाडावे, असे सहसा कधी झाले नाही,—बाबूरावजींच्या चोखंदळ बुद्धीने तसे कधी होऊ दिले नाही. त्याचबरोबर, दिलेले दान सत्कारणी लागावे असाही त्यांचा कटाक्ष असे. याचा दाखला म्हणून एक उदाहरण येथे देता येण्यासारखे आहे.

बरेच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे—

येथील लेडी अमृतबाई डागा कॉलेज फॉर विमेन या संस्थेने आपल्या कॉलेजच्या मदतीसाठी म्हणून एका

नाटकाचा प्रयोग घेण्याचे ठरविले, आणि तिकिटे खपविण्याची मोहीम काढली.

कॉलेजच्या त्यावेळच्या प्रिन्सिपालबाई होत्या ख्रिश्चन. त्यांना मराठीही येत नव्हते. कॉलेजच्या मदतीसाठी त्यांनी जो नाट्यप्रयोग घेतला होता, त्याचा प्रतिपाद्य विषय स्त्री-संबंधीच्या आपल्या परंपरागत विचारांना काहीसा धक्का देणारा होता. पण या गोष्टीची प्रिन्सिपालबाईंना काही कल्पना नसावी. नाटक मंडळीने तो प्रयोग त्यांना 'धर्मार्थ' म्हणून द्यायचे कबूल केले होते, आणि त्या तिकिटे खपवीत होत्या.

ओळख म्हणून म्हणा, वशिला म्हणून म्हणा किंवा वेळप्रसंगी आपल्या मराठीच्या अज्ञानाने घोटाळा होऊ नये म्हणून म्हणा, प्रिन्सिपालबाईंनी सौ. ताराबाई शास्त्रींना आपल्या बरोबर घेतले आणि त्या दोघी बाबुरावजींच्याकडे गेल्या.

नेहमीच्या पद्धतीने आगत-स्वागत झाले आणि प्रिन्सिपालबाईंनी आपल्या येण्याचा हेतू सांगून, 'किती तिकिटे ठेवू ?' म्हणून प्रश्न विचारला. बाबुरावजींनी प्रश्न विचारला, 'कोणतं नाटक आहे ?'

नाटकाचे नाव ऐकून बाबूरावजी काहीसे घुटमळल्यासारखे दिसले,—पण क्षणभरच ! दुसऱ्याच क्षणी ते ताराबाईकडे वळून हसत हसत म्हणाले, 'ताराबाई, शास्त्री मंडळींचा आणि माझा संबंध तुम्हाला ठाऊक आहे.'

'होय.'

'तुमचं लग्न नोंदणीपद्धतीनं झालं, आणि त्यावेळी आवश्यक असणाऱ्या तीन साक्षीदारांपैकी मी एक साक्षीदार होतो—आठवतं ना ?'

'हो, अगदी चांगलं आठवतं,—ते मी कशी विसरेन ?'

'हे सारं लक्षात घेऊन माझी एक विनंती आहे ती तुम्ही मान्य केली पाहिजे.'

'विनंती कसली ?— सांगा ना, काय आपलं म्हणणं आहे ?'

'सांगणं एवढंच, की तुम्ही आलात, तुमच्या कॉलेजला मदत पाहिजे अशी तुमची मागणी आहे,—कबूल आहे मला.'

'मग, किती तिकिटं ठेवू आपल्यासाठी ?' प्रिन्सिपालबाई आनंदाने म्हणाल्या.

पहिल्या दराच्या दहा रुपये किंमतीच्या पाच खुर्च्या फार फार तर येथे खपतील, अशी त्यांची अपेक्षा होती.

बाबूरावजी म्हणाले, 'ठेवा सात तिकिटे.'

पन्नासाच्या ऐवजी सत्तर रुपयांचे गिऱ्हाईक मिळाले म्हणून प्रिन्सिपालबाई अधिकच खूष झाल्या.

बाबूराव त्यांच्या तिकिटे फाडण्याकडे लक्ष न देता ताराबाईंना म्हणाले, '— पण ताराबाई, एक विनंती आहे.'

'काय सांगायचं आहे आपल्याला ?'

'—हे पहा, तुम्ही आलात म्हणून मी तिकिटं घेतली. पण हे नाटक काही मी पाहायला येणार नाही. तुमच्या कॉलेजसारख्या मुलींच्या कॉलेजने हे नको होतं घ्यायला. पण ते जाऊ द्या.—मी नाटकाला येणार नाही, पण माझ्या सात खुर्च्या मात्र सबंध नाटकभर रिकाम्या राहिल्या पाहिजेत.'

'ठीक आहे, जशी आपली आज्ञा.'

'आज्ञा नाही,—विनंती.' बाबूराव हसून उद्गारले, लगेच त्यांनी कारकुनाला हाक मारली. कारकुनाने एक बंद पाकिट ताराबाईच्या हातात आणून दिले, पाकिटावर प्रिन्सिपालबाईचा पत्ता नव्हता. त्यावर लिहिले होते, 'प्रो. सौ. ताराबाई शास्त्री.'

अपेक्षेपेक्षा वीस रुपये अधिक मिळाल्याच्या आनंदात दोघीजणी घरी आल्या. पाकिट उघडून पाहिले तो त्यात अडीचशे रुपयांच्या नोटा होत्या !

* * *

बाबूरावजींची संगीतकलेबद्दलची आसक्ती पराकोटीची होती. गेल्या पिढीतला भारतातला एकही नामवंत संगीत-कला-निपुण गवैय्या-बजवैय्या असा नसेल, की ज्याची हाजरी कधी ना कधी बाबूरावजींच्या दिवाणखान्यात लागली नाही. त्यांनी आपल्या आयुष्यात मनसोक्त गायन-वादन ऐकले आणि आपल्या बरोबर नागपूरकर संगीत-रसिकांना ऐकविले. या संगीताच्या महफिली बाबूरावांच्या महाल विभागातील वाड्यात किती रंगल्या, कशा रंगल्या हे नागपूरकरांना चांगले ठाऊक आहे. एका-एका महफिलीपायी बाब-

सोडले ते त्यांनी लिहून ठेवले आहे. प्रसंग आला, आणि नागपूरस्थ हौसी मंडळींनी तसा योग जर घडवून आणला, तर आपण 'भाऊबंदकी' नाटकात रामशास्त्र्यांची भूमिका करू असे बाबूरावजी आपल्याजवळ बोलल्याचे त्यांच्या परिवारातील काही लोक सांगतात.

*　　*　　*

नाटकाप्रमाणेच त्यांना दुसरी एक जबरदस्त आवड होती ती साहित्याबद्दल. मराठी साहित्याचे त्यांचे वाचन दांडगे होते. पण ते नुसते कथा–कादंबऱ्या वाचून मनाची करमणूक करून घेण्यापर्यंतच सीमित नव्हते–त्यांतही बाबुरावजींची चोखंदळ आणि मार्मिक दृष्टी असे. वाटेल त्या साहित्याला किंवा साहित्यिकाला त्यांनी कधी जवळ केले नाही. त्यांच्या काही निष्ठा होत्या, धारणा होत्या, मूल्ये होती. त्यांच्या श्रद्धा एका विशिष्ट परंपरेतल्या होत्या, त्या परंपरेचे श्रेष्ठत्व बदललेल्या काळात पुष्कळांना कदाचित् पटणार नाही; पण बाबुरावजींना ते सोडवत नव्हते. म्हणूनच त्यांनी डॉ. राधाकृष्णन् सारख्यांनाही स्पष्टपणे सांगून टाकले होते,—"डॉक्टर साहेब, आपण म्हणता ते बरोबर आहे. आज काळ फार बदला आहे, खरं आहे. आजच्या काळात माझ्या सारख्याचं हे असं वागणं—राहणं विसंगतच आहे. पण काय करू? मी ज्या परंपरेत वाढलो आहे ती परंपरा मला असंच वागायला सांगते. माझा इलाज नाही."

आज बाबूरावजी आमच्यात नाहीत. ते आम्हाला सोडून गेले, अगदी कायमचे सोडून गेले आहेत. ते गेल्याचे आम्हाला दुःख आहे, फार दुःख आहे. जगात आहे ते सारे नश्वरच आहे, आलेला माणूस कधी ना कधी जाणारच हे जरी खरे असले तरी त्यामुळे गेलेल्या माणसाबद्दलचे दुःख काही कमी होत नाही.

पण बाबुरावजींच्या निधनामुळे औदार्याची, मित्रत्वाची, गुणवत्तेची, गुणवेत्तेपणाची, कला–रसिकतेची, आतिथ्यशीलतेची, सौजन्याची, शालीनतेची, अभिरुचीची, अभिजात श्रीमंतीची जी एक अविस्पृहणीय सुसंस्कृत परंपरा, ती खंडित झाली ह्याचे शल्य मनाला अधिकच विषण्ण करते.

अनुक्रमणिका

श्रीएकनाथ रचित

गणेशपुराण

अध्याय तिसरा

मधुकैटभ वध

संपादक——डॉ. अ. ना. देशपांडे

नवही अवतार गजानन

श्रीगणेशायनमः ।। श्रीसरस्वत्यैनमः ।। श्रीगुरुभ्योनमः ।।

येथून अवतारकथा । घालीजे रज अमृता ।
श्रवणें श्रवण सार्थकता । अर्थे सार्थक जन्माचें ।।१।।

अवतार धरिला काय कारण । कोणें भक्तें मोहिला गजानन ।
कोणा सोडविलें विघ्नांपासून । तें समूळ कथन ऐकिजे ।।२।।

जें रुद्रयामल अवतरला । तेंपासून गजानन प्रगटला ।
कैलासीं श्रीशिवें भवानीला । रहस्य निवेदिलें ।।३।।

अवतार म्हणतां यासी । उपमान साहे हेरंबासी ।
नवलरूपी भक्ति रहस्यासी । चरित्रालागी खेळतां ।।४।।

नवविधा नव अवतार । धरिता झाला मोरेश्वर
याची लीला पाहे विचित्र । इच्छाखेळ खेळतसे ।।५।।

इच्छाभक्तिनवांकुर । भक्ति धरितसे साचार ।
ऐका उत्तमोत्तम चरित्र । गणेश महिमा आख्यान ।।६।।

आतां येथून रसाळकथा । भवार्णवाची चिंता ।
हृदयीं धरूनि एकदंता । कथा मननें ऐकिजे ।।७।।

हे कथा रहस्यलहरी । गणेशसमुद्राची तरि ।
तरंग त्याचे परोपरी । नवविधा भक्तिरस ।।८।।

ज्यासि जैसी आवडी । कोणें भक्तें सेविली गोडी ।
भक्तिपुढें कर्मे बापुडीं । अति रहस्य भक्तीचें ।।९।।

भक्तिरहस्यासी पाहे । नवविधा होय जें साहे ।
टाकि मोहो ममता माय । वटवट विषयाची ।।१०।।

नवही अवतार गजानन । कोण भक्तीसी झाली कोण रचना ।
ऐका गणेशोपाख्याना । शुद्धभक्तिप्रेमेसी ।।११।।

नवरूपी देव पाहे । हे बोल वाउगे नोहे ।
अनंतकोटि निर्मिताहे । तो कैसा नवविध म्हणावा ।।१२।।

लीलावेषाचें कौतुक । येणें निर्मिले पां नवविधादिक ।
तेंचि निरूपण ऐक । प्रेमप्रीति करूनिया ।।१३।।

अर्चनें पावला कोणासी । निवारिलें कोणाच्या संकटासी ।
कोणा पावला दास्यत्वासी । ते गुणकीर्ति ऐकिजे ।।१४।।

अर्चनें झाला अवतार । तो ऐका महिमा अपार ।
तो पहा श्रीलंबोदर । कोणा विधी पावला ।।१५।।

मधुकैटभें मांडला हलकल्लोळ

मधुकैटभ दैत्य परियेसी । घेते झाले अमरावतीसी ।
तेहतीस कोटि देव इंद्रेसी । मग वैकुंठाप्रती ते आले ।।१६।।

आठ्यांयशी सहस्र ऋषी । दैत्यें बुडविलें योगधर्मासी ।
ऋषी टाकूनि आश्रमासी । तेही वैकुंठासी पैं आले ।।१७।।

मधुकैटभें मांडिला हलकल्लोळ । ब्रह्मा टाकून ब्रह्ममंडळ ।
सावित्री घेऊन तात्काळ । वैकुंठाप्रती तो आला ।।१८।।

अष्ट दिशेचा दिक्पाळ । ते स्थानभ्रष्ट झाले सकळ ।
सूर्य टाकून भूमंडळ । वैकुंठासी पैं आला ।।१९।।

शेष सोडूं पाहे क्षिती । दैत्य झाला पृथ्वीपती ।
पाहा पुण्याची रीती । उरली नाही कोठेही ॥२०॥

देवाचें करी जो स्मरण । त्याची जिव्हा करी छेदन ।
घाली बंदिशाळेलागून । तो दुराचारी दुरात्मा ॥२१॥

शिवालय विष्णू आलयातें । मोडोनि टाकी समस्तें ।
अखंड अंतःकरण पापमरितें । मधुकैटभ दैत्याचें ॥२२॥

समस्त देवते वैकुंठाला शरण गेली

ऐसा पापात्मा मातला । सकळातें त्रास दिधला ।
सांगो आली वैकुंठभूपाळा । समस्तहि दैवतें ॥२३॥

निद्रिस्थ असतां श्रीहरी । स्तवूनि उठविला मुरारी ।
स्तुति ऐकिली म्लान वैखरी । मग बोले देव तो ॥२४॥

" काय झाला आकांत । पदें सोडूनि समस्त ।
ऐसा कोण झाला निर्मित । जेणें तुमचें
म्लानवदन " ॥२५॥

" देवदेवा वैकुंठपति । दैत्यें त्रास दिधला आम्हांप्रति ।
गांजिली बहुत क्षिती । आला निवेदाया तुज ॥२६॥

झालें संकट प्राणासी । म्हणोनि आलों वैकुंठासी ।
न रक्षिसी जरी आम्हासी । अपकीर्ति तुजलागी ॥२७॥

पदें घेतलीं दैत्यें जाण । मातले मधुकैटभ दुर्जन ।
लक्ष ठेविलें वैकुंठालागुन । विलंब न करी सर्वथा ॥२८॥

यालागी देवशिरोमणी । शरण आलों तुजलागुनी ।
संकट निवारी जननी । विघ्न हरे माउलिये ॥२९॥

आमुचा तूं कैवारी । आतां उठावें झडकरी ।
दुष्ट दुर्जनातें संहारी । देवराया स्वामिया ॥३०॥

दैत्यांच्या त्रासेंकरून । पोळले असती पंचप्राण ।
स्वाहास्वधाकार बुडाले जाण । आतां कायसी
उरी ते " ॥३१॥

चक्रपाणी देवांच्या साह्यार्थ धावून गेले

ऐकूनि देवांचें भाषण । गरुडावरी करी आरोहण ।
समस्त देवांतें घेऊन । आला अमरावतीसी ॥३२॥

शंख त्राहाटिला पांचजनी । दैत्य हाकारिला रणांगणीं ।
उभा राहतां चक्रपाणी । सिंहनादें देव गर्जती ॥३३॥

हाक देवाची ऐकोनी । मधु निघाला तत्क्षणीं ।
आवघ्या सैन्यश्रेणी घेऊनी । रणांगणीं येतसे ॥३४॥

देखोनि आवेशला हरि । बाण टाकी दैत्यावरी ।
दैत्यें मोडोनि ते अवसरी । सन्मुख वैरी लोटला ॥३५॥

देखोनि रणांगण सांडी अमरपति । देवीं घेतला
धाक चित्तीं ।
पळूं लागले सुरसुरपती । सन्मुख कोणी न राहे ॥३६॥

विष्णू अवलोकी सैन्यासी । पळतां देखे देवांसी ।
दैत्य आला नसतां रणासि । ते किमर्थ पळती हे ॥३७॥

हाकारिले देव समस्त । युद्ध मांडिलें कृतांत ।
सारंगवाणीं अनंत । रणांगणीं शोभतसे ॥३८॥

देवदैत्या झोट धरणी

देवदैत्या झोट धरणी । बाण सुटती झणाणी ।
अधिक उठावा देखोनि । दैत्यावरी लोटले ॥३९॥

" राहे राहे म्हणत । तो नव्हे मी अमरनाथ ।
मजपुढें काळ कृतांत । राहो न सके सर्वथा ॥४०॥

मी कोपलियावरी । घोट मरीन सप्तसागरीं ।
मजपुढें मिरविसी थोरी । दैत्याधमा तूं कायसा ॥४१॥

आतां टाकी युद्धगोष्टी । जा सोडिला या संकटीं ।
पळे येथूनि उठाउठी । जीवदान तुज दिधलें ॥४२॥

सर्पासी येक पिपीलिका । घेऊं म्हणे प्राण देखा ।
तैसा तुवां आशंका । मजसि युद्धाचा मांडिला ॥४३॥

व्याघ्रापुढें जैसी गाय । भिडो आली जेवि पाहे ।
तैसा मजसी तूं लवलाहे । युद्धालागी आलासी ॥४४॥

आतां सांडी युद्धवार्ता । झालों तुज प्राणदाता । "
ऐसें नारायणा बोलतां । परम कोपें कोपला ॥४५॥

रथवेळि दैत्यनाथ । शतक्षोणी सैन्यासहित ।
थोर तवकें धावत । महाआवेशें करोनिया ॥४६॥

हातीं घेतलें धनुष्यबाण । हाकिले देव अवघेजण ।
सिंहनादें गर्जोन । तेणें धरा कापतसे ॥४७॥

देव सन्मुख कोणी न राहती । पळोनि गेला अमरपती ।
ऐसें देखोनि कोपे श्रीपती । युद्धालागी प्रवर्तला । ४८॥

बारा हजार वर्षे युद्ध पण देवांना जय नाही म्हणून शंकराला शरण

बारा सहस्रवरुषांसी । युद्ध करिता दैत्यांसी ।
जय नमे हृषीकेशी । मग तेथून परतला ॥४९॥

आला कैलासाप्रती । तव ध्यानस्थ ईश्वरमूर्ती ।
मग नानापरी वेदश्रुती । स्तवन करिता जाहला ॥५०॥

" ध्यानस्थकाय त्रिलोचन । मातला दुर्जन पंचानान ।
प्रळय पावली क्षिती जाण । म्हणोनि शरण तुज आलो ॥५१॥

आगा ये पार्वती वल्लभा । पूर्ण ब्रम्ह तूं स्वयंभा ।
निराधाराच्या स्तंभा । परमाधारा विश्वाच्या ॥५२॥

विश्वव्यापक ऐसी श्रुती । अखिल ब्रम्हविध मूर्ती ।
प्रळयकाळाची झाली प्राप्ती । मजपासूनी परिसीजे " ॥५३॥

शंकर स्तुतीने जागे झाले

ऐसा स्तवितां श्रीशंकर । नेत्र उघडोनि पाहे विश्वंभर ।
पुढें कर जोडोन सारंगधर । उभा स्तवन करीतसे ॥५४॥

" काय संकट वैकुंठपति । म्हणोनि आलां कैलासाप्रति ।
कोण दुःखाची झाली प्राप्ति । ते मजप्रती सांगिजे " ॥५५॥

तंव बोले नारायण । " मधुकैटभ मातले दुर्जन ।
तेणें त्रास दिधला म्हणऊन । आले देव वैकुंठवासी ॥५६॥

त्यांच्या करावया साहयासी । गेलों दैत्य सन्मुख युद्धासी ।
बारा सहस्र वरुषें युद्ध तयासी । केलें परी जय न ये ॥५७॥

अपजयाची उभारली वेळा । पळ सुटला वैकुंठपाळा ।
शरण आलों तव पदकमळा । रक्षी म्हणोनि स्वामियां " ॥५८॥

शंकर म्हणतात–एकदंताला न स्मरल्यामुळे अपजय

मग हास्य करी त्रिपुरारि । " म्हणे काय दैत्यबळाची थोरी ।
रणांगण सांडूनि हरि । आलासि तूं मजपाशी ॥५९॥

सकळ विद्या तुजपासूनि । काय सांगणे तुज लागुनि ।
परी मज ऐसें भासतसे मनीं । देव चिंतामणी नाही स्मरला ॥६०॥

व्हावया कार्याची साह्यता । नाहीं स्मरिलें एकदंता ।
अपजयाची व्यथा । प्राप्त झाली तुम्हांप्रती ॥६१॥

सकळ कळोनि तुज ज्ञान । कोणे भ्रांति वरपडे झालें मन ।
म्हणोन गणेशाचे स्मरण । केलें नाही स्वामीय ॥६२॥

यालागी ऐसी अवस्था । प्राप्त झाली तुज अनंता ।
प्रसन्न केल्याविण एकदंता । जयवंत तूं न होसी ॥६३॥

टाकूनि पाहे शस्त्रांसी । गेला व्याघ्राचे पारधीसी ।
जय म्हणतां तयासी । कैसा जयवंत होईल ॥६४॥

तैसा टाकूनि गणेशमंत्रासि । जय इच्छिसी ऋषीकेशी
कैसेनि यशातें हरिसी । सांगे मज पुरुषोत्तमा " ॥६५॥

हरी विचारतो : गणेशाला कसे प्रसन्न करू ?

ऐसें ऐकतां वचन । श्रीहरी धरी दोन्ही चरण ।
" जेणें गणेश होय प्रसन्न । विधी मजप्रती सांगावा, ॥६६॥

मग एकाक्षर मंत्रासी । उपदेशिता झाला विष्णूसि
सिद्धि विनायकाचे मूर्तीसी । करून पूजन करविलें ॥६७॥

" येणें अर्चनें जाण । गणेश होईल प्रसन्न ।
दुष्ट दैत्यांचा नाश जाण । तेणें होईल क्षणमात्रें " ॥६८॥

ऐंसी उपासना घेऊनी । गंगातीरा जाय सारंगपाणी ।
मृत्तिकेचा गणेश करूनी । बैसे अनुष्ठानीं प्रेमप्रीती ॥६९॥

हृदयीं धरूनी चिंतामणी । नाना विधी अर्चुनी ।
एकाक्षरध्यान करूनी । एकासनां बैसला ॥७०॥

सिद्धिविनायक प्रसन्न झाले

ऐसा एका संवत्सराशी । सत्य मासा एकविसा दिवशीं ।
सिद्धि विनायक प्रसन्नतेसी । मूर्तिमंत प्रगटला ॥७१॥

अर्चनें पावला श्रीहरी । सिद्धिविनायक विघ्नारि ।
प्रसन्न झाला झडकरी । विष्णूलागी ते समयी ॥७२॥

मावें धरी दोन्ही चरण । माझें झालें सर्व कारण ।
झाला मनोरथ पूर्ण । तुझे दर्शनेंकरूनी ॥७३॥

सहस्रबाहू मिरवित । आयुधें करीं विराजत ।
दांत करकरा खात । म्हणे तुज गांजिलें कोणें ॥७४॥

माझ्या भक्ताकडे देख । काळ पसरू न शके मुख ।
तूं माझे अंकुरसुख । तुज कोणें गांजिलें ॥७५॥

माझीया पाडसासी । कोण वक्र पाहावयासी ।
त्याच्या करीन घातासी । यमलोकासी पाठवीन ॥७६॥

मी पाठीस असतां गजानन । तुम्हां बाधू शके केवि विघ्न ।
हें अघटित वचन । केवि घडो शकेल ॥७७॥

खदिराच्या अंगारासी । झोंबे पिपीलिका त्यासी ।
तैसें माझिया भक्तांसी । आणिक कोण पाहूं सके ॥७८॥

मी कोपलिया विघ्नहर । सृष्टीचा करीन संहार ।
मजपुढे दुर्जन पामर । केवि राहो शकेल ॥७९॥

तुज कोणें केलें वैरत्वासी । त्याचा घोट भरीन या
समयासी ।
कोणें त्रासविलें सांग मजपाशीं । त्यांचें निर्दाळण करीन
मी " ॥८०॥

विष्णू आपले दुःख सांगतात

देखोन अभयाच्या वचना । विष्णू नमस्कारी चरणां ।
" मधुकैटभीं गांजिलें जाणा । त्या संकटा
निवारिजें ॥८१॥

देव सांडूनिया स्थानें । पदभ्रष्ट मजसहवर्तमान ।
त्या दुःखाचेनि बाणें । पोळले प्राण लंबोदरा ॥८२॥

मधुकैटभे त्रास दिधला । म्हणोनि हेरंबा दयाळा ।
शरज तुझ्या चरणकमळा । अनन्यभावें करूनी " ॥८३॥

कोपें खवळिला दारुण । लोटला दैत्यावरी आपण ।
जैसें प्रळयकाळीचें विघ्न । ग्रास सकळांचा
करावया ॥८४॥

क्रोधें उलका टाकित । तेणें नक्षत्रें धरा कापत ।
आजि थोर मांडला आकांत । कवणा ग्रास करील
नेणों ॥८५॥

ऐशा आवेशें विनायक । रणीं गर्जे गणनायक ।
होता झाला मारक । मधुकैटभ दैत्यांसी ॥८६॥

विनायक दैत्यांशी युद्धाला प्रवृत्त झाले

दैत्य आले रणांगणा । शतकोटि सैन्यें करिती गर्जना ।
क्रोध न साहे गजानना । युद्ध आपण करीतसे ॥८७॥

कित्येक मारी वक्षस्थळीं । कित्तेक रगडी चरणातळीं ।
कोपला विनायक ते काळीं । रणमंडळीं खेळतसे ॥८८॥

मांडुनिया वज्रठाण । घेऊनि गुप्त धनुर्बाण ।
त्रास दिधला दैत्यांलागून । रणांगण टाकूनि पळती ॥८९॥

हें देखोनि मधुकैटम देवांसी । काय बोलते झाले
वचनासी ।
" साह्य करावया हृषीकेशी । आलासि रणांगणा ॥९०॥

जेणें साह्य आणिलें तुज । काळें मुख त्यासी नये लाज ।
आतां करूं म्हणसी काज । व्यर्थ श्रमें मुललासी ॥९१॥

आतां आम्हांसी युद्ध करितां । लाज न वाटे
तुझ्या चित्ता ।
आतां तूं जाय परता । सोडिलें तुज प्राणेंसी " ॥९२॥

या शब्दशस्त्रांच्या बाणें । घृत घालिता हुताशन ।
तैसा कोपला गजानन । प्रलयकाळीचा अग्नी
जैसा ॥९३॥

युद्ध मांडिले अति दारुण

युद्ध मांडिलें अति दारुण । एक्या बाणें व्यापिलें
त्रिभुवन ।
झोटधरणी महारण । मांडियेलें ते काळीं ॥९४॥

जितकी होती मंत्रशक्ती । तितुके बाण दैत्य टाकिती ।
गणेश करी त्यांची शांती । फरशखंडे करूनिया ॥९५॥

नावरती एकमेकां । दारुण युद्ध भयानका ।
महाघोर प्राणांतिका । समय आला सकळांसि ॥९६॥

बाण सणसणा सुटत । तीक्ष्ण भाळीं झळकत ।
त्यांपासून अग्नी निघत । तेणें तो पोळतसे ॥९७॥

दैत्यांचा उत्कर्ष देखोन । कोपोनियां गजानन ।
त्रिशूळ टाकी दैत्यालागुन । महाघोर संहारक ॥९८॥

त्रिशूळ येतां देखोनि जाण । दैत्य करी निवारण ।
काढून अर्धशक्ति बाण । त्रिशूळखंडन पें केलें ॥९९॥

अग्नीशस्त्र आलें तीक्ष्ण । हें विनायकें देखोन ।
फरशें टाकिलें छेदून । केली शांती शस्त्राची ॥१००॥

दैत्याने ब्रह्मशक्ती सोडली

मग दैत्यें ब्रह्मशक्ति । अतितेजें लखलखती ।
सोडोनिया देवांप्रति । अभिमंत्रून टाकिली ॥१०१॥

शस्त्र केवळ अग्निकल्लोळ । येतसे महातेजाळ ।
देव पळाले देखोन सकळ । याची शांती नाही म्हणोनि ॥१०२॥

शस्त्राचा देखोन यावा । कोप आला अत्यंत देवा ।
नानापरी करी उपाया । परि शांती नव्हेचि ॥१०३॥

मग थोर आवेशा चढोनी । काढिली मूळशक्ति तत्क्षणीं ।
जे सकळाची पाळण विश्वजननी । ते भवानी निर्मिली ॥१०४॥

एक ओष्ठ सप्त पाताळाखालता । एक एकवीस स्वर्गावर्ता ।
कोप आला एकदंता । ब्रह्मशक्ति ग्रासिली ॥१०५॥

एकदंताने ब्रह्मशक्ती ग्रासली व फरशाने दैत्यशीर छेदिले

मग काय करी विघ्नारी । फरश टाकी दैत्यांवरी ।
निवारण नव्हे कोणे परी । केली मोहरी त्याची ॥१०६॥

फरश जाऊन तात्काळ । छेदी दैत्यांचे शिरकमळ ।
उरल्या सैन्या सुटला पळ । सुमंगळ विजयी जाला ॥१०७॥

शतसैन्याचा घोट भरिला । मधुकैटभांचा वध केला ।
इंद्र अमरावती स्थापिला । विष्णू गेले वैकुंठी ॥१०८॥

दैत्यांची केली शांती । देव जयजयकारें गर्जती ।
पुष्पांजुळी मंगळमूर्ती । पूजिताती सकळ देव ॥१०९॥

हर्ष झाला थोर पाहे । देव वंदिताती पाय ।
सिद्धि विनायका तूं माय । आम्हां दीनां सकळांसी ॥११०॥

देव पदीं समस्त बसवी । यागयोगादिक स्थापिले मही ।
समस्त ऋषी पाठविले गृहीं । आपुलाल्या आश्रमा ॥१११॥

दुष्ट दानवाचें मार्जन । केलें संपूर्ण कंदन ।
अगाध महिमा न कळे जाण । अगोदर देवांते ॥११२॥

ते रूप अर्चनीं अवतार । विष्णुभक्ति लंबोदर ।
सिद्धि विनायक मनोहर । नाम तेव्हां शोभतसे ॥११३॥

अगाध याची चरित्रलीला । ऐका भाविकजन भोळा ।
नित्य जपावें वेळोवेळां । मुक्तिसोहळा भोगाया ॥११४॥

मधुकैटभवधसमाप्ती । दास्यत्वें पावला मंगळमूर्ती ।
श्रवणीं घाला गणेशकीर्ती । पुण्यपावनी कथा ही ॥११५॥

इतिश्रीगणेशपुराणे । शतसहस्त्र संहितायां ।
विष्णुशंकरोपाख्यानोनाम । तृतीयोध्याय गोड हा ॥११६॥

॥ श्रीहेरंबार्पणमस्तु ॥ श्रीरस्तु ॥ शुभंभवतु ॥

शबरीचे बोरे

दोन दृष्टिकोण : २ :

मानवी जीवनात शिक्षणाचे उद्दिष्ट काय, या संबंधीचा पाश्चात्यांचा दृष्टिकोण कसा आहे ते आपण पाहिले. या पृथ्वीवर जे जे काही आहे ते सारे आपण जाणून घेणार, त्या सर्वांवर आपण आपले प्रभुत्व प्रस्थापित करणार, त्या सर्वांचा स्वत:करिता संग्रह करून ठेवणार,–ही प्रतिज्ञा सार्थ करण्याचे साधन म्हणजे शिक्षण, असे त्यांना वाटते.

उलटपक्षी आम्ही म्हणत आलो आहोत,—
गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ।

मृत्यूने आमची शेंडी आपल्या हातात घट्ट धरून ठेवलेली आहे अशा भावनेने धर्माचे आचरण करा. यूरोपच्या संन्यासीवर्गाने असा उपदेश दिला नाही असे नाही. संसारी माणसाला भीती दाखविण्यासाठी त्यांनी साहित्यात, चित्रकलेत, नाना जागी आणि नाना प्रकारांनी मृत्यूच्या बिभीषिकेचे चित्रण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु आमच्या प्राचीन संहितेमध्ये जो भाव दिसून येतो त्याचे वैशिष्टच काहीसे निराळे आहे.

संसाराशी आपला अनवरत संबंध आहे अशा बुद्धीने केले गेलेले काम चांगले की वाईट हा नंतरचा विचार झाला. संसाराशी आपला अनवरत संबंध आहे ही गोष्टच मुळात खोटी आहे. संसाराशी येणाऱ्या आपल्या प्रत्येक संबंधाला शेवट आहे हे एक फार मोठे सत्य आहे. आपल्या मरजेसाठी आपण सत्यालाही 'मिथ्या' म्हणून आपले काम भागवून घेतले तरी, सत्य आपले काम करायचे तसे करीनच असते. सोन्याचा राजदंड हाच सर्वश्रेष्ठ मानणाऱ्या राजाच्या हातातूनही शेवटी तो राजदंड मातीत गळून पडतोच. जगात प्रतिष्ठा प्राप्त करून घेणे हेच आपले एकमेव जीवनकर्तव्य मानणाऱ्या मनुष्यावरही, जीवनाचे सारे प्रयास थंड पडल्यावर, या जगाला सोडून जाण्याची पाळी येतेच. मोठमोठ्या कीर्तिमंतांची कीर्ती लोपून जाते, आणि मोठमोठ्या जातींना आणि समाजांनाही शेवटी उन्नतीच्या रंगभूमीवरचे दिवे मालवून आपली नाट्य–लीला पुरी करावी लागते. या साऱ्या पुरातन गोष्टी आहेत, पण त्या काही मिथ्या नाहीत.

पण, सारेच संबंध शेवटी संपतात, म्हणून, संपण्यापूर्वी ते नव्हतेच असे मानून काही चालणार नाही. अवसानानंतर जे असत्य ते अवसानापूर्वी तर सत्य असतेच ना ? जे ज्या परिमाणात सत्य असेल ते त्या परिमाणात आपण मानले पाहिजे. न मानल्यास सत्य धरून ते आपल्याला मानायला लावील, किंवा पुढे कधी तरी दुसऱ्या मार्गाने आपले ऋण सव्याज वसूल करून घेईल.

विद्यार्थी विद्यालयात जन्मभर काही शिकत नसतो. शिकणेही कधी ना कधी संपतेच. परंतु विद्यालयात असेपर्यंत शिक्षणाचा यथार्थपणे स्वीकार केला, तरच शिक्षणाची समाप्ती नैसर्गिकपणे खरी ठरू शकते, आणि मगच विद्यालयातून विद्यार्थी पूर्णावस्थेत बाहेर पडू शकला असे म्हणता येईल. विद्यालयातून मधेच त्याने सुट्टी घेतली तर असंपूर्ण विद्येची फळे त्याला जन्मभर भोगावी लागतील. रस्ता म्हणजे पोचण्याचे ठिकाण नव्हे हे म्हणणे बरोबर आहे. मार्गाची समाप्ती हेच आपले उद्दिष्ट असते. पण, मार्गावरून जसे चालत जावयास हवे तसे गेलो नाही तर मार्गाची समाप्ती होणेच असंभव होऊन बसेल.

तेव्हा जगाशी असलेले सारे संबंध काही तोडून टाकणे आपल्याला शक्य नाही, हे आपण पाहिले. जगाच्या या संबंधातून जाता जाता शेवटी आपल्याला या संबंधांच्या पलीकडे जायला पाहिजे, आणि सारे संबंध ज्या ठिकाणी एकत्र येऊन मिळतात त्या ठिकाणी

पोचायला पाहिजे. म्हणून, जगाच्या संबंधातून पार होत जाणे, हीच आपली साधना. कोणत्याही संबंधाचे अस्तित्व नाकारून, त्याच्याकडे पाठ फिरवून चालू लागणे, ही काही साधना म्हणता येणार नाही. वैराग्याची कास धरून जर तुम्ही मार्ग सोडला तर अमार्गावरून तुम्हाला सातपट अधिक चकरा मारीत कासावीस व्हावे लागेल.

मानवी प्रवृत्तींची उपासमार करून, संसाराच्या लीलाभूमीपासून दूर एका उंच एकान्त ठिकाणी बसून ज्ञानसंग्रह करायला निघालेल्या माणसावर खाली आदळून अक्कल शिकून घेण्याचा कसा प्रसंग आला होता ते जर्मन कवी गटे ह्याने आपल्या 'फाऊस्ट' नामक नाटकांत दाखविले आहे. अकाली मुक्ती प्राप्त करून घेण्याकरिता अ-यथार्थ लोभ बाळगून डोळ्यात धूळ झोकण्याचा मनुष्य प्रयत्न करीत असतो. त्याची भरपाई तर त्याला करावी लागतेच, शिवाय फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्याला दंडही भोगावा लागतो. अधिक घाई केल्याने खोळंबाच अधिक होतो.

वस्तुत: घेणे आणि नाकारणे, बंधन आणि वैराग्य, दोन्ही एकसारखी सत्य आहेत. एकातच दुसऱ्याचे निवासस्थान असते. दोन्हीपैकी एकही गोष्ट दुसरीवाचून सत्य होऊ शकत नाही. दोघांनाही यथार्थपणे एकरूप करून घेण्यानेच पूर्णत्वाची प्राप्ती करून घेता येत असते. शंकर त्यागाची आणि अन्नपूर्णा भोगाची मूर्ती आहे. ती दोघे एकमेकात मिसळून एकाकार झाली म्हणजे संपूर्णत्वाचा आनंद निर्माण होतो. आमच्या जीवनात शिवाची आणि पार्वतीची ताटातूट झालेली असते. ज्या ठिकाणी बंधन आणि मुक्ती या दोघांची एकत्र प्रतिष्ठा नाही, ज्या ठिकाणी अनुराग आणि वैराग्याचा विरोध निर्माण झाला, त्या ठिकाणी अशांतीच अशांती आणि निरानंद बोकाळलेले दिसतात. अशा ठिकाणी मग माणसाची फक्त घेण्याची इच्छाच तेवढी शिल्लक राहाते, देण्याची नाही. तेथे फक्त सारे काही आपल्याकडे ओढून घेण्याचाच प्रयत्न असतो, दुसऱ्याकडे पाहण्याची आपल्याला गरज भासत नाही. आपली भोग्यवस्तू कधी काळी संपावी असे आपल्याला कधी वाटतच नाही. आणि जर, यदाकदाचित् तिची परिसमाप्ती झालीच, तर विधात्याला धि:कारीत आपण एकच हाहा:कार उडवून देतो. कर्माच्या बाबतीत आपण चढाओढ माजवून ठेवतो आणि धर्माच्या बाबतीत द्वेषाला आणि तिरस्काराला जवळ करतो. परिणाम असा होतो की कुठलीही गोष्ट स्वाभाविक नियमानुसार घडतच नाही. साऱ्या भानगडी समाप्त होतात त्या अपमृत्यूमुळे !

जीवन म्हणजे एक युद्धच आहे असे मानले तरी हरकत नाही. मात्र, या युद्धात केवळ व्यूहात प्रवेश करून घेण्याचीच तेवढी विद्या आपण अवगत करून घेतली आणि व्यूहातून बाहेर पडण्याचे कसब जर आपल्याला माहित नसले, तर ह्या युद्धात सारे रथीमहारथी आपल्याला ठार मारणार हे निश्चित ! तशा प्रकारच्या युद्धात सुद्धा आपण आपले शौर्य जरूर प्रकट करू शकू, पण त्याला युद्ध जिंकणे काही म्हणता येणार नाही. जे व्यूहात प्रवेश करायलाच मुळी तयार नाहीत त्यांच्याबद्दल बोलायचे झाल्यास असेच म्हणावे लागेल की, वीरांना मिळणारी सद्गती अशा भेकड पुरुषांना काही मिळणार नाही. व्यूहात प्रवेश करू शकणे आणि त्याचा भेद करू शकणे— ह्या दोन्ही गोष्टी साध्य झाल्या तरच जीवनाचे सार्थक झाले असे म्हणता येईल.

प्राचीन संहिताकारांची हर-गौरीला अभेदांग बनवून घेण्याची इच्छा होती. ग्रहण आणि त्याग, आकर्षण आणि विप्रकर्षण, केंद्रानुगत्व आणि केंद्रातिगत्व, स्त्री आणि पुरुष, ह्यांच्या ज्या निश्चित स्वरूपाच्या सामंजस्यावर प्रतिष्ठित होऊन सारी चराचर सृष्टी सत्य आणि सुंदर बनलेली आहे त्याच विशाल सामंजस्यावर सर्व बाजूंनी समाजालाही प्रस्थापित करावे, असाच त्या संहिताकारांचा प्रयत्न होता. शिव आणि शक्ती, प्रवृत्ती आणि निवृत्ती यांच्या संमीलनातच समाजाचे मंगल आहे, शिव आणि शक्ती यांचा विरोध साऱ्या अमंगलाचे कारण आहे, हे त्यांनी जाणले होते.

ह्या सामंजस्याचा आश्रय घ्यायचा तर माणसाबद्दल प्रथम नीट विचार केला पाहिजे. याचा अर्थ असा की, आपण माणसाकडे पहायचे ते आपल्या कोणत्यातरी विशिष्ट प्रयोजनाच्या पूर्तीच्या दृष्टीने आपण त्याच्याकडे पाहता कामा नये. कैरीच्या रूपात, नुसती एक स्वादिष्ट आंबट चटणी किंवा लोणचे करण्यास योग्य पदार्थ म्हणूनच जर आपण आंब्याकडे पाहू लागलो, तर ते काही आंब्याचा समग्रपणे विचार करणे होणार नाही. असे केल्याने आपण आंब्याच्या स्वाभाविक परिणतीच्या मार्गात बाधा मात्र निर्माण करून ठेवू. पण आपण

करतो मात्र नेमके हेच. कच्चे असतानाच आपण आंबे झाडावरून झोडपून घरी आणतो आणि त्याचे स्वाभाविक कार्य मातीमोल करून टाकतो. नुसती एक जळणाच्या कामी येणारी वस्तू एवढ्याच दृष्टीने जर आपण झाडाकडे पाहायचे ठरविले, तर त्याच्या फळात, फुलात, पानात काही तात्पर्य आहे असे आपल्याला कधी वाटणारच नाही. माणसाचेही तसेच आहे. त्याच्याकडे केवळ राज्यरक्षणाचे एक साधन म्हणून आपण पाहू लागलो तर त्याला आपण एक सैनिक मात्र बनवून ठेवू; राष्ट्राच्या समृद्धीत भर टाकण्याचे एक साधन म्हणून आपण त्याच्याकडे पाहू लागलो तर त्याला वाणी–व्यापारी बनविण्याचा आपण काटेकोरपणाने प्रयत्न करू. म्हणजे, जगात जे सर्वांत अधिक वांछनीय असेल त्याचेच एक उपकरण म्हणून आपण माणसाकडे पहायला लागू, आणि तेवढे ते प्रयोजन सिद्ध करण्यातच माणसाचे सार्थक आहे असे म्हणायला लागू. एवढेच नव्हे तर तशी ठाम समजूतही आपण करून घेऊ. माणसाकडे अशा दृष्टीने पाहण्यात कोणत्याच प्रकारचे हित नाहीच असेही नाही. पण सामंजस्य नष्ट झाल्याकारणाने शेवटी अहितच पुढे आल्यावाचून राहात नाही. मनुष्य हा सर्व प्रयोजनापेक्षाही कितीतरी मोठा आहे अशा दृष्टीने त्याच्याकडे पाहण्याची आमच्या देशाची शिकवण आहे. चाणक्याच्या एका सर्वत्र प्रचलित असलेल्या श्लोकावरून आमची ही दृष्टी प्रगट होते—

> **त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।**
> **ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ।।**

मनुष्याचा आत्मा हा कुळापेक्षा, ग्रामापेक्षा, देशापेक्षा, संपूर्ण पृथ्वीपेक्षाही मोठा आहे. निदान तो कोणापेक्षा लहान खास नाही. म्हणून मनुष्याला आपण प्रथम साऱ्या देशापासून आणि क्षणकालीन प्रयोजनांपासून वेगळे करून त्यांच्या विशुद्ध आणि बृहत् स्वरूपात त्याला पाहिले पाहिजे असे केल्यानेच संसारांतल्या साऱ्या प्रयोजनांशी त्याचे सारे खरे नाते जुळू शकेल. जीवनक्षेत्रात त्याचे वास्तविक स्थान कोणते हे मगच ठरविता येईल एरव्ही नाही.

आमच्या देशात असेच केले होते. शास्त्रकारांनी मनुष्याच्या आत्म्याकडे, तो अत्यंत मोठा आहे याच दृष्टीने पाहिले आहे. माणसाच्या मोठेपणाला कुठेच सीमा नाही. शेवटी फक्त ब्रह्मातच त्याची समाप्ती होणार, असे शास्त्रात म्हटले आहे. दुसऱ्या कोणत्याही दृष्टीने तुम्ही माणसाबद्दल एकांगी दृष्टिकोण ठेवून विचार करा, तुमचा तो विचार मिथ्याच ठरणार आहे. त्याच्याकडे नागरिक म्हणून पाहा. कुठे राहिले नगर आणि कुठे राहिला मनुष्य ! नगर हीच केवळ मनुष्याची पर्याप्ती नाही. त्याच्याकडे राष्ट्रभक्त म्हणून पाहा—नाही. देशातही त्याची परिसमाप्ती नाही. कारण देश म्हणजे नुसते जल–विबच. आणि सारी पृथ्वी तरी दुसरे काय ?

एकेकाळी राजा असलेल्या भर्तृहरीने म्हटले आहे—

> **प्राप्ताः श्रियः सकलकामदुघास्ततः किम्**
> **न्यस्तं पदं शिरसि विद्विषतां ततः किम् ।**
> **संपादिताः प्रणयिनो विभवैस्ततः किम्**
> **कल्पस्थितास्तनुभृतां तनवस्ततः किम् ।।**

सर्व काम्यफल देणारी लक्ष्मी तुम्ही प्राप्त करून घेतली तरी त्यामुळे काय होणार ? शत्रूच्या शिरावर तुम्ही आपला पाय रोवला म्हणून तरी काय होणार ? संपत्तीच्या जोरावर तुम्ही पुष्कळ मित्र गोळा केले, देहधारी जीवांचे देह तुम्ही कल्पान्तापर्यंत कायम ठेवलेत, तरी पुढे काय ? त्यामुळे काय होणार ?

म्हणजे, या सर्व कामनेच्या वि यांच्या द्वारे मनुष्याला लहान बनवून चालणार नाही या सर्वांपेक्षाही मनुष्य अधिक मोठा आहे. मनुष्य हा या सर्वांपेक्षा अधिक मोठे असे सत्य आहे. ते सत्य अनादिकडून अनंताकडे जायला निघालेले आहे. माणसाचा या स्वरूपात जेव्हा आपण विचार करू तेव्हाच त्यांच्या जीवनाला सुजाणपणे संपूर्णत्वाच्या मार्गाने चालायला लावण्याचा काही उपाय आपल्याला काढता येईल. मनुष्य म्हणजे नुसताच संसारी जीव असेच जर आपण मानून घेतले, तर सांसारिक प्रयोजनात बांधून त्याला आपण कापून–तोडून अगदी लहान बनवून टाकले असे होईल.

—शबरी

नागपुरातील रसिकतेचे एक पर्व संपले

लेखक——मधुकर श्रीधर मंगरूळकर
ॲडव्होकेट, नागपूर

श्रीमंत बाबूरावजी देशमुख यांचा पक्षघाताने बळी घेतला - ७० वा वाढदिवस व्हायच्या अवघ्या तीन दिवस अगोदर ! १० जुलै रोजी पहाटे त्यांचे देहावसान झाले आणि नागपूरच्या रसिकतेचं एक पर्व संपलं. चिरंतन लय स्तब्ध झाली. जवळजवळ सत्तर वर्षे चाललेल्या तंबोऱ्याचा झारदार झंकार स्तब्ध झाला !

साध्या आंब्याच्या फळापेक्षा कलमी फळ जास्त रसरसलेलं, माधुर्ययुक्त असतं. आधीच असल्या दानशूर-तेमुळे ख्याती पावलेल्या श्रीधरअण्णा देशमुखांनी १९१६ साली त्यांना दत्तकपुत्र म्हणून घेतले आणि श्रीमंतीवर रसिकतेची कलम बांधली गेली. या दोन्ही गुणांचा प्रत्यय नागपूरकरांना उत्कटतेने आलाच, पण त्याच्या कीर्तीचे पराग कलावंतांनी ठिकठिकाणी पसरवले. अशा प्रकारे त्यांची कीर्ती दिगंती पसरली.

बाबूरावजी हाडाचे कलावंत होते. एखाद्या नट-श्रेष्ठाची रंगभूमीवरील प्रत्येक हालचाल ही कौतुकाची बाब ठरते. त्याप्रमाणे लहानसहान गोष्टीतही त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्व प्रतीत होत होते.

ते दानशूर होते. पण आपल्या दानशूरतेचे प्रकटीकरण त्यांनी कधी केले नाही. त्यांचे देणे गुप्तदान देण्याच्या पद्धतीचे होते. १९२८–२९ चा सुमार असावा. त्या सुमारास मास्तर कृष्णरावांची पहिल्या प्रथम त्यांच्याकडे बैठक झाली. गाणे संपल्यावर बाबूरावजींनी त्यांना एक पाकीट दिले. त्या पातळ पाकिटावरून आतील रकमेचा अंदाज त्यांनी केला असावा व संकोचपूर्ण स्वरात मास्तर उद्गारले, "मला ते नको. मी हे घेणार नाही. मी अजून आपणाला खरं गाणं ऐकवलंच नाही. माझं समाधान होऊ द्या. मगच जे काही द्यायचं असेल ते द्या." अर्थातच या नकाराच्या पोटी बिदागी अल्पशी असेल हीच शंका होती. बाबूराव-जींनी बळेच ते पाकीट त्यांना दिलं-आणि नंतर कळलं की त्यात शंभर रुपयांच्या तीन नोटा होत्या. ज्या काळात पंचवीस तीस रुपयांच्या मोबदल्यात सहज मैफली मिळविता येत होत्या, त्या काळातील ही गोष्ट ! तीनशे रुपयात एका साधारण कुटुंबाचे पालनपोषण होत असलेल्या त्या काळातील ही गोष्ट आहे.

अशीच एक आठवण १५ ऑगस्ट १९४९ सालची आहे. नागपूर नमोवाणी केंद्राच्या पहिल्या वार्षिको-त्सवासाठी, अनेक कलाकारांबरोबरच तबलानवाझ अहमदजान थिरकवा साहेबही आले होते. त्यावेळी श्री. सीताकान्त लाड हे नागपूर आकाशवाणीचे लोक-प्रिय अधिकारी होते. (ते सध्या पणजी आकाशवाणी केन्द्रावर आहेत) त्यांचा मुक्काम नागपूर शहरातील 'लेक व्ह्यू लॉज'मध्ये असे. तबलानवाझ खांसाहेबही तिथेच मुक्कामाला होते. त्यांनी खांसाहेबाला बाबू-रावजींच्या महालातील वाड्यात नेले आणि सतत दोन तास सोलो वादन करून खांसाहेबांनी श्रीमंतांना जिंकले. बाबुरावजींनी आपल्या खाजगीतल्या कारभाऱ्याला आवाज दिला,—

'केशवराव—'—आणि केशवराव येताच त्यांच्या कानात सांगून पाकीट बंद करून आणायला सांगितले आणि खांसाहेबांना म्हटले की, 'आपल्या कलेचे मोल होण्यासारखे नाही. पण आठवण म्हणून हे पाकीट ठेवा.' त्या पाकिटात किती रुपये असावेत ? एका बैठकीत दोन तासांच्या कार्यक्रमाचे त्यांना साडे-सातशे रुपये बाबूरावजींनी दिले. खांसाहेबांकडून मागाहून कळले की, त्या काळापर्यंत एका बैठकीत दोन

तास कार्यक्रमाचे एवढे रुपये त्यांना कधी मिळाले नव्हते. त्या दानशूरतेची जाहिरात केलेली त्यांना आवडत नसे.

या त्यांच्या वागण्यात वडेजाव नव्हता. या कानाची बातमी त्या कानाला कळायची नाही इतकी गुप्तता. आता गोष्टीने गोष्टी निघाल्या म्हणजे त्यांच्या दातृत्वाच्या एक एक गोष्टी कानी येतात आणि या अफाट हृदयाच्या पुरुषाकडे मनुष्य थक्क होऊन पहात राहतो.

श्री. रामभाऊ गुळवणी यांच्यावर त्यांचा विशेष लोभ होता. त्यांच्या सांपत्तिक अडचणीच्या प्रसंगी कित्येक महिने बाबूरावजींकडून त्यांना दरमहा रकम पोचती होत होती, ही गोष्ट स्वतः रामभाऊंनी सांगितली होती आणि त्यावेळी रामभाऊ गहिवरून गेले होते.

रामभाऊंच्या बाबतीत त्यांच्या हळुवारपणाची एक आठवण सांगण्यासारखी आहे. १९५७ च्या सुमारास माझे 'रियाझ' हे पुस्तक प्रसिद्ध होऊ घातले होते. बाबूरावजींची माझ्यावर विशेष मेहेरनजर होती. 'कॉंटिनेन्टल'चे अनंतराव कुळकर्णी एक प्रत घेऊन बाबूरावजींना द्यायला आले होते. त्यांना घेऊन मी, श्री. वामनराव चोरघडे बाबूरावांच्या माडीवर बसलो होतो. पुस्तकातल्या कलावंतांच्या एकेका चित्राकडे पाहून जणू ते आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत होते. मध्ये रामभाऊ गुळवणी यांच्यावरील लेख आला. त्यात फोटो नव्हता. बाबूराव म्हणाले, "मधुकरराव, रामभाऊंचा फोटो नाही घातलात?" मी म्हणालो, "फोटो मिळाला नाही म्हणून राहून गेला, आणखी काही नाही." लगेच ते म्हणाले, "ते काही नाही, रामभाऊंचा फोटो पाहिजेच. मी देतो फोटो. माझा रामभाऊ फार हळवा आहे. आपला फोटो नाही, हे पाहून काय वाटेल बिचाऱ्याला. केशवरावऽऽ — आतल्या खोलीतला रामभाऊंचा फोटो काढा आणि गोपाळराव पाठकांना म्हणावं दोन तासात प्रती द्या आणि तावडतोब ब्लॉक करून द्या,— आणि बरं का कुळकर्णीसाहेब, पुस्तक दोन दिवस प्रसिद्ध करू नका. मी ब्लॉक पाठवितो. रामभाऊंचा फोटो नाही म्हणजे काय?"

आणि त्याप्रमाणे रामभाऊंचा फोटो असलेली प्रत त्यांनी पाहिली, तेव्हा त्यांना बरे वाटले.

एवढे मोठे गृहस्थ पण स्वतःविषयी उल्लेख मात्र स्वतःकडे अगदी कमीपणा घेऊनच करीत असत. त्यांना आढयता नव्हती. एखाद्या गुणी माणसाची कदर करताना त्याच्या वयाकडे पहात नसत. मग तो जवळपास अजय पोहणकर हा कुमार गायक असो किंवा मरहूम बडे गुलामअली यांच्यासारखे ज्येष्ठ व श्रेष्ठ गायक असोत! कुठेही पत्र लिहीत असताना आपला उल्लेख 'आपला नम्र सेवक' असा करीत.

मी त्यांना माझ्या लहानपणापासून ओळखत होतो. पण त्यांची माझी ओळख योगायोगाने झाली. त्याही योगायोगात त्यांच्या अंगच्या एका गुणाचे दर्शन होते, म्हणून सविस्तरपणे सांगत आहे. मी त्यांच्या मुलासारखा, ते मला पितृतुल्य. एका सकाळी त्यांच्याकडून मला पत्र आले. ते पत्र म्हणजे त्यांच्यामध्ये लेखनाचे गुणही कसे सुप्तपणे वास करीत होते, याचा नमुना आहे. जातिवंतांची ऐट, रसिकाचा दिलदारपणा, स्वप्नाळू वृत्ती वगैरे सर्व गुण त्यात प्रगट झाले आहेत. ते पत्र मी संपूर्ण येथे उद्धृत करीत आहे :—

श्रीराम   महाल रोड
नागपूर–सिटी
ता. १०-१२-४९

श्री. कृपासागर रा. रा. मधुकरराव मंग्रुळकर यांचे सेवेशी सा. नमस्कार वि. वि. माझे हे पत्र पाहून आपल्याला आश्चर्य वाटेल, हे मी जाणून आहे. प्रत्यक्षाऐवजी—काही काही वेळेला—आपले भाव लिखाणानेच व्यक्त केल्याने मनाची प्रसन्नता, आनंद द्विगुणीत होत असतो व आपले सारखे रसिक सुहृदाजवळ तर हटकूनच. अलिकडील 'युगवाणी'चे तीन चार अंक माझे वाचण्यात आले. त्यातील आपले कलावतांचे चारित्र्यात्मक लिखाण वाचल्याने होत असलेला आनंद मी व्यक्त करीत आहे. त्याबद्दल आपले मी मनःपूर्वक अभिनंदन करीत आहे व अनेक धन्यवाद देत आहे. भाषासौष्ठव, साहित्य व रसपूर्ण जिवंतपणा त्यात दिसून येतो. या बाबतीत माझे स्वतःचे मी एकच गमक ठरवून ठेवले आहे. ते हे की, असले वाङ्मय वाचल्यानंतर किंवा वाचीत असताना सिगरेट पेटवून–मागील गोड स्मृतींच्या अनेक छटेच्या समाधीधुंदीत लय लागणे व हेच गमक आपले 'कलावंता'वरील कलापूर्ण लेख वाचल्यानंतर माझे अनुभवाला काही

काही वेळेला आले. सरावाने आपले लेखणीला रसपूर्ण धार येत चालली आहे. आपले कलापूर्ण लेखात माझे-विषयी जो आपण गौरवपर उल्लेख केला आहे यावर मी भाष्य करीत नाही (करण्यासारखे असूनही). फक्त मी आपले फार फार आभार मानीत आहे. मला पत्र लिहिण्याची प्रेरणा का झाली व केव्हा--आपला 'बिसमिल्लाचा' वादक-कलावंताचा परिचयात्मक लेख वाचल्यानंतर--आजपावेतो-सत्य तेच लिहीत आहे. 'शहनाई'चा कार्यक्रम दिसला की उलटव पान लिसनरचे किंवा कर रेडिओ बंद. परंतु आपण बिसमिल्ला यांचा परिचय करून दिला तेव्हा कुतूहलाने मी नागपूर रेडिओवर या जातिवंत कलावंताचा कार्यक्रम ऐकला व मजा घेतला. सुप्रसिद्ध कादरबक्ष यांचेनंतर वादक बिसमिल्ला—हेच मला दिसून आले. शहनाई ऐकत असताना उत्कृष्ट ख्यालगायकीच चालली आहे असे वाटत होते. बिसमिल्ला यांच्या परवाच्या 'मालकौंसा'चे स्वर अजून कानात घुमत आहेत. आपल्यामुळेच हा आनंद मला घेता आला व पुढेही न चुकता हा रसास्वाद घेण्याचे ठरविले आहे. कला-भांडारातील अनेक दालनांपैकी एक आनंद-ठेवा असलेले दालन मला आपण दर्शविले याबद्दल आपला ऋणी आहो. तन्मयतेला व तादात्म्याला नेणारा हा विषय आहे व 'मूड'हा आलेला आहे पण केवळ आपल्याला कंटाळवाणे वाटेल काय? विचार आल्याने येथेच साखळी तुटली--येथेच थांबतो. वाङ्मयक्षेत्रात आपण टाकलेले पाऊल 'वामन पाऊल' ठरो व यशस्वी होवो हीच इच्छा असणारा—

आपला सेवक

बाबुराव देशमुख

स्वतःच्या रसिकतेचा आणि हळुवारपणाचा परिचय किती नम्रतेने त्यांनी करून दिला आहे!

बाबुरावांचे वाचन आजतागायत होते. सर्व वर्तमानपत्रे, मासिके त्यांच्या टेबलावर असायची. वर्धीवरील सप्रे बंधू यांच्याकडून त्यांना सर्व वर्तमानपत्रे पुरविली जात. बाबुरावांकडून दोन तीन महिन्यांनी ३००-४०० रुपये बिल श्री. सप्रे नेत असत. कारण तोपर्यंत ती रक्कम त्यांच्याकडे 'जमेस' आहे, असे श्री. सप्रे समजत. परंतु बाबूराव बिल देताना त्या तारखेपर्यंतचे व्याजही मूळ बिलावरोबरच चुकते करीत, ही गोष्ट फारच थोड्या लोकांना माहीत असेल.

बाबुरावजींचे किराणा घराण्याच्या गायकीवर व गायकांवर विशेष प्रेम होते. इतर घराण्याची गाणी त्यांना तितकी रिझवू शकत नव्हती. काही वर्षांपूर्वी सलामतअली व नजाकतअली या पाकीस्तानी जुगलबंदी-गायकांनी नागपूरला मोठी धमाल उडवून दिली होती. त्यांच्या तानांचे सट्टे सुरू झाले म्हणजे श्वास घेण्याइतकी देखील फुरसत नसे. पेटविलेली उदवत्ती अंधारात गोलगोल, वाकडी तिकडी फिरवावी म्हणजे धाराच्या पार्श्वभूमीवर लाल वलयांकित आकृती क्षणभर प्रकट होते. पण नंतर काय,—अंधार! त्या गायकाच्या कसरती-नैपुण्याबद्दल बाबूराव चांगले उद्गार काढीत, पण लगेच छातीला हात लावून म्हणायचे —

"इथ हालतय का काही? 'बाबुल मोरा नह्यर छुटो जाय'—म्हणताना बाबूलने एकदम गरुडासारखी आकाशात भरारी मारली तर ते प्रसंगोचित दिसेल काय?" त्यांना तानबाजीपेक्षा स्वरांची बढत जास्त आवडे. एकेक राज्य आक्रमण करून त्यात सर्व सुव्यवस्था झाल्यावर नवीन ग्रामाकडे मोर्चा हाकलणाऱ्या शिकंदरासारखी त्यांची संगीताबद्दल-स्वरविस्ताराबद्दल वृत्ती होती. भीमसेन जोशांचे गायन ऐकताना, एखाद्या जागेने रामभाऊ सवाई गंधर्वांची आठवण झाली, की तो तेजोऽर्घ्या हेलावून क्षणभर मूक होऊन जात असे.

रामभाऊ सवाई गंधर्वांना गायक म्हणून पुढे आणण्यात केवळ बाबुरावजींचा हात होता. यशवंत संगीत मंडळीत ते नायकाची भूमिका करीत. पण १९३० च्या सुमारास सांपत्तिक हलाखीमुळे कंपनीतून त्यांना नोटीस मिळाली. ते बाबुरावजींचा निरोप घ्यायला आले. इतक्या दिवसांचो अतूट बंधने तुटण्याची पाळी एवढ्या लवकर येईल, अशी कोणालाच कल्पना नव्हती. बाबुरावांनी त्यांच्यात विश्वास उत्पन्न केला. केवळ गायक म्हणून जगता येईल, ही दृष्टी रामभाऊंचे ठिकाणी उत्पन्न केली. महालात काळयांच्या वाड्यात माडीवर रामभाऊ रहात आणि रोज संध्याकाळी नाना जोग, बाबुरावजी व इतर मंडळी तबले, डग्गे, पेटी, बिछायत, पानाचे तबक वगैरे सरंजाम घेऊन रामभाऊंच्या माडीत जायचे आणि त्यांना गायला लावायचे. पुण्या-मुंबईचा हा आवडता ठेवा--बाबु-

रावजींसारख्या रसिक विश्वस्तांनी किती काळजीपूर्वक जोपासला याची साक्ष इतिहास देत आहे.

तसेच बाबुरावजी फार मानी होते, स्वतःच्या मानापानाची त्यांनी एवढी तमा बाळगिली नाही, पण आपल्या म्हटलेल्या माणसाचा कोणी अनवधानानं अपमान केला, तर ते त्याचा बदला खचित घेत.

रामभाऊंच्या एका मातबर शिष्यिणीकडून त्यांचा थोडा अपमान झाला, अशी त्यांची खात्री पटली होती, तेव्हा त्या शिष्यिणीला त्यांनी साधी भेटही दिली नव्हती. मास्तर दीनानाथांनी आपले गायन त्यांना ऐकवावे, असे मास्तरांना कुणी तरी सुचविले होते. त्यावर मास्तरनी असं म्हटलं होतं की, "बाबुरावांना काही गाणं समजतं का ? की पैशाचा दिमाख नुसता !"—आणि ही वार्ता त्यांच्या कानावर गेल्यानंतर भाऊसाहेब काळीकरांच्या वाड्यात व इतरत्रही दीनानाथांचे गाणं ऐकण्याची निमंत्रणे येऊनही त्यांनी शेवटपर्यंत त्यांच्या गाण्यावर बहिष्कार घातला होता.

असाच एक प्रसंग दुसऱ्या मातब्बर गायकासंबंधी सांगता येण्यासारखा आहे. मध्यंतरी काही वर्षे या गुणी पण आढ्यतापूर्ण गायकाचे नागपुरात येणे होत असे. महालामध्ये श्री. चव्हाण यांच्या माडीवर त्यांचे गाणे ठरले होते. त्या गाण्यास नागपूरचे राजेबहादुर रघोजी महाराज भोसले यावयाचे होते. देशमुख घराण्याचे आणि भोसले घराण्याचे संबंध घनिष्ट होते. रघोजी महाराज राजे या दृष्टीने नामशेष झाले असले तरी भोसले वंशाचा तो नागपूरकर राजा याबद्दल बाबुरावजींना अतीव आदर होता. बाबुरावजी इतर मंडळींसमवेत अगोदरच मैफलीच्या जागी उपस्थित होते.राजे रघोजीरावांचे आगमन झाल्याबरोबर सर्वांनी उठून खडी तालीम दिली. पण मुख्य गायक पडले आढ्यतेखोर. ते गादीवर तसेच पाय पसरून बसले होते; व राजेसाहेबांच्या आगमनाची त्यांनी दखलही घेतली नाही. त्यामुळे बाबुरावांना फार वाईट वाटले; व लगेच काही कारण काढून उठून आले. त्यानंतर कित्येक वर्षे त्या गायकांनी बाबुरावजींना गाणे ऐकविण्यासाठी प्रयत्न केले. पण शेवटपर्यंत त्यांचे गाणे त्यांनी आपल्या घरी तर केलेच नाही, पण इतरत्रही ऐकले नाही. असाच एक दुसरा प्रसंग माझ्या आठवणीत आहे. त्यावरून त्यांना नागपूरच्या मानमरातबाची किती काळजी होती, हे दिसून येईल.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे दिवस होते. दे. भ. शंकरराव देव त्या काळी त्या चळवळीचे अध्वर्यू समजले जात. त्यांचे आगमन नागपुरास व्हावयाचे होते त्यासमयी नागपूरतर्फे त्यांचे स्वागत म्हणून श्रीमंत बाबूरावजींनी भोजनसमारंभ घडवून आणावा, अशा इच्छेने नागपुरातील काही मोठी जबाबदार मंडळी त्यांच्याकडे गेली होती; व नागपूरकरांतर्फे यजमान म्हणून ही मेजवानी त्यांनी द्यावी, अशी त्यांना गळ घातली. बाबुरावजींनी त्यांची विनंती मान्य केली. पण त्यांनी दोन अटी घातल्या. ते म्हणाले, "आपल्या विनंतीप्रमाणे मेजवानी घालायला मला आनंदच वाटेल व तो तुमचा हक्कच आहे. पण माझ्या दोन अटी अशा : एक तर मी स्वतः शंकरराव देवांना आमंत्रण द्यावयाला जाणार नाही आणि दुसरे, भोजन मी माझ्या पद्धतीप्रमाणे करीन. त्यात कुणाला ढवळाढवळ करू देणार नाही." या अटीत नामंजूर करण्यासारखे काहीच नव्हते. बाबुरावजींकडची जेवणे म्हणजे पेशवाईतील जेवणाची आठवण करून देतात, अशी प्रसिद्धी १९४५ साली नागपूरला भरलेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या अनेक प्रमुख पत्रकारांनी भरपूर केलेलीच होती. त्याच थाटात पंचपक्वानांचे जेवण झाले. – आणि नंतर भाषणांची सुरुवात झाली. श्री. शंकरराव देवांनी मोठ्या कष्टाने उभे राहून आपल्या भरलेल्या पोटावर हात फिरवीत, ठराविक सर्वोदयी थाटाचे भाषण सुरू केले आणि बैठकीचा रंग बिघडला. त्यांनी म्हटले, "आपली भारतीय जनता गरीब आहे, दरिद्री आहे. युद्धाच्या महागाईचे भूत सर्वांना भेडसावीत आहे. जनतेला एका वेळच्या जेवणाची वानवा पडत आहे. अशा परिस्थितीत आजच्या प्रसंगी जी पक्वान्नांची रेलचेल होती,—तो खर्च शोभण्यासारखा नव्हता. आमच्या भुकेल्या जनतेची आठवण ...."

—आणि बाबुरावजींचे पित्त खवळले. ते ताडकन् उठून उभे झाले व म्हणाले,—

"श्री. देव यांचा महात्मा गांधींचे पट्टशिष्य म्हणून आजपर्यंत मला फार आदर वाटत होता. पण आताचे भाषण ऐकून तो पार गेला आहे. एक तर मी त्यांना जेवणाचे निमंत्रण द्यायला गेलो नव्हतो.—आणि दरिद्री, उपाशी जनतेची त्यांना इतकी कणव होती, तर ते पानातील पक्वान्ने पाहून उठून गेले असते तर त्यांचेबद्दल माझा आदर दुणावला असता. पण असे न

करता भरल्या पोटावर हात फिरवीत व ढेकर देत देत उपदेशामृत पाजण्याचा जो प्रयत्न ते करीत आहेत, त्यावरून त्यांनी आपल्या जिभेवर अजून नियंत्रण घातलेले नाही व ते ढोंगी आहेत, हे स्पष्ट होते. त्यांनी अंधारात मला एकटयाला, माझा कान धरून सांगितले असते, तरी त्यांना अधिकार होता. पण त्यांनी माझा नव्हे तर नागपूरकरांचा अपमान केला आहे आणि जोपर्यंत तुम्ही त्या सगळयांची या बैठकीत माफी मागत नाही, तोपर्यंत या बैठकीतला एकही माणूस हलणार नाही, लक्षत ठेवा."

प्रसंग मोठा बाका होता. शंकरराव देवांनी निमूटपणे माफी मागितली व आपल्याच हाताने ओढवून घेतलेल्या त्या प्रसंगातून स्वत:ची सुटका करून घेतली. दुसरे दिवशी या प्रकरणाची कुणकुण बाहेर फुटली व काही वार्ताहर या रोचक वार्तेची बातमी काढण्यासाठी बाबुरावजींना भेटले. पण त्यांनी चक्क नकार दिला व म्हणाले, "माझ्या घरचा खाजगी प्रसंग होता तो. त्याला वर्तमानपत्रात प्रसिद्धी देण्याइतका मी हलका नाही."

संगीताइतकाच नाटकाचा शौकही त्यांनी भरपूर केला. श्री. लोंढे यांच्या राजाराम नाटक मंडळीच्या शेवटल्या दिवसात बाबुरावांनी बरीच मदत केली होती. नारायणराव बालगंधर्वांचे व त्यांचे जणू अतूट नातेच होते. श्री. सीताकान्त लाड त्यावेळी नागपुरात होते. त्यांचा माणसे जोडण्याचा सोस फार होता. त्यांचे आणि बालगंधर्वांचे पूर्वापार संबंध. त्यामुळे लाडांच्यामुळेही त्यांच्या रसिकतेची अनेक दारे उघडली होती. रामुभय्या दाते, नारायणराव, सीताकान्त लाड वगैरेंच्या गप्पामैफली रातोरात चालत असत.

'नागपूर नाटचमंडळा'चे तर ते आश्रयदाते होते. तोही योगायोग मोठचा गमतीचा आहे. नाटचमन्वंतर संस्थेत काही काळ कामे करीत असलेले श्री. सखारामपंत जोशी, बाबूराव चिमोटे, नानासाहेब जोम, मनोहरपंत परांजपे, बापूराव चोरघडे, भाऊसाहेब पंडित, सौ. अनसूया वाडेगावकर अशा एकाहून एक हौशी नटमंडळीने ही संस्था चिकाटीने चालविली होती या मंडळीने संगीत 'उद्याच्या संसारा'चा प्रयोग बसवला. बाबूरावजी त्या प्रयोगाने एवढे प्रभावित झाले होते की, त्यांनी लगेच दुसरे दिवशी नानांना बोलावून सांगितले, "नाना, ही सारी कलावंत मंडळी मोठी होतकरू आहेत. त्यांच्यासाठी काहीतरी करावं असं मला वाटतं. काय अपेक्षा असेल ती कळवा." बानांनी सगळयांचा विचार घेतला. तालमीसाठी आणि रंगमंचाचे सामान ठेवायला जागा नव्हती. नानांच्या आग्रहावरून त्यांनी आपल्या धनतोलीमधील, आचार्य दादा धर्माधिकारी रहात असलेल्या, बंगल्याचा वरचा भाग मोकळा करून दिला होता व ती प्रशस्त जागा कित्येक वर्षे मंडळाला विनामूल्य मिळाली होती. संस्थेने बसवलेल्या प्रत्येक नवीन नाटकाच्या प्रथम प्रयोगाला अडीचशे रुपये द्यावे व हा क्रम दोन हजार रुपये पूर्ण होईपर्यंत चालू रहावा, ही योजना देखील त्यांनी मान्य केली होती. प्रोत्साहन मिळावे हा त्यांचा त्यामागे मुख्य हेतू होता.

श्री. सीताकान्त लाड यांच्या प्रेरणेमुळे व बाबूरावांच्या आश्रयाखाली श्री. सखारामपंत जोशी, मी स्वत: व इतर सहकाऱ्यांच्या मदतीने 'ललितकला मंडळ' ही संस्था १९४१च्या सुमारास सुरू करण्यात आली होती. या दोघांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेने बरेच नाव कमविले होते. अल्पकाळच्या पण दैदीप्यमान अशा कालावधीत अनेक मातबर कलावंतांचा सत्कार करण्यात आला होता. नाव होते मंडळाचे, पण कर्तृत्व होते बाबुरावजींचे. बाबुरावजींचे नाव छापील पत्रकावर पाहून आमच्याशी पैशाचा व्यवहार करायला सहसा कोणी धजत नसत. बाबुरावजींच्या अधिपत्याखालील संस्थेत हाजरी लागणे हेच महान् कार्य आहे, असाच त्या काळी कलावंतात समज होता. कै. सवाई गंधर्व, कै. बालगंधर्व, कै. गोविंदराव टेंबे, पं. विनायकबुवा, मास्तर कृष्णराव, सौ. हिराबाई बडोदेकर, श्री. भीमसेन जोशी वगैरेंचे जाहीर सत्कार झाले होते. डॉ. वसंतराव देशपांडे, श्रीधर पार्सेकर, रविशंकर, बिसमिल्लाखांसाहेब, रामभाऊ गुळवणी, निवृत्तिबोवा, सुरेशबाबू, पद्मा शाळीग्राम, सौदागर वगैरे कलावंतांनी मोठचा अभिमानाने आपली हाजरी लावली होती व बाबूरावजींनी आपली कला ऐकली, यावरच ते खुश होते.

श्री. सखारामपंत जोशी यांच्या प्रयत्नामुळे १९६४ साली नागपूरकरांतर्फे नटश्रेष्ठ केशवराव दाते यांचा अमृत महोत्सव त्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. त्याप्रसंगी त्यांनी केलेले अध्यक्षीय भाषण

म्हणजे त्यांच्या नाटचप्रेमाचा जिवंत इतिहास होता. सहसा ते परान्न घेत नसत. पोटाचा विकार असल्यामुळे घरच्या सुप्रसिद्ध मेजवान्यातही ते भाग घेत नसत. परंतु सखारामपंतांनी आपले गुरुवर्य केशवराव दाते यांच्या सन्मानार्थ दिलेल्या मेजवानीस मात्र पंतांवरील प्रेमामुळे ते सपत्निक जेवायला हजर होते.

बाबुरावजींच्या घरच्या बैठकी अविस्मरणीय झाल्या आहेत. त्याला कारण त्यांची शिस्तप्रियता. निमंत्रितांची यादी मोजक्या शेलक्या मंडळींची. त्यात एखादाही नवखा मनुष्य सापडायचा नाही. कोणी फर्मादिश करायची नाही. कलावंताला पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे या मताचे ते होते. त्यामुळे गायकाकडे चिठ्या-चपाटचा पाठविण्यास तिथे वाव नव्हता. एखादा श्रोता बैठकीतून मधून उठून गेला, तर त्याचे नाव तेवढे पुढच्या वेळच्या कार्यक्रमाच्या वेळी गळलेले असायचे. आपल्या आवडत्या गायकांखेरीज इतरांचे कार्यक्रम मोठेपणा म्हणून कधीही त्यांनी केले नाहीत. दूरदूरची कलावंत मंडळी त्यांचे नाव ऐकून येत. कित्येक प्रसंगी तर बाबुरावजी त्यांची भेट न घेता, गुप्ततेने त्यांना देणगीचे पाकीट पोचवीत असत. भर बैठकीमध्ये श्रोत्यांनी पानांची बोटें गालिचांना पुसायची किंवा सिगारेटची थोटके न विझविता तशीच टाकायची, या गोष्टी त्यांना आवडत नसत. या सारख्या बारिकसारिक गोष्टींवर त्यांची बारीक नजर असे. आमच्या मंडळाच्या एका कार्यक्रमाची गोष्ट. विछायतीवर बाबुरावजी विराजमान झाले होते आणि त्यांच्या शेजारी श्री. बडकस नावाचे नागपूर महापालिकेतील एक कनिष्ठ अधिकारी बसले होते. त्या गृहस्थांनी जळत्या सिगारेटचे थोटूक गालिचावर रगडून विझविले. ते त्यांनी पाहिले मात्र, त्यांनी हळूच म्हटले, "भास्करराव, तुमची सिगारेट विझवायची युक्ती मोठी नामी आहे बुवा ! बरे झाले, मला एरवी सिगारेट कुठे टाकावी, हे कळत नव्हते. तुमचा मार्ग चांगला."

श्री. बडकस अनवधानाने म्हणाले, "कोणती युक्ती म्हणाले तुम्ही ?"

"ही ! दुसऱ्याचे गालिचे सिगारेट विझवून खराब करण्याची !" — बाबुराव.

श्री. बडकस हळूच तिथून उठून गेले होते.

त्यांच्यासारखा दाता यापुढे नागपुरी होणे नाही, याचेच फार वाईट वाटते. त्यांच्या दातृत्वाला उघड उघड आव्हान देणारा एक प्रसंग. आम्ही शिवरामबुवा वझे यांना गायनासाठी बोलाविले होते. तोपर्यंत त्यांना आम्ही कधीही पाहिले नव्हते. शेजारीच असलेल्या विजयभारत निवासामध्ये ते उतरले होते. मी घरी नसताना एक साधा कुडता-टोपी घातलेला गृहस्थ बागेत काही तरी खुडतांना दिसला. आईने चौकशी केल्यावरून त्यांनी सांगितले की, "मी वझेबुवा आणि आज चतुर्थी असल्यामुळे दुर्वा तोडीत आहो." संध्या-काळी आम्ही निवासावर गेलो. बुवांचा थाट पाहून गार झालो. बुवा म्हणाले, "दुपारी मी कुठे झोपलो असेल, ते ओळखा !"

समोरच्या खाटेकडे पाहून आम्ही म्हणालो, — "खाटेवर ! आणखी कुठे ?"

"छे हो ! अहो खाटेखाली अशी गार फरशी आहे म्हणता. काय छान झोप आली होती !" —वझेबुवा.

त्यांना मोठ्या इतमामाने आम्ही बाबुरावजींकडे पोचविले. आठ पंधरा दिवस बुवांची चैन होती. दुपारी गड्याकडून त्यांनी भांगेची गोळी मिळवावी. दुपारी भरपूर जेवण होऊनही, त्यांनी नोकराकडून आठ आण्याची कांद्याची भाजी विकत आणून खाल्ली. ते कळल्यावर बाबुरावांना अर्थातच वाईट वाटले. तेव्हा-पासून ते स्वतः दिवसातून तीनचार खेपा बुवांकडे मारीत असत. एक दिवस शिवरामबुवा बाबुरावांना म्हणाले,—

"बाबूराव ! तुमचे वैभव वगैरे ठीक आहे. पण तुमच्या मोटरचा योग केव्हा आणणार ?"

त्या निर्व्याजपणाचे बाबुरावांनी कौतुक केले आणि त्या दिवसापासून मारोतराव लिंकन फोर्डमधून शिवरामबुवांना रोज फिरवून आणीत.

त्यांची स्मरणशक्ती मोठी तीव्र होती. वाचनाने बहुश्रुतता आली होती. त्यांना वक्तृत्वकला अवगत नसेल. पण बोलण्यात जिव्हाळा व प्रसाद भरपूर होता. एखाद्या नटाची कोरडी तारीफ न करता त्याचा तप-शील ते बरोबर सांगत. नटवर्य केशवराव दाते यांच्या आदरातिथ्याच्या वेळी, केशवरावांनी आपल्या ऐन

उमेदीच्या काळात केलेल्या भूमिकांची, – विशेषत: हरिश्चंद्राच्या भूमिकेची ते तारीफ करीत असत. त्यांची भाषणे त्याच जोषात म्हणून दाखवून त्यांनी केशवरावांनाही चकित केले होते.

१९४४ ते ४६ दरम्यान सवाई गंधर्वांच्या पुण्याला झालेल्या पहिल्या पुण्यतिथीच्या प्रसंगी ते अध्यक्ष होते. त्या वेळी श्री. केशवराव दाते यांनी, जुने संबंध लक्षात घेता त्यांना भेटायला यायची इच्छा दर्शविली होती. पण बाबूरावांना, आपल्या मुक्कामी नटवर्यांनी आपणास भेटण्यास यावे, हे बरे वाटले नाही. त्यांनी म्हटले, "नागपूरला केशवराव माझ्या घरी आले, ते प्रस्तुत होते. पण मी आता पुण्याला आलो आहे. तेव्हा त्यांच्या भेटीला मी स्वत:च जाणे जास्त उचित आहे."

—आणि त्याप्रमाणे बाबूरावजी स्वत: वेळात वेळ काढून नटवर्यांच्या घरी जाऊन भेटले होते. शिष्टाचाराच्या व सौजन्याच्या बाबतीत ते अतिशय काटेकोरपणा पाळीत असत.

बाबूराव संगीतशास्त्राचे दर्दी तर होतेच. पण त्यांना गाण्याचेही अंग होते, ही गोष्ट फार थोड्या लोकांना माहीत असेल. सात आठ वर्षांपूर्वीचा प्रसंग असावा. नागपूर आकाशवाणीचे डायरेक्टर श्री. बोस, जबलपूरचा बालगायक अजय पोहणकर, गायक प्रभाकरराव जोशी, तबलावादक बाळासाहेब आठवले ही मंडळी दिवाळीच्या सकाळी त्यांच्या हॉलमध्ये जमली होती. श्री. बोससाहेबही गायले होते आणि सगळयांच्या आग्रहावरून बाबूराव गायला बसले. पांढरी चारचे तंबोरे लागले होते. भैरवीची चीज त्यांनी सुरू केली होती.

"बाजूबंद खुलखुल जा......" रामभाऊ सवाई गंधर्वांचा क्षणभर आभास झाला. त्यांचा तो ढाला आवाज, पण त्याला सखोलता होती. महादेवाच्या गाभाऱ्यात ॐऽऽभोऽ म्हणून साद घातली असता जो ओंकार काही काळ घुमत रहातो तसा त्यांच्या आवाजाचा घुमारा होता. थोड्या गमकाच्या ताना घेऊन त्यांनी सम पकडली आणि हसून तंबोऱ्यावर हात ठेवला.

तो झणकार आता कायमचा थांबला आहे. महालातल्या त्यांच्या वास्तूमधले सूर थिजले. आठवणींनी बांधलेला ताजमहाल उभा आहे आमच्यासारख्यांच्या मनात. त्या दीपोत्सवी रात्री आता आठवायच्या ......

सध्या तरी रसिकतेचं एक पर्व संपलं, पुढे काय ? ..... अनंताची पोकळी विशाल आहे .....

अनुक्रमणिका

पुस्तक परिचय

— **चंद्रकांत कुळकर्णी**

[श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात नुकत्याच आलेल्या तीन महत्त्वाच्या ग्रंथांचा परिचय अभ्यासकांसाठी करून देण्यात येत आहे.]

१

वाल्मीकि रामायण [भाग पहिला]

(मराठी सुरस भाषांतर : बालकांड ते सुंदरकांड)

भाषांतरकार — **कै. काशीनाथ वामन लेलेशास्त्री**

संपादक — **रामचंद्र चिंतामण ढेरे**

प्रकाशक — सुरेखा प्रकाशन, परळ, मुंबई–१२.

जुन्या वाङमयाचे गाढे विद्वान व चिकित्सक अभ्यासक श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे यांनी वाल्मीकि रामायणाच्या सुरस भाषांतराचा भाग पहिला, नुकताच प्रसिद्ध केला आहे. हे भाषांतर वाईचे सुविख्यात शास्त्री कै काशीनाथ वामन लेले यांनी केलेले आहे. या प्रथम खंडात बाल, अयोध्या, अरण्य, किष्किंधा आणि सुंदर ही पाच कांडे समाविष्ट आहेत. लेलेशास्त्रींचा पारंपारिक प्राचीन विद्यांचा व्यासंग जबरदस्त होता. आपल्या पंचावन्न वर्षांच्या जीवनकालात प्राचीन भारतीय धार्मिक वाङमयाचे भाषांतर, विवरण आणि समर्थन करण्याचा प्रचंड उद्योग त्यांनी केला. प्राचीन भारतीय वाङ्मयाचा परिचय आणि परामर्श घडविण्याच्या हेतूने शास्त्रीबुवांनी अनेक नियतकालिके चालविली. 'आर्यधर्मदर्पणा'मधून त्यांनी महाभारत, योगवासिष्ठ व पराशरमाधव हे ग्रंथ मराठी भाषांतरासह क्रमशः प्रकाशित केले आणि अनेक धर्मविषयक निबंधही लिहिले. इतिहासाचार्य राजवाडे आणि श्री. वि. पंडित यांच्या सहकार्याने प्राचीन मराठी वाङमयाच्या उद्धारासाठी त्यांनी 'महाराष्ट्र–सारस्वत' चालविले. दासोपंतांची दीड हजारांवर पदे यातूनच प्रकट झाली.

शास्त्रीबुवांनी केलेले श्रीवाल्मीकि–रामायणाचे सुरस भाषांतर प्रथम त्यांनी स्वतःच आपल्या वाईच्या मोदवृत्त छापखान्यात मूळ संहितेसह छापून श. १८१९ ते १८२२ (इ. स. १८९७ ते १९००) या काळात कांडशः सात भागात प्रसिद्ध केले होते. या नंतर त्यांच्या मराठी भाषांतराच्या दोन आवृत्त्या पुण्याहून प्रकाशित झाल्या. आज संपादित केलेली रामायणाची आवृत्ती शास्त्रीबुवांच्या 'मोदवृत्ता'तील संहितेसह असलेल्या आवृत्तीतील भाषांतराचे पुनर्मुद्रण आहे.

हा दुर्मिळ ग्रंथ संपादित करून अभ्यासकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल संपादक श्री. ढेरे यांचे अभिनंदन.

२

सार्थ श्रीतुकारामाची गाथा [खंड पहिला]

आवृत्ती ३ री

संपादक — **विष्णुबुवा जोगमहाराज**

प्रकाशक — **केशव भिकाजी ढवळे**

संत वाङमयाचे थोर अभ्यासक कै. विष्णुबुवा जोग यांनी संपादित केलेल्या सार्थ तुकारामाच्या गाथेच्या तिसऱ्या आवृत्तीचा प्रथम खंड अत्यंत आकर्षक स्वरूपात नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

बोवांनी संत वाङमयाच्या अनुवादाच्या क्षेत्रात फार मोलाची कामगिरी केली आहे. १९०१ साली

संत वाङ्मयाचे विख्यात प्रकाशक श्री. आवटे यांच्या करवी बोवांनी वर्गीकरण केलेली तुकारामाची गाथा प्रसिद्ध करविली आणि एका अर्थाने गाथेच्या अर्थाकडे जाण्याची 'सोपी पायवाट' तयार केली. त्यांनी स्थिती, करुणा, उपदेश, देवाशी संवाद इत्यादी कित्येक प्रकरणे पाडली असल्याने बोवांच्या या प्रयत्नामुळे अभंगांचा आशय ध्यानी येण्यास फार मदत झाली आहे. या वर्गीकरणावरून बोवांची कुशाग्रबुद्धी, शब्दांचे मोल जाणण्यास लागणारी कल्पकता, प्रतिपाद्य विषयावरील प्रभुत्व, आध्यात्मिक विषयाचा सखोल अभ्यास या गुणांचा प्रत्यय येतो.

या बहुमोल गाथेची दुसरी आवृत्ती १९२६ साली प्रकाशित झाली. त्यानंतर तिसरी आवृत्ती आज प्रकाशित होण्याचा योग आलेला आहे.

सार्थ गाथेबरोबरच ह. भ. प. पांगारकरांनी लिहिलेले तुकारामाचे अल्प चरित्र व जोग महाराजांच्या कार्याचा परिचय करून देणारा लेख जोडलेला आहे.

या गाथेची आकर्षक छपाई हे या पुस्तकाचे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. संत वाङ्मयाचे अभ्यासक या गाथेचे निश्चितच स्वागत करतील.

३

डॉ. कोलते गौरव ग्रंथ

संपादक–प्रा. मधुकर आष्टीकर

प्रकाशक–कोलते गौरव ग्रंथ प्रकाशन समिती, अमरावती.

मूल्य–वीस रुपये.

नागपूर विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू, व्यासंगी संशोधक, मराठी वाङ्मयाचे ख्यातनाम टीकाकार व महानुभाव तत्त्वज्ञानाचे अभ्यासक डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते ह्यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त कोलते गौरव ग्रंथ प्रकाशन समितीने हा संशोधनात्मक व वाङ्मयविषयक लेखांचा संग्रह प्रकाशित केला आहे.

संशोधनात्मक व वाङ्मयविषयक असे एकूण पंचवीस महत्त्वाचे लेख या संग्रहात आहेत. मत्तवारणी (डॉ. मिराशी), बी कवींचे काव्यविषयक विचार (डॉ. मा. गो. देशमुख), मुनीव्यास कोठी आणि ओटे बांधणी (डॉ. पू. म. पठाण), जग्राह पाठ्यम् ऋग्वेदात् (डॉ. ग. त्र्यं. देशपांडे), चोखामेळा संत भला (गं. बा. सरदार), धारापुरी हुंड्यावरील लेख (डॉ. मो. गं. दीक्षित), एकनाथी भारूडे–काही विचार (वा. ल. कुळकर्णी), महाराष्ट्रीय लोकसाहित्यविषयक लेखन (दुर्गा भागवत), या संशोधकांनी हा ग्रंथ सजविण्यास हातभार लावला आहे. याशिवाय प्रा. दि. के. बेडेकर, डॉ. अ. ना. देशपांडे, डॉ. ग्रामोपाध्ये, आ. रा. देशपांडे, अनंत काणेकर, प्रा. दि. य. देशपांडे, अ. का. प्रियोळकर, डॉ. अ. भि. शास्त्री, डॉ. देव, प्र. वा. ऊर्ध्वरेषे इ. अभ्यासकांचे लेख या ग्रंथात आहेत.

डॉ. वि. भि. कोलत्यांनी लिहिलेला 'प्राचीन केळझर' हा संशोधनात्मक लेख त्यांच्या सूक्ष्म संशोधन वृत्तीचा प्रत्यंतर आणून देतो.

देशीकार लेणे ! या लेखात वामन कृष्ण चोरघड्यांनी डॉक्टरसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा सुरस परिचय करून दिला आहे.

नागपूर विद्यापीठाचे ग्रंथपाल श्री. वसंतराव कुळकर्णी, सु. वा. देशपांडे, कु. भारती पुरेकर यांनी डॉ. कोलत्यांच्या वाङ्मयाची संपूर्ण सूची तयार केली असून ती या ग्रंथात समाविष्ट करण्यात आली आहे.

डॉ. वि. भि. कोलत्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेल असेच या ग्रंथाचे स्वरूप ठेवण्यात आले आहे. असा हा संशोधनात्मक लेखांचा संग्रह प्रकाशित करून सत्कारसमितीने औचित्य साधले आहे याबद्दल संपादक मधुकरराव आष्टीकर यांचे हार्दिक अभिनंदन.

संघवार्ता

मा. नी गलगलीकर
सरचिटणीस

विदर्भ साहित्य संघातर्फे सोमवार दि. २९ जून १९७० रोजी सायंकाळी ६–३० वाजता सुप्रसिद्ध साहित्यिक कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा ९९ वा जन्मदिन 'युगवाणी'चे संपादक श्री. शं. बा. शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला.

सुरुवातीला सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. शं. बा. शास्त्री यांनी कै. कोल्हटकरांसंबंधीच्या दोन छायाचित्रांचे अनावरण केले.

या प्रसंगी संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. शं. बा. शास्त्री, प्रा. भ. श्री. पंडित आणि प्रा. सुरेश म. डोळके यांची भाषणे झाली.

विदर्भ साहित्य संघाच्या पहिल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे व १९२३ सालचे स्थापनेचे दुर्मिळ छायाचित्र (मे जून १९७० च्या 'युगवाणी' अंकात प्रसिद्ध झाले आहे.) विदर्भ साहित्य संघाचे संस्थापक कविभूषण प्रा. ब. ग. उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांनी भेट म्हणून दिल्याबद्दल विदर्भ साहित्य संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे

डॉ. वा. ना. पंडित यांचे व्याख्यान

संस्थेतर्फे शुक्रवार दि. १० जुलै १९७० रोजी सायंकाळी ६–३० वाजता महाराष्ट्र शासनाचे भाषा संचालक डॉ. वा. ना. पंडित यांचे 'ज्ञानेश्वरीतील भक्तियोग' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

सुरुवातीला सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण करून डॉ. वा. ना. पंडित यांचे पुष्पहार घालून स्वागत केले

या वेळी संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे भाषण झाले.

शेवटी आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

श्रीमंत बाबुराव देशमुख यांच्या पार्थिव देहाला पुष्पहार अर्पण !

दि. १० रोजी, श्रीमंत बाबुरावजी देशमुख यांच्या पार्थिव देहाला सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी पुष्पमाला अर्पून श्रद्धांजली अर्पण केली.

श्रीमंत बाबुराव देशमुख यांच्या दु:खद निधनानिमित्त शोकसभा

विदर्भ साहित्य संघातर्फे वि. सा. संघाचे उपकर्ते सभासद, नागपूरचे अग्रगण्य नागरिक, दानशूर रसिकाग्रणी श्रीमंत बाबुरावजी देशमुख यांच्या दुःखद निधनानिमित्त दि. १० रोजी सायंकाळी ७ वाजता गडकरी सभागृहात शोकसभा झाली. त्यात संस्थेचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. उर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांचे भाषण झाले. नंतर सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

ठराव

नागपूरचे अग्रगण्य नागरिक, रसिकाग्रणी, दानशूर, श्रीमंत लक्ष्मण श्रीधर ऊर्फ बाबुराव देशमुख यांच्या निधनामुळे विदर्भ साहित्य संघाची जी हानी झाली आहे, तिच्याबद्दल ही सभा शोक व्यक्त करते. बाबुरावजींची गुणज्ञता, रसिकता आणि दानशीलता हे मराठी साहित्य, रंगभूमी, संगीत आणि ललितकला यांचे आधार होते. गेल्या ४० वर्षात त्यांच्या या गुणांमुळे नागपुरातील आणि महाराष्ट्रातील अनेक संस्था उर्जित दशेला आल्या. विदर्भ साहित्य संघाचे तर ते उपकर्तेच होते. अशा या श्रेष्ठ नागरिकाच्या निधनामुळे महाराष्ट्राची अपरिमित सांस्कृतिक हानी झाली आहे. त्यांच्या पत्नी श्रीमती सत्यभामाबाई, चिरंजीव श्री. मधुकरराव आणि इतर कुटुंबीय यांच्यावरील या दुःखशोकाच्य प्रसंगात विदर्भ साहित्य संघ सहभागी आहे.

कै. श्रीमंत बाबुरावजी देशमुख यांच्या निधनानिमित्त जाहीर शोकसभा

विदर्भ साहित्य संघातर्फे संस्थेचे पहिले उपकर्ते सभासद श्रीमंत ल. श्री. उपाख्य बाबुरावजी देशमुख यांच्या दुःखद निधनानिमित्त एक जाहीर शोकसभा बुधवार दि. २२ जुलै १९७० रोजी सायंकाळी ६–३० वाजता गडकरी सभागृहात झाली.

सुरुवातीला सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं माडखोलकर यांनी श्रीमंत बाबुरावजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

यावेळी संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं माडखोलकर, सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर, सर्वश्री शंकरराव सप्रे, सखारामपंत जोशी, म. श्री. मंगरूळकर, प्रा. प्रभाकरराव खर्डेनवीस, चंद्रशेखर धर्माधिकारी, ना. रा. शेंडे, त्र्यं. गो. देशमुख आदी वक्त्यांची भाषणे झाली.

शेवटी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून आपली मूक श्रद्धांजली अर्पण केली.

कलासंचालक श्री. सातवळेकर यांची भेट

विदर्भ साहित्य संघाच्या कला केंद्राला महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयाचे संचालक श्री. माधवराव सातवळेकर यांनी मंगळवार, दि. २८ जुलै १९७० रोजी सायंकाळी ७ वाजता भेट दिली.

आजीव सभासद

प्रा. सौ. उषाताई लिमये ह्या विदर्भ साहित्य संघाच्या १०१ रु. देऊन आजीव सदस्य झाल्या. बद्दल संस्था त्यांची अत्यंत आभारी आहे.

अनुक्रमणिका

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. मलगलोकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर–१
मुद्रणस्थळ : नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर–१

अनुक्रमणिका